सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
https://dainiktarunbharat.com / https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर गुरुवार, २७ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १११ । पाने १२ । किंमत रु. ६/-

# बलात्काराच्या घटनेने पुणे हादरले

- स्वारगेट येथे शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार
- वर्दळीच्या बसस्टँडवर पहाटे घडली संतापजनक घटना
- आरोपी फरार, शोध सुरू; ३३ सुरक्षारक्षक निलंबित
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून गंभीर दखल
- एसटीच्या अधिकाऱ्यांची मंत्र्यांनी बोलवली आज बैठक



**पुणे, २६ फेब्रुवारी-**

पुण्यातील स्वारगेट बसस्टँड परिसरात उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना उजेडात आली आहे. मंगळवारी पहाटे ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. ती आज दुपारी समोर आली. या घटनेमुळे पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ माजली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची गंभीर दखल घेत आरोपीला कठोर शिक्षेसंदर्भाने तपासाच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत. खटला फास्टट्रॅक कोर्टात चालविण्याबाबतही त्यांनी सुतोवाच केले आहे. या घटनेची वाच्यता होताच पुण्यात एकच खळबळ माजली.

यासंबंधीच्या माहितीनुसार, पीडित तरुणी पुण्याहून फलटणला जात होती. ती मंगळवारी पहाटे स्वारगेट बसस्थानकावर थांबली होती. तेव्हा एका अनोळखी व्यक्तीने तिची बस दुसऱ्या ठिकाणी थांबल्याचे सांगितले. पण तरुणीने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. त्यावर त्याने तिला वाहक असल्याचे सांगत विश्वासात घेतले.

## २३ सुरक्षा रक्षकांचे तत्काळ निलंबन

सदर घटनेची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गंभीर दखल घेतली असून संबंधित बसस्थानकावरील त्या वेळी कर्तव्यावर असलेल्या स्थानक प्रमुख तसेच त्या आगाराचे प्रमुख यांची या प्रकरणी प्रवाशांच्या सुरक्षा संदर्भात हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल विभागनिहाय चौकशी करावी, त्या चौकशीमध्ये ते दोष आढळल्यास त्यांना तात्काळ निलंबित करावे, असे निर्देश दिले आहेत. या बसस्थांनकावर कार्यरत असलेले सर्व सुरक्षा रक्षक यांना तात्काळ बदलण्यात यावे, त्यांच्या ऐवजी दुसऱ्या सुरक्षा रक्षकांना नेमण्याची मागणी संबंधित सुरक्षा मंडळाला करावी. असे निर्देश दिले आहेत. याबरोबरच या प्रकरणाचा सविस्तर अहवाल पुढील ७ दिवसात आपणास सादर करावा, अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी) विवेक भिमानवार यांना दिल्या आहेत.

त्यानंतर तो तिला जवळच उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये नेले. तिथे त्याने तिच्यावर पाशवी बलात्कार केला व तेथून पळ काढला. या घटनेमुळे हादरलेल्या तरुणीने आपल्या मित्राला फोनवरून ही घटना सांगितली. त्यानंतर मित्राने तिला तत्काळ पोलिसांकडे जाण्याचा सल्ला दिला. तरुणीने स्वारगेट पोलिस ठाणे गाठून आपबिती कथन केली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करत घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे हा एक सराईत गुन्हेगार आहे. तो मूळचा शिरूरचा सध्या तो फरार आहे. पोलिसांचे पथक त्याच्या मागावर निघाले आहेत. स्वारगेट बसस्थानकात २४ तास प्रवाशांची वर्दळ असते. तिथे ही घटना घडल्यामुळे महिला सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. गंभीर गोष्ट म्हणजे बलात्कार झाल्यानंतरही पुण्यात त्या तरुणीची कुणीही मदत केली नसल्याचा दावाही केला जात आहे.

### मंत्र्यांनी बोलवली बैठक

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी महिला प्रवाशांच्या सुरक्षितते संदर्भात एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक बोलावली आहे. यामध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षितते संदर्भात ठोस निर्णय होणे अपेक्षित आहे.

### ठाकरे सेनेकडून बसस्थानकात तोडफोड

पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर शिवशाही बसमध्ये घडलेल्या बलात्काराच्या घटनेमुळे अवघा महाराष्ट्र हादरला आहे. ठाकरे सेनेने वसंत मोरे यांच्या नेतृत्वात आंदोलन करून बसस्थानकामधील सुरक्षा केबिनची तोडफोड केली. यावेळी मोरे यांनी बसमधील कंडोम्स व साड्यांचा खच दाखवत या ठिकाणी दररोज बलात्कार होत असल्याचा गंभीर आरोप केला. या घटनेमुळे एकूणच एसटी महामंडळाचा कारभार चव्हाट्यावर आला आहे.







72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE

*Terms and conditions apply. *Ex-showroom price for Pulsar 125 variants. Bajaj Auto reserves the right to withdraw any or all offers without prior notice. Stunts have been performed by experts, under professional supervision, in a controlled and enclosed environment, in isolation from general public or public roads. Do not attempt to replicate these stunts and always follow traffic and safety rules. AMC available on specific models and in specific states. Check with Bajaj dealer for more details. Road Side Assistance is provided by third parties and is subject to their terms and conditions.

**Authorized Dealers for Bajaj Auto Ltd.** Solapur • Station Road AHERKAR BAJAJ 9689899840 • Hotgi Road AHERKAR BAJAJ 8956 069 355 • Akkalkot Road AHERKAR BAJAJ 8956 320 060 • Pandharpur PANDURANG BAJAJ 8600024805 • Jeur SHIVRATNA BAJAJ 9922044676 • Barshi AHERKAR BAJAJ 8308004007. **Authorised Service Centre:** Mangalwedha 9890214155, Marwade 9028703555, Akkalkot 9011556800, Karkamb 7057447777, Vairag 8308006007, Sangola 8888109109, Karmala 8888984084, Kandar 9673005524, Rashin 9975704778, Mirajgaon 7774826060, Akluj 7756999799, Natepute 9850738876, Mohol 8830070701

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २७ फेब्रुवारी २०२५

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### डिसेंबरमध्ये १६ लाख नवीन ईपीएफओ सदस्य

**नवी दिल्ली** : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेमध्ये (ईपीएफओ) मागील वर्षीच्या डिसेंबर महिन्यात १६ लाख ५ हजार नवीन सदस्यांची भर पडली आहे. त्याआधीच्या नोव्हेंबर महिन्याच्या तुलनेत संघटनेच्या सदस्यांमध्ये ९.६९ टक्के वाढ नोंदवली, असे केंद्रीय कामगार मंत्रालयाने निवेदनात म्हटले. डिसेंबर २०२३ च्या तुलनेत सदस्य संख्येतील वाढ २.७४ टक्के आहे. ईपीएफओचे सदस्यत्व पहिल्यांदाच स्वीकारणाऱ्यांची संख्या ८ लाख ४७ हजार आहे. त्यात डिसेंबर २०२३ च्या तुलनेत ०.७३ टक्के वाढ झाली. नव्याने सदस्यत्व स्वीकारणाऱ्यांमध्ये वाढ होण्यामागे रोजगाराच्या वाढत्या संधी, कर्मचारी लाभाबद्दल वाढलेली जागरूकता कारणीभूत ठरले. नवीन सदस्यांमध्ये १८ ते २५ वयोगटातील सदस्यांचे प्रमाण अधिक आहे. या वयोगटातील ४ लाख ८५ हजार नवीन सदस्य असून, त्यांचे प्रमाण ५७.२९ टक्के आहे. डिसेंबर २०२४ मधील ईपीएफओच्या नवीन सदस्यांमध्ये महिलांची संख्या २ लाख २२ हजार आहे.

### स्वातंत्र्यवीर सावरकरांना पंतप्रधानांकडून आदरांजली

**नवी दिल्ली** : प्रखर हिंदुत्ववादी नेते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली. पंतप्रधानांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, सावरकरांचा त्याग अमूल्य आहे आणि त्यांचे धैर्य अचाट, अफाट आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष हा देश कृतज्ञतेने कायम स्मरणात ठेवेल. सावरकर हे कविमनाचे होते आणि त्यांचे लेखन तितकेच प्रेरणादायी आहे. विशेषतः हिंदुत्वाविषयी त्यांचे लिखाण अतिशय स्फूर्तिदायक आहे.

### सिंहस्थासाठी वेगळे कुंभमेळा प्राधिकरणासाठी मुख्यमंत्र्यांची सूचना

**मुंबई,** त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यांसाठी वेगळे कुंभमेळा प्राधिकरण निर्माण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी आढावा बैठकीत दिल्या. तसेच हा सिंहस्थ कुंभ 'डिजिटल टेक्नॉलॉजी कुंभ' म्हणून ओळखला जावा, यासाठीचे नियोजन करण्याचा निर्देशही त्यांनी यावेळी दिला. २०२७ मध्ये नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसंदर्भात देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्यासह नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह विविध विभागाचे सचिव उपस्थित होते. सिंहस्थ कुंभ मेळ्याचे नियोजन सुव्यवस्थित व्हावे, सर्व यंत्रणांचा समन्वय व्हावा, कुंभ मेळ्याची कामे गतीने व्हावीत, यासाठी कुंभमेळा प्राधिकरण तयार करावे.

# महाकुंभ महापर्वाची महाशिवरात्रीला महासमाप्ती




### गर्दीचे मुख्य कारण समाज माध्यम

महाकुंभातील अलोट गर्दीमागे सर्वांत मोठे कारण म्हणजे समाज माध्यमांद्वारे झालेला प्रचार, प्रसार हे असल्याचे दिसते. कारण, याद्वारे कुंभ परिसरातील व्यवस्थेचे वर्णन, १४४ वर्षांनी आलेला योग याची प्रसिद्धी, सेलिब्रिटीं तसेच दिग्गज नेत्यांचे येणे आदींच्या वृत्तांकनाने शेवटच्या दिवसापर्यंत गर्दीचा ओघ कायम राहिला. चेंगराचेंगरीच्या घटनेचे गालबोट लागूनही भाविकांचा उत्साह आणि श्रद्धा यात तसूभरही कमतरता आली नाही.

महाशिवरात्रीला पवित्र संगमावर स्नान करणाऱ्या भाविकांवर हेलिकॉप्टरने गुलाबपुष्पांचा वर्षाव करण्यात आला.

### लाखो भाविकांच्या साक्षीने अमृतपर्वाची पूर्णाहुती

**प्रयागराज, २६ फेब्रुवारी**

गेल्या ४४ दिवसांपासून सुरू असलेल्या महाकुंभाची महाशिवरात्रीच्या शुभ पर्वावर अमृत स्नानानंतर समाप्ती झाली. कोट्यवधी सनातनींच्या आस्थेचा महाकुंभ देश-परदेश गाजवत अखेर पूर्णत्वास आला. अखेरच्या दिवशीही जवळपास एक कोटी भाविकांनी अमृतस्नान केले.

सकाळी १० वाजेपर्यंत ८१ लाख लोकांनी स्नान केले होते. गेल्या ४४ दिवसांत ६५ कोटी भाविकांनी स्नान केले. ४५ दिवस चालणाऱ्या महाकुंभाचा समारोप महाशिवरात्री उत्सवाच्या स्नानाने झाला. संगमात स्नान करणाऱ्यांची ही संख्या १९३ देशांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. महाकुंभाला येणाऱ्या भाविकांच्या संख्येपेक्षा फक्त भारत आणि चीनची लोकसंख्या जास्त आहे. जगातील हिंदूंच्या लोकसंख्येच्या निम्म्या लोकसंख्येइतके लोक येथे आले आहेत, असा दावा योगी सरकारने केला.

महाकुंभ सुरू होण्यापूर्वी सरकारने ४० कोटी भाविकांच्या आगमनाची शक्यता व्यक्त केली होती, परंतु या अपेक्षेपेक्षा २० कोटी जास्त लोक आधीच आले आहेत. २२ फेब्रुवारीपर्यंत ६० कोटींहून अधिक भाविक महाकुंभात आले आहेत. ही संख्या जगात राहणाऱ्या १२० कोटी हिंदूंपैकी ५० टक्के आहे. याचा अर्थ जगातील अर्ध्या हिंदूंनी संगमात स्नान केले आहे. *(वृत्तसंस्था)*

### विदेशातूनही भाविकांची गर्दी

विदेशातूनही अनेकजण खासकरून महाकुंभासाठी प्रयागराजला आले होते. अनेक परदेशी लोकांनी सनातन हिंदू धर्माची दीक्षा घेतली. ७० पेक्षा अधिक देशांचे राजदूत कुंभस्नानासाठी आले होते. यासोबतच देशातील उद्योगपती, अभिनेते, अभिनेत्री, राजकीय नेते, खेळाडू यांनीदेखील आवर्जून कुंभमेळ्याला भेट दिली.

# बिहारमध्ये मंत्रिमंडळाचा विस्तार

## विधानसभा निवडणुकीआधी भाजपाने साधले जातीय संतुलन

**नवी दिल्ली, २६ फेब्रुवारी**

बिहारमध्ये बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ विस्तारात भाजपाने जातीय संतुलन साधत विधानसभा निवडणुकीसाठी सामाजिक सलोख्याचे नवे वातावरण तयार केले आहे. या वर्षीच्या अखेरीस म्हणजे ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये बिहारमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे.

भाजपाच्या सात सदस्यांचा आज शपथविधी झाल्यामुळे नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांची एकूण संख्या ३६ झाली आहे. मंत्रिमंडळात भाजपाच्या २१, जदयुच्या १३ आणि हम तसेच एका अपक्ष आमदारांचा समावेश आहे. २४३ सदस्याच्या बिहार विधानसभेत रालोआचे १३१ सदस्य आहे. बिहारमध्ये भाजपाचे ८०, तर जदयुचे ४५ सदस्य आहे. हमचे ४ आमदार आहेत, तर दोन अपक्ष आमदारांचाही सरकारला पाठबा आहे.

नितीशकुमार यांनी १३ महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर झालेला हा मंत्रिमंडळाचा तिसरा विस्तार आहे. जवळपास वर्षभरापासून हा विस्तार रखडला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २४ फेब्रुवारीला भागलपूरला भेट दिल्यानंतर या विस्ताराचा मार्ग प्रशस्त झाला. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी पाटण्यात जात नितीशकुमार यांची भेट घेतल्यानंतर या मंत्रिमंडळ विस्ताराला अंतिम रूप देण्यात आले.

२८ जानेवारी २०२४ ला नितीशकुमार आणि भाजपा सरकार राज्यात सत्तेवर आले होते. त्यावेळी नितीशकुमार यांच्यासह ८ जणांचा शपथविधी झाला होते, यात जदयु आणि भाजपाचे प्रत्येकी तीन तर हम आणि एका अपक्ष आमदाराचा समावेश होता.

१५ मार्च २०२४ ला मंत्रिमंडळाचा दुसरा विस्तार झाला होते, त्यावेळी भाजपाच्या १२ तर जदयुच्या दहा आमदारांचा समावेश करण्यात आला होता. *(तभा वृत्तसेवा)*

### लष्करी वाहनावर दहशतवादी हल्ला

**श्रीनगर, २६ फेब्रुवारी**

जम्मू आणि काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातील सुंदरबनी परिसरात दहशतवाद्यांनी लष्कराच्या वाहनावर बुधवारी गोळीबार केला. राजौरीतील नियंत्रण रेषेजवळ हा हल्ला झाला. हल्ल्यानंतर लष्कर सतर्क झाले असून, दहशतवाद्यांना ठार करण्यासाठी शोधमोहीम सुरू केली आहे.

राजौरी जिल्ह्यातील नियंत्रण रेषेजवळील फाल गावात दहशतवाद्यांनी बुधवारी लष्कराच्या वाहनावर गोळीबार केला. दुपारी दीड वाजताच्या सुमारास सुंदरबनीपासून सुमारे ६ किमी अंतरावर पांडवांनी बांधलेल्या ऐतिहासिक गंडेह मंदिराशेजारी असलेल्या जंगलाजवळ अतिरेक्यांनी हा हल्ला घडवून आणला.

**संतोष देशमुख हत्या प्रकरण**

### उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

**मुंबई, २६ फेब्रुवारी**

राज्यात गाजत असलेल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून, तर बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'एक्स'वर पोस्ट करीत दिली.

विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत होती. मस्साजोगच्या ग्रामस्थांनी आपल्या सात मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. मस्साजोगच्या ग्रामस्थांच्या सात मागण्यांमध्ये उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीची एक मागणी होती. सरकारने ही मागणी मान्य करीत, ॲड. निकम यांची नियुक्ती केली आहे.

देशमुख यांच्या हत्येप्रकरणी कुटुंबीयांनी या संदर्भात केलेल्या अनेक मागण्यापैकी, ही एक मुख्य मागणी होती. ती मान्य झाल्याने देशमुख यांच्या कुटुंबीयांनी आणि मस्साजोगच्या ग्रामस्थांनी समाधान समाधान व्यक्त केले. मात्र, इतर मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# आसाममध्ये बांधणार ८० हजार कोटींचे रस्ते

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती



**गुवाहाटी, २६ फेब्रुवारी**

आसाममध्ये ८० हजार कोटींच्या रस्तेनिर्मिती प्रकल्पाला मंजुरी मिळाली असून, लवकर त्याचे काम सुरू होणार आहे. यात गुवाहाटी रिंग रोड, ब्रह्मपुत्रा नदीखालील बोगदा आणि काझिरंगा राष्ट्रीय अभयारण्यातील एलिव्हेटेड कॉरिडोरचा समावेश असल्याचे केंद्रीय भूपृष्ठ परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

ॲडव्हांटेज आसाम २.० व्यापार शिखर परिषदेला संबोधित करताना गडकरी म्हणाले, २०२९ पर्यंत राज्यात तीन लाख कोटींचे विविध प्रकल्प पूर्ण होणार आहेत. ६० हजार कोटींच्या प्रकल्पांवर काम सुरू असून, लवकरच रस्ते, ब्रह्मपुत्रा नदीखालील बोगदा आणि काझिरंगा राष्ट्रीय अभयारण्यातील एलिव्हेटेड कॉरिडोरच्या कामाला सुरुवात होणार आहे. कुठल्याही राज्याच्या विकासासाठी पक्के रस्त असणे आवश्यक आहे. पंतप्रधान मोदी यांनी ईशान्य भारतातील राज्यांच्या विकासाला विशेष प्राधान्य दिले आहे. ब्रह्मपुत्रा नदीखालून तयार करण्यात येणारा बोगदा देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे. २०२९ पर्यंत याचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य निर्धारित केल्याचे त्यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### सिमेंट प्रकल्पासाठी ३२०० कोटींचा करार

व्यापार शिखर परिषदेत झालेल्या कराराची माहिती देताना मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा म्हणाले, स्टार सिमेंट लिमिटेड कंपनी राज्यात प्रकल्प सुरू करणाल असून, त्यांना राज्या सरकारसोबत ३२०० कोटींचा करार केला आहे. याशिवाय मैथेसन हायड्रोजन प्रा. लि. या कंपनीसोबत १५०० कोटी आणि ग्लोबल हेल्थ लिमिटेडसोबत ५०० कोटींचा करार झाला. ही कंपनी आयटीशी संबंधित असून, राज्यातील तरुणांना प्रशिक्षण देणार आहे. या करारातून अंदाजे १० हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

### जलमार्ग विकासावर ४,८०० कोटींचा खर्च

सोनोवाल आसाम २.० व्यापार शिखर परिषदेला संबोधित करताना केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल म्हणाले, केंद्र सरकार आगामी पाच वर्षांत आसाममध्ये जलमार्ग विकासावर ४,८०० कोटी रुपये खर्च करणार आहे. यात बंदरांचा विकास, पायाभूत सुविधा, जहाजांची देखभाल व दुरुस्ती बंदरांना जोडणाऱ्या रस्त्यांच्या निर्मितींचा समावेश आहे. राज्यात सागरी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येईल, यातून वार्षिक पाच हजार तरुणांना प्रशिक्षित करून रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या जातील.

# भाषेचा अभिमान असावा, अट्टहास नको!

**आज मराठी भाषा गौरव दिन**

**नागपूर, २६ फेब्रुवारी**

सध्या देशात दाक्षिणात्य राज्य आपल्या भाषेचा हेका धरीत देशाच्या नव्या शैक्षणिक धोरणाला विरोध करीत आहेत. यावरून अनेक मतांतरे समोर येत असली, तरी प्रत्यक्षात भाषा कोणतीही असो, तिचा अभिमान बाळगलाच पाहिजे. मात्र, त्याविषयी अट्टहास करणे दुराग्रहाचे ठरते. म्हणूनच मराठी भाषेने आजवर आपला स्वाभिमान जपला आणि कधीही दुराग्रहाला बळी पडल्याचे दिसले नाही. दुकानांवर मराठी पाट्या ही अतिशय क्षुल्लक बाब आहे. एरवी कधीही मराठीविषयी मराठीजनांनी दुराग्रही वृत्ती ठेवली नाही. या पाट्यांच्या मागणीतही स्वाभिमानच झळकतो. अट्टहास न केल्यानेच मराठीला उशिराने का होईना मात्र राजदरबारी अभिजातचा सन्मान मिळाला. २७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या पुढील पिढीने मराठी भाषेचे संवर्धन करावे म्हणून मराठी भाषा दिन साजरा केला जातो. कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेला सन्मान मिळवून देण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. कुसुमाग्रज महाराष्ट्राचे लाडके साहित्यकार, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, थोर लेखक, नाटककार म्हणून ओळखले जातात.

# दहशतवाद खपवून घेणार नाही

## संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार परिषदेत जयशंकर यांनी पाकिस्तानला सुनावले

**नवी दिल्ली, २६ फेब्रुवारी**

काही देश स्वतःच्या भूमीचा वापर अतिरेक्यांना आश्रय देण्यासाठी करतात, हा प्रकार अतिशय दुर्दैवी आहे. अतिरेक्यांच्या हल्ल्यात निष्पाप नागरिक मारले जातात. यावर जागतिक संघटनेकडून मौन बाळगले जाते, भारत नेहमीच दहशतवादाविरोधात उभा राहिला आहे. आम्ही कुठल्याही परिस्थितीत दहशतवाद अजिबात खपवून नाही, अशा शब्दांत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार परिषदेत पाकिस्तानला सुनावले.

जीनिव्हा येथे ५८ व्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार परिषदेच्या आभासी सत्रात 'जगातील विविध प्रदेशांमधील भू-राजकीय अशांतता' या विषयावर बुधवारी संबोधित करताना जयशंकर म्हणाले, दहशतवादाविरोधात भारत शून्य सहनशीलतेचा पुरस्कार करतो. दहशतवादाविरोधात कठोर पावले उचलण्यासंदर्भात गेल्या काही वर्षांत स्थापित केलेल्या जागतिक चौकटी पूर्णपणे निरुपयोगी ठरल्या आहेत. त्यामुळे सध्याची परिस्थिती पाहता जागतिक वास्तवांवर आधारित एक नवीन बहुआयामी व्यवस्था स्थापन करण्याची गरज आहे. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी दहशतवादी संघटनांसह त्यांना आश्रय देणाऱ्या देशांवर अधिक कठोर निर्बंध लावणे गरजेचे आहे. जगातील सध्याची आव्हानांमध्ये परिस्थिती अधिक बिकट, अनिश्चित आणि अस्थिर होत चालली आहे. आधुनिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आपल्याला अधिक तयारीची आवश्यकता असल्याचे त्यांनी योवेळी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### 'वसुधैव कुटुंबकम्' भारताची संस्कृती



'वसुधैव कुटुंबकम्' ही भारताची संस्कृती आहे. त्यामुळे आमच्यासाठी संपूर्ण जग कुटुंबाप्रमाणे आहे. विविध देशांच्या विकासाला प्राधान्य देताना भारताने कोणतीही तडजोड न करता दहशतवादाविरोधात लढा दिला आहे. इतर देशांकडून आणि जागतिक संघटनांकडूनही आम्हाला हीच अपेक्षा आहे. भारत जागतिक व्यासपीठावर सुधारणांना पाठिंबा देण्यास आणि त्यांचे नेतृत्व करण्यास तयार असल्याचे जयशंकर म्हणाले.

### पारदर्शकता, सातत्याचे पालन व्हावे

संयुक्त राष्ट्रांच्या सध्याच्या व्यवस्थेकडे लक्ष वेधत जयशंकर म्हणाले, मानवाधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आपल्याला आता बहुआयामी प्रणालींची गरज आहे, ज्या समकालीन जागतिक वास्तवांशी सुसंगत असतील. जागतिक स्तरावर मानवी हक्कांच्या संवर्धन आणि संरक्षणात भारताने नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आम्ही नेहमीच आर्थिक जबाबदारी, पारदर्शकता आणि सातत्य या तत्त्वांचे पालन केले आहे. इतर देशांनी त्याचे काटेकोर पालन करावे, अशी आम्ही अपेक्षा व्यक्त करतो.



महाकुंभाच्या अखेरच्या दिवशी व महाशिवरात्रीच्या पर्वावर विविध आखाड्यांच्या साधूंनी काशी विश्वनाथाचे दर्शन घेत प्रार्थना केली

## अग्रलेख

# न्याय वेळेत मिळायला हवा!

गुन्हेगार कितीही चतुर असला तरी कायद्याच्या कचाट्यातून तो निसटू शकत नाही. त्याने कितीही मातब्बर वकिलामार्फत युक्तिवाद केले तरी ते न्यायपीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या न्यायाधीशांच्या चाणाक्ष नजरेपुढे खरे उतरत नाहीत, हे पुन्हा एकदा माजी खासदार आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते सज्जनकुमार यांना, १९८४ मध्ये दिल्लीत उसळलेल्या शीख विरोधी दंगल प्रकरणी न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेतून सिद्ध झाले आहे. सज्जनकुमार यांना १ नोव्हेंबर १९८४ रोजी सरस्वती विहारमध्ये झालेल्या पिता-पुत्राच्या हत्येप्रकरणी, १२ फेब्रुवारीला दोषी ठरवण्यात आले होते. त्यांना शिक्षा कुठली ठोठावली जाणार याची सर्वांना प्रतीक्षा होती. या प्रकरणात सीबीआय आणि तक्रारदारांनी सज्जनकुमार यांना फाशी देण्याची केलेली मागणी दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने मान्य केली नसली तरी, त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावून पीडित परिवाराला काही अंशी न्याय मिळवून दिला आहे. त्याचप्रमाणे इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर उसळलेल्या शीखविरोधी दंगलीमध्ये न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या शीख समाजालाही थोडाफार न्याय मिळाला आहे. या दंगलीशी संबंधित एका प्रकरणात सज्जनकुमार यांना दिल्ली उच्च न्यायालयाने आधीच जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून, ते सध्या तिहार तुरुंगाची हवा खात आहेत. पंजाबमध्ये झालेल्या ऑपरेशन 'ब्लू स्टार'नंतर ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांनी गोळ्या झाडून हत्या केली होती. त्यानंतर १ नोव्हेंबरला दिल्लीत आणि देशातील अनेक भागांत शिखांविरोधात मोठ्या प्रमाणात हिंसाचार उफाळला. या हिंसाचारात शीख समाजातील लोक आणि त्यांच्या मालमत्तांना लक्ष्य करण्यात आले. तीन हजारांहून अधिक शिखांची या दंगलीत हत्या झाल्याची किंवा त्यांना जिवंत जाळल्याची सरकारदरबारी नोंद आहे. दिल्लीत उसळलेल्या दंगलीत सरस्वती विहारमध्ये जसवंत सिंग आणि तरुणदीप सिंग या दोन शीख पिता-पुत्राची हत्या झाली होती. याप्रकरणी पीडितांच्या पत्नी आणि आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल गेला होता. ज्या जमावाने जसवंत आणि तरुणदीप सिंग यांची त्यांच्या घरात जिवंत जाळून हत्या केली, त्या घराची तोडफोडही केली आणि लूटमार करीत घरातील इतर लोकांना मारहाण केली, त्या जमावाचे नेतृत्व सज्जनकुमार करीत होते, असा आरोप होता.

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीत किती शिखांच्या हत्या झाल्या, याबाबत खुलासा करण्याची मागणी माहिती अधिकार कायद्यांतर्गत करण्यात आली होती. त्याअंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही राज्य सरकारच्या अखत्यारीतील बाब असली तरी, या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या नानावटी आयोगाने दिलेल्या अहवालावर संसदेत करण्यात आलेल्या चर्चेप्रसंगी दिलेल्या आश्वासनानंतर सरकारने डॉ. डी. के. शंकरन आणि के. पी. सिंग या अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली गेली. या समितीला विविध राज्य सरकारांनी उपलब्ध करून दिलेल्या आकडेवारीनुसार निरनिराळ्या राज्यांमध्ये इंदिरा गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीत एकंदरीत ३२३९ शिखांचे शिरकाण झाल्याचे स्पष्ट झाले. त्यात एकट्या दिल्लीत २७३३, उत्तरप्रदेशात २५१, हरयाणात १०६ तर मध्य प्रदेश आणि झारखंडमध्ये अनुक्रमे ९४ आणि ८४ शिखांच्या हत्या झाल्याची माहिती मिळाली. छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू काश्मीर आणि पश्चिम बंगालमध्येही हिंसाचाराचे लोण पसरले, ज्यात अनेक शिखांच्या हत्या झाल्या.

आजची पिढी १९८४ सालच्या शिखविरोधी दंगलीबद्दल अनभिज्ञ आहे. त्यांना ही दंगल का झाली, कोणी घडवून आणली आणि इतक्या मोठ्या प्रमाणात शिखांना लक्ष्य का करण्यात आले, याची पुसटशीही कल्पना नाही. शीख समाजाने मात्र इंदिरा गांधींच्या हत्येनंतर दिल्लीत उसळलेल्या दंगली म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून, हा प्रकार म्हणजे शिखांचे सामूहिक हत्याकांडच होते, असा निष्कर्ष काढला. शीख फॉर जस्टिस ही संघटना या प्रकरणी न्याय मिळावा यासाठी गेल्या ४० वर्षांपासून संघर्ष करीत आहे. विविध न्यायालयांत या प्रकरणी अनेक याचिका आजही प्रलंबित आहेत. या दंगलीत देशाच्या अठरा राज्यांमध्ये अतिशय नियोजित आणि सामूहिक पद्धतीने शेकडो शिखांच्या हत्या घडवून आणण्यात आल्या. सरकारी आकडेवारी काहीही सांगत असली तरी शीख फॉर जस्टिस या संघटनेच्या दाव्यानुसार संपूर्ण भारतात या हिंसाचारात ३० हजाराहून अधिक शिखांची हत्या झाली. त्यात बहुतांशी शिखांना जिवंत जाळण्यात आले. संपूर्ण भारतात शेकडो शीख महिलांवर गुंड, पोलिस अधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सामूहिक बलात्कार केले आणि प्रतिज्ञा घेतली की पुढील पिढी (बलात्कारानंतर) भारत सरकारशी एकनिष्ठ असेल. ३ लाखांहून अधिक शीख या घटनेनंतर विस्थापित आणि बेघर झाले. संपूर्ण भारतात शेकडो गुरुद्वारा आणि गुरु ग्रंथ साहिब जाळण्यात आले तसेच पद्धतशीर आणि नियोजनबद्ध पद्धतीने अपवित्र करण्यात आले. सुमारे ३०० शीख सैनिकांना सहकाऱ्यांनी गणवेशात ठार मारले. झारखंडमधील बोकारो स्टील प्लांटमध्ये काम करणाऱ्या १२० शिखांना जळत्या भट्टीत जिवंत फेकण्यात आले. कानपूर आणि भारतातील इतर शहरांमध्ये १३ दिवसांपर्यंतच्या मुलांना गॅसच्या चुलीवर जिवंत भाजण्यात आले. त्रिपुरातील आगरतळा येथे जीव वाचवण्यासाठी पोलिस ठाण्यात आश्रय घेतलेल्या ४० शीख कुटुंबांना पोलिस ठाण्यात जिवंत जाळण्यात आले. मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये १२ शिखांना रेल्वे प्लॅटफॉर्मच्या छतावर फाशी देण्यात आली. शिखांची लाखो-करोडोंची मालमत्ता लुटून नष्ट करण्यात आली.

या दंगलीबाबत बरीच रोचक माहिती आता कुठे जनतेपर्यंत पोहोचू शकत आहे. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी नवी दिल्लीतील २४ अकबर रोडवर आयोजित एका बैठकीमध्ये शिखांच्या हत्याकांडाचे नियोजन करण्यात आले. या बैठकीला संसद सदस्य आणि काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ सदस्य उपस्थित होते. यामध्ये जगदीश टायटलर, सज्जन कुमार, एच. के. एल. भगत, कमलनाथ, धर्मदास शास्त्री, ललित माकन यांचा समावेश होता. दंगली सुरू असताना केंद्र शासनाच्या प्रसिद्धी माध्यमांनी प्रक्षोभक भाषणे आणि दृश्ये दाखवली. दूरदर्शनवर दाखवण्यात आलेल्या दृश्यात लोकप्रिय चित्रपट कलाकार 'खून का बदला खून' आणि 'खून की छिंटें सिखों के घर तक पहुचनी चाहिए' यासारखे नारे देताना दिसून आले. भजनलाल यांच्या आदेशानुसार हरयाणातील मधुबन येथील पोलिस मुख्यालयातील पोलिस कमांडोंना शिखांचा नरसंहार करण्यासाठी पाठवले गेले. तज्ज्ञ शस्त्रधारी आणि व्यावसायिक गुंड बाहेरून आणले गेले आणि सरकारी बसेसमधून त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांत पोहोचविले गेले. शीख व्यक्ती, शिखांची घरे, व्यवसाय आणि गुरुद्वारे जाळण्यासाठी ज्वलनशील साहित्याचा पुरवठा केला गेला. शिखांच्या हत्याकांडात पोलिसांनी सक्रिय सहभाग घेतला किंवा शिखांना जिवंत जाळले जात असताना त्यांनी मूकदर्शक होण्याची भूमिका निभावली, असेही खुलासे होऊ लागले आहेत. दंगलीच्या वेळी जाळपोळ करणाऱ्या समाजकंटकांना पोलिसांच्या जीपमधून डिझेल पुरवले गेल्याची संतापजनक बाब उघड झाली आहे. जमावाने हल्ला करण्यापूर्वी पोलिसांनी स्वतः पुढाकार घेऊन शिखांना निःशस्त्र केले. बहुतांश ठिकाणी हत्याकांड घडवून आणताना ना संचारबंदी लावली गेली ना सैन्याला मदतीसाठी पाचारण केले गेले. आज ४० वर्षांनंतरही शिखांच्या नरसंहाराचे आयोजक आणि गुन्हेगार उजळ माथ्याने फिरत असून, सत्तेच्या दालनात मोठमोठ्या पदांचा आनंद उपभोगत आहेत. शिखांच्या हत्याकांडासाठी मोजक्याच व्यक्तींना शिक्षा झालेली बघायला मिळते. या दंगलींचा आरोप असलेले अनेक जण आज स्वर्गवासी झालेले आहेत, त्यामुळे शिखांना पूर्णांशाने न्याय मिळाला असे कोणीही म्हणू शकत नाही. शिखांना न्याय मिळवून देण्यात एकंदरीत दहा चौकशी आयोग अयशस्वी ठरले आहेत. हत्याकांड घडवून आणण्यासाठी पुढाकार घेणारे आणि प्रत्यक्ष हत्याकांडात सहभागी होणाऱ्यांच्या निवासस्थानी आयोगांचे चौकशी अहवाल आणि पीडितांचे अर्ज धूळ खात पडून होते. सज्जनकुमार यांना झालेल्या जन्मठेपेच्या शिक्षेतून काही प्रमाणात न्याय शिखांच्या पदरात पडला असला तरी न्यायाला लागलेल्या विलंबाचे मुळीच समर्थन होऊ शकत नाही. 'जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाईड'सारखी परिस्थिती आज झालेली दिसतेय. त्यात सुधारणा व्हावी आणि उर्वरित पीडितांना लवकरात लवकर न्याय मिळावा, ही अपेक्षा!

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# अतिक्रमण की जिहाद?

आटपाट नगर होते. औद्योगिकीकरणामुळे समृद्ध. स्थानिक प्रशासनाला असणाऱ्या उत्पन्नामुळे सगळ्या शहरी सोयी-सवलतींची लयलूट असलेले. या नगराला लागून एक ओसाड माळरान होते. तिथे बाहेरच्या प्रांतातील काही लोकांनी आधी पाल वजा झोपड्या टाकल्या. अशिक्षित आणि गरीब असलेल्या या लोकांनी मग आजूबाजूच्या वस्तीतून काही हलकीफुलकी कामं करायला सुरुवात केली. असाच एक व्यवसाय म्हणजे भंगार गोळा करून आणणे, त्याचे वर्गीकरण करून विकणे. असा व्यवसाय एकाने सुरू केला. काही दिवसांनी अजून दोघा-चौघांनी सुरू केला. आता तिथे भंगार व्यवसायातील लोकांची वर्दळ सुरू झाली. काही वर्षांत अनेक भंगार व्यावसायिकांचे त्या माळरानावर टपऱ्या, टिनाचे शेड असे साम्राज्य उभे राहिले. मग त्याच व्यवसायातील मजुरांच्या झोपड्या तिथे उभ्या राहिल्या. अशा ठिकाणांवर सर्वांत आधी गावातल्या टपोरी गुंडांची नजर पडत असते. तसे अनेक गुंड तिथे धावले. त्या वस्तीत काही पैसे घेऊन हे गुंड झोपडी बांधण्यासाठी जागा देऊ लागले. हळूहळू तिथे गुंडांच्या टोळ्या तयार झाल्या. त्या प्रभागाच्या नगरसेवकाने खटपट करून दबाव टाकून त्या वस्तीत पाणी आणि विजेचे खांब उभे करून दिले. आता ती वस्ती स्थिर झाली. त्या जमिनीची मालकी कोणाची हा फालतू प्रश्न प्रशासन, लोकप्रतिनिधी, जवळच्या अधिकृत वस्तीतील नागरिक, तथाकथित पत्रकार कोणीही विचारला नाही, कोणाला पडला नाही. भंगार व्यवसायातील मुस्लिम व्यावसायिकांनी हिंदू व्यावसायिकांचे भंगाराच्या धंद्यातून उच्चाटन करण्यासाठी, जास्त किमतीत भंगार विकत घेणे, हिंदूंना मजूर मिळणार नाहीत अशी व्यवस्था करणे. हिंदू भंगार व्यावसायिकांकडून भंगार घेताना पाडून भाव देणे असे उद्योग सुरू केले. हिंदू भंगार व्यावसायिकांना आपले व्यवसाय चालविणे कठीण होऊ लागले. त्यांच्याकडून कोणीही भंगार योग्य त्या किमतीला उचलायला तयारच नसे. मोठे भंगार व्यावसायिक हिंदू भंगारवाल्याकडून भंगार घेण्यात टाळाटाळ करीत किंवा किंमत तरी पाडून मागत असत. एकूण परिस्थितीचा अंदाज घेऊन हिंदू लोकांनी भंगाराचा व्यवसाय बंद केला. त्या वस्तीतून हळूहळू हिंदू व्यावसायिक आणि हिंदू लोकांनी जागा सोडायला सुरुवात केली. एका ठरावीक काळानंतर आधी मिश्र असलेल्या त्या संपूर्ण वस्तीचे आता फक्त मुस्लिम वस्तीत रूपांतर झाले. सगळेच बेकायदेशीर असलेल्या त्या वस्तीत जायचे तर पोलिस देखील चार वेळा विचार करू लागले. सभ्य माणसे तर तेथे जाऊच शकत नसतं. हळूहळू तिथे चालणाऱ्या बेकायदा उद्योगांची माहिती अफवांच्या रूपाने बाहेर येऊ लागली होती; ती वस्ती मात्र हळूहळू विस्तारत होती. आता त्या वस्तीतून एकाच वेळी अनेक ठिकाणांहून बांग ऐकू येऊ लागली. याचा अर्थ वस्तीत लहान-मोठ्या मशिदी उभ्या राहिल्या, असा घेत इतर नगरवासी स्वतःला त्या वस्तीपासून दूर ठेवण्यात समाधान मानू लागले. ती अनधिकृत बेकायदा वस्ती आणि इतर नगर यामध्ये फक्त एक चौपदरी सडक एवढंच अंतर उरलं. त्या सडकेने निदान नगराकडील बाजूला त्या वस्तीचा विस्तार थांबला असला, तरी कायदेशीर वस्तीतील लोकांच्या त्या बेकायदेशीर वस्तीतील लोकांशी छोट्या-मोठ्या कुरबुरी चालूच असतं. एक दिवस संध्याकाळी त्या नगरातील प्रतिष्ठित घरात गडबड उडाली. सकाळी ८ वाजता आपल्या कॉलेजला गेलेली त्या घरातील लाडकी लेक रात्री ८ वाजले तरी घरी आली नव्हती. घरच्या लोकांनी तिच्या मित्र-मैत्रिणींकडे चौकशी करायला सुरुवात केली. तेव्हा कळले सुयश नावाचा तिचा कोणी मित्र होता. ती कॉलेजमध्ये आणि बाहेरही अनेकदा त्याच्या बरोबर असायची. पोलिसांचे रेकॉर्ड मात्र त्याचे नाव सुलेमान असल्याचे दाखवत होते. या पलीकडे कोणतीच खबर मिळत नव्हती. रात्री १० वाजता कुणीतरी पोलिस तक्रार करण्याचा सल्ला दिला. घरातील कर्ता पुरुष, एक-दोन शेजारी असे जवळच्या पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेले. तेथील पोलिस अधिकाऱ्याने सौम्यपणे सगळं ऐकून घेत थोडी वाट पाहण्याचा सल्ला दिला. हे लोक तक्रार नोंदवावी म्हणून अडून बसले तर स्पष्ट शब्दात एक-दोन दिवस वाट बघा, असा सज्जड दम भरला. मंडळी अस्वस्थपणे बाहेर आली. एकाने कुणा स्थानिक नेत्याला फोन केला. तो धावत पोलिस ठाण्यात पोहोचला. हमरीतुमरी करून तक्रार नोंदवून घेतली, पण पुढे काहीच नाही. मुलगी सहीसलामत घरी येण्याची आशा दुरावू लागली. प्रत्येकच माणूस या बाबतीत त्या वस्तीकडे संशयाने पाहात होता. जवळजवळ ३० लाख चौरस फुटात पसरलेली ती वस्ती. तिच्या आत अनेक रहस्यं, गुन्हेगार, अवैध धंदे दडलेले होते. काळाबरोबर त्या वस्तीत हळूहळू विशिष्ट छाप असलेले, रंगाने कळकट काळे असलेले आणि उजळ पण मंगोलियन झाक असलेल्या लोकांची संख्या लक्षणीय झाली. लोक त्यांना परदेशी घुसखोर म्हणत. या लोकांमुळे वस्ती अधिकच धोकादायक होऊन गेली. हळूहळू गावातील मुली अचानक अदृश्य झाल्याच्या बातम्या नगरात पसरत होत्या. काही ठरावीक दिवशी त्या वस्तीतून उन्माद आल्यासारख्या ठरावीक घोषणा देत तरुण रस्त्यावर येत असतं. पोलिस, प्रशासन आणि कायदेशीर वस्तीतील जनता संयम राखत असे. जणू धार्मिक आणि जातीय सौहार्द ठेवण्याची जबाबदारी फक्त कायदेशीर वस्तीतील बहुसंख्य असलेल्या नागरिकांचीच असावी. आता नगरातील नागरिक, प्रशासन, लोकप्रतिनिधी, पत्रकार आपल्याच निष्काळजी आणि बुळ्या वृत्तीने आपल्याच कर्माचे भोग म्हणून तळतळाट करीत, पण काहीही न करता गप्प बसून राहात.

असेच केव्हातरी त्या नगरात निवडणुकी झाल्या. लोकांनी घराबाहेर पडून भरभरून कायदेशीर नागरिकांची वा बहुसंख्य असलेल्या हिंदूंची बाजू घेणाऱ्या पक्षाला आणि नेत्याला मतदान केले. बहुसंख्य लोकांच्या हिताचा विचार करणारा पक्ष ८० टक्के जागा जिंकून निवडून आला. या पक्षाने परदेशी घुसखोरांना शोधून परत पाठविण्याची मोहीम हाती घेतली. एक दिवस नव्या नेत्याच्या प्रशासनाने सर्व कायदेशीर बाजू आणि कागदपत्रे तपासून वस्तीवर बुलडोझर चालवला. अनेक लोक बुलडोझर चालत असताना तमाशा पाहायला हजर होते. ३० लाख चौरस फूट जागेवरील अतिक्रमण अनेक बुलडोझरच्या साहाय्याने हटविण्यात आले. काही बघ्यांनी आनंदाने टाळ्या पिटल्या. काही लिब्रांडूंना दुःखातिशयाने अश्रू अनावर झाले. प्रशासनाला आपण फार मोठी कामगिरी केल्याचे समाधान वाटू लागले. पोलिस यंत्रणा कोणताही दंगाधोपा न होता कारवाई यशस्वी झाल्याने आपल्या हातातील दंड्याकडे अभिमानाने पाहू लागले.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# विदर्भाच्या काशीची दुरवस्था!

पुरोगामी महाराष्ट्राचा इतिहास सांगताना विदर्भाचा फारसा कुठेच उल्लेख होत नाही. सत्तेच्या पटलावरही विदर्भाच्या वाट्याला गेली कित्येक वर्षे उपेक्षाच आली आहे. पश्चिम महाराष्ट्र, खान्देश, मराठवाडा या भागातच विकासाला आजवर प्राधान्य देण्यात आले. विदर्भ मात्र गरीबच राहिला. दिल्ली, मुंबईतल्या सरकारला विदर्भात काय काय घडतं हे माहिती आहे का? असे खेदाने म्हणावे लागते आणि हीच खरी वस्तुस्थिती देखील आहे. म्हणूनच विदर्भात कधी पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या धार्मिक स्थळांचा विकास होऊ शकला नाही. विदर्भात अनेक धार्मिक स्थळे अशी आहेत की, ज्यांना पुरातन काळापासून तीर्थस्थळाचे पावित्र्य प्राप्त झाले आहे. मात्र राजकीय अनास्था आणि प्रशासकीय ढीम्म व्यवस्था यामुळे विदर्भाच्या अशा स्थळांना फारसे महत्त्व प्राप्त होऊ शकले नाही. सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात विदर्भाच्या विकासकामांचा अनुशेष भरून काढण्याचा प्रयत्न झाला. विदर्भातील रस्ते व इतर विकासाची कामे या दोन्ही नेत्यांनी करण्यासाठी पुढाकार घेतला. मात्र यापूर्वीच्या सत्तेत असणाऱ्या काँग्रेसी नेत्यांनी विदर्भाच्या विकासाकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यामुळेच विदर्भातील पर्यटनस्थळांचा व तीर्थस्थळांचा विकास होऊ शकला नाही. विदर्भाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मार्कंडा या तीर्थस्थळाची झालेली दुरवस्था अत्यंत क्लेशदायक आहे. उत्तरवाहिनी असलेल्या वैनगंगेच्या तीरावर मार्कंडा येथे प्रसिद्ध पौराणिक शिवलिंग आहे. खजुराहोच्या काळातील शिल्पाने नटलेले शिवलिंगाचे मंदिर पुरातत्त्व विभागाच्या नाकर्तेपणामुळे खितपत पडले आहे. महाशिवरात्रीनिमित्त मार्कंडा येथे १५ दिवसांची मोठी जत्रा भरते. या जत्रेला दूरवरून भाविक येतात. चंद्रपूर, गडचिरोली या दोन जिल्ह्यांतील लाखो भाविक मार्कंडा नगरीत महाशिवरात्रीच्या निमित्ताने येतात. मात्र त्यांना राहण्यासाठी अद्याप मार्कंडानगरीत प्रशासनाने कुठलीही व्यवस्था केलेली नाही. या ठिकाणी असलेले विश्वस्त मंडळ सुद्धा मार्कंड्याच्या विकासासाठी फारसे प्रयत्न करताना दिसत नाही. महाराष्ट्रातील इतर मंदिरांमध्ये येणाऱ्या भाविकांना थांबण्यासाठी भक्तनिवासाच्या सोयी आहेत. मात्र मार्कंडानगरीत एक मोडकीतोडकी धर्मशाळा सोडली तर दुसरे राहण्याजोगे ठिकाण नाही. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत दिग्गज लोकप्रतिनिधी असतानासुद्धा मार्कंडानगरीत कुठल्याही सोयी निर्माण होऊ शकल्या नाहीत, यापेक्षा दुसरे मोठे दुर्दैव नाही. महाशिवरात्रीनिमित्ताने मार्कंडानगरीत जत्रेसाठी व शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविक येत असल्याने जिल्हा प्रशासनामार्फत तात्पुरत्या सोयी करण्यात येतात. मात्र त्यानंतर या नगरीकडे वर्षभर प्रशासन ढुंकूनही बघत नाही. विदर्भाची काशी म्हणून लौकिकास आलेल्या मार्कंडानगरीच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात प्रशासनाला, शासनाला आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनासुद्धा अपयश आले आहे. गडचिरोली जिल्ह्यात १० वर्षे भाजपाचे अशोक नेते यांनी खासदारकी उपभोगली. यापूर्वी हंसराज अहिर खासदार होते. त्यांच्याआधी काँग्रेसचे नरेश पुगलिया खासदार होते. याशिवाय गडचिरोलीचे खासदार म्हणून मारोतराव कोवासेंनी सुद्धा काम पाहिले आहे. या जिल्ह्याचे भूमिपुत्र म्हणून माजी मंत्री तथा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्याकडे बघितले जाते. मात्र या साऱ्यांनीसुद्धा मार्कंडाच्या विकासासाठी केवळ थातुरमातुर कामे करून वेळ मारून नेली आहे. भाजपाचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी कधी-कधी मार्कंडानगरीच्या विकासाचा मुद्दा ऐरणीवर आणण्याचा प्रयत्न केला. मात्र तेदेखील फारसे काही करू शकले नाही. या साऱ्यांच्या प्रयत्नांना पुरातत्त्व विभागाचा अडसर आला आणि इथेच मार्कंडा नगरीच्या विकासाची गाडी थांबली. विदर्भाची काशी अतिशय दुरवस्थेत आहे. या ठिकाणी हिंदू धर्माच्या अनेक धार्मिक विधी पार पाडल्या जातात. या स्थळाला मोक्ष स्थान म्हणून दर्जा दिला आहे. या ठिकाणी नारायण नागबळीसारख्या धार्मिक विधी पार पाडल्या जातात. त्या अर्थाने मार्कंडा नगरीला तीर्थस्थळाचा दर्जा दिला जातो. मात्र या ठिकाणी या विधी पार पाडण्यासाठी व्यवस्थित आसनव्यवस्था नाही. घाटावर उतरण्याकरिता पायऱ्यासुद्धा नीट नाहीत. अनेक छोट्या-छोट्या गोष्टी ज्या करता येण्यासारख्या आहेत, त्या सुद्धा प्रशासनाने केल्या नाहीत. मागील चार वर्षांपासून शिवलिंगाच्या मंदिर जीर्णोद्धाराचे काम रखडले आहे. पुरातत्त्व विभागाकडून हे मंदिर नव्याने उभारण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र ते अद्याप पूर्ण होऊ शकले नाही. दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्ताने विदर्भाची काशी चर्चेत येते. यात्रा संपली की, पुन्हा या काशीकडे साऱ्यांचेच दुर्लक्ष होते. विदर्भाच्या काशीचा ऐतिहासिक वारसा जपण्याची गरज आहे. निदान गडचिरोलीच्या लोकप्रतिनिधींनी तरी हा वारसा जपण्यासाठी पाऊल उचलायला हवे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# शशी थरूर कोणती भूमिका घेणार?

केरळमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर सध्या आपल्या वक्तव्यांनी चर्चेत आले आहेत. थरूर तसेही नेहमीच चर्चेत असतात. आपल्या कृतीने आणि वक्तव्याने अनेकवेळा वादग्रस्तही ठरत असतात. पण त्यांनी नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन् यांची प्रशंसा करून नव्या वादाला तोंड फोडले आहे. थरूर यांनी मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याचे स्वागत करत यामुळे दोन देशांतील संबंध आणखी दृढ होतील, असे म्हटले होते. दुसरीकडे केरळमध्ये गुंतवणुकीला अनुकूल वातारण तयार केल्यामुळे तसेच तेथील स्टार्टअपची संख्या वाढवल्याबद्दल केरळचे मुख्यमंत्री विजयन् यांचे एका लेखातून कौतुकही केले होते. थरूर यांच्या या वागणुकीबद्दल केरळ प्रदेश काँग्रेसने त्यांना लक्ष्मणरेषा न ओलांडण्याचा सल्लाही दिल्याचे समजते.

नुकतीच त्यांनी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबतची आपली एक जुनी सेल्फी जारी केली. यातून आपण भाजपाशी जवळीक साधू शकतो, असा इशारा त्यांनी दिल्याचे मानले जाते. थरूर गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसच्या नेतृत्वावर नाराज आहेत, आपल्याला पक्षात महत्त्व मिळत नाही, जबाबदाऱ्या दिल्या जात नाही, असा त्यांचा आक्षेप आहे. आपली हीच नाराजी त्यांनी एकाचवेळी डाव्या आणि उजव्या आघाडीच्या नेत्यांची प्रशंसा करत दाखवून दिली आहे. मी काँग्रेसचा आहे, काँग्रेससोबतच राहणार आहे, मात्र पक्ष मला जबाबदारी देत नसेल तर माझ्यासमोर अनेक पर्याय आहेत, असे सांगत त्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाला एकप्रकारे इशारा दिला आहे.

पुढील वर्षी केरळ विधानसभेची निवडणूक आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आपल्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करावे, अशी त्यांची अपेक्षा आहे. मात्र काँग्रेस पक्ष त्यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करण्यास फारसा उत्सुक नाही, त्यामुळे थरूर यांचा हा नाराजी व्यक्त करत काँग्रेसच्या नेतृत्वावर दबाव आणण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जाते. काही दिवसांपूर्वी थरूर यांनी दिल्लीत काँग्रेसच्या नेतृत्वाची भेट घेतली होती. पण त्यातून त्यांना अपेक्षित असे फारकाही साध्य झाले नाही. प्रदेश काँग्रेसजवळ सक्षम नेतृत्व नाही, राज्यातील मुख्यमंत्रिपदाच्या सर्वेक्षणात अन्य नेत्यांपेक्षा आपल्याला जास्त लोकांची पसंती असल्याचा दावाही थरूर करतात. काँग्रेसच्या नेतृत्वाने राज्यात नेतृत्वबदल केला नाही तर काँग्रेसला सलग तिसऱ्यांदाही विरोधी पक्षात बसावे लागेल, असा इशाराही ते देतात. मात्र काहीही झाले तरी थरूर पक्ष सोडणार नाही, फक्त सक्रिय राजकारणातून बाहेर पडत लेखन आणि भाषणाच्या कार्यक्रमात स्वतःला गुंतवून घेतील, असा दावा त्यांचे निकटवर्तीय करतात.

थरूर काँग्रेस पक्ष सोडतील का, हे आताच सांगता येणार नसले तरी त्यांनी मोदी आणि पिनाराई विजयन् यांची प्रशंसा करत जसा काँग्रेसच्या नेतृत्वावर दबाव आणला, तसाच अप्रत्यक्षपणे भाजपा आणि डाव्या पक्षांवरही आणला आहे. तुम्ही मला माझ्या अटी आणि शर्तीवर प्रवेश देणार नसाल तर माझ्यासमोर दुसरा पर्यायही आहे, असे ते सांगत आहे. आणि म्हणूनच एकाचवेळी डाव्या आणि उजव्या विचारसरणीच्या नेत्यांची प्रशंसा करत आहेत, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. मुळात कोणताही राजकारणी माणूस जे बोलतो ते करतो, असे नाही, आणि जे करतो, ते बोलतोच असेही नाही.

राजकारणात येण्याच्या आधी थरूर संयुक्त राष्ट्रात मोठ्या पदावर होते, त्यामुळे काँग्रेस पक्षातील विदेश धोरणाचे ते तज्ज्ञ मानले जातात. इंग्रजी भाषेवर असलेले प्रभुत्व ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. उच्चभ्रू वर्तुळात त्यांचा वावर असतो. पेज थ्रीच्या पार्ट्यांत ते नेहमीच दिसून येतात. त्यामुळे थरूर हे तळागाळातील तसेच लोकप्रिय नेते कधीच मानले जात नव्हते. सर्वसामान्य माणसाशी त्यांचा संबंध कधी आला नाही.

संयुक्त राष्ट्राची नोकरी सोडत २००९ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेसने त्यांना केरळच्या तिरुवनंतपुरम् मतदारसंघातून लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरवले. पहिल्याच निवडणुकीत विजयी झाल्यानंतर डॉ. मनमोहनसिंग सरकारमध्ये ते राज्यमंत्रीही झाले. केरळच्या तिरुवनंतपुरम् लोकसभा मतदारसंघातून ते सलग चारवेळा जिंकले आहेत, त्यामुळे आता त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. त्यांना मुख्यमंत्रिपदाचे स्वप्न पडू लागले आहे. मात्र काँग्रेसचे संघटन महासचिव के. सी. वेणुगोपाल, रमेश



चेन्नीथला आणि सुधाकरसारख्या केरळमधील नेत्यांचा थरूर यांना विरोध आहे, त्यामुळे काँग्रेसचे नेतृत्व त्यांच्याबाबतचा निर्णय घेऊ शकत नाही. काँग्रेस पक्षातील सद्यःस्थितीला टोला लगावताना कवी थॉमस ग्रे यांचे एक वाक्य सांगून थरूर यांनी संभ्रम वाढवला आहे. 'ज्याठिकाणी अज्ञानातच आनंद असतो, तिथे बुद्धिमान असणे मूर्खपणाचे असते' असे ते म्हणतात.

थरूर यांना काँग्रेस पक्षाने राजकारणात आणले असले तरी नंतर थरूर यांनी आपल्या अनेक विधानांनी काँग्रेस पक्षाला अडचणीतही आणले आहे. 'द ग्रेट इंडियन नॉव्हेल' या थरूर यांच्या कादंबरीवर काँग्रेसचे नेतृत्व नाराज आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे नेतृत्व धृतराष्ट्राकडे गेले, असा उल्लेख यात आहे. एकप्रकारे थरूर यांनी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना धृतराष्ट्र म्हटले होते. याचा उल्लेख करत माजी केंद्रीय मंत्री भाजपाचे अनुराग ठाकूर यांनी गांधी घराण्यावर जोरदार हल्ला चढवला होता.

शशी थरूर काँग्रेस पक्षावर नाराज आहेत की काँग्रेस पक्ष त्यांच्यावर नाराज आहे, हा प्रश्न आधी अंड की आधी कोंबडी यासारखा आहे. थरूर अनेकवेळा पक्षाच्या अधिकृत भूमिकेच्या विरोधात भूमिका घेत काँग्रेस पक्षाला अडचणीत आणत असल्याचा त्यांच्यावर आरोप केला जातो. त्यामुळे काँग्रेसचे नेतृत्व त्यांच्यावर नाराज असल्याचे समजते. त्यामुळे काँग्रेसचे नेतृत्व त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करणार का, थरूर यांना थांबवण्यासाठी काँग्रेसने पुढाकार घेतला नाही तर थरूर नेमकी कोणती भूमिका घेणार, थरूर यांनी पक्ष सोडल्यामुळे काँग्रेसचे किती नुकसान होणार, ते भाजपामध्ये जाणार का, थरूर भाजपात आल्यामुळे भाजपाचा किती राजकीय फायदा होणार, महत्त्वाचे म्हणजे भाजपाचे नेतृत्व त्यांना आपल्या पक्षात सामावून घेणार का, याकडे नजीकच्या काळात सगळ्यांचे लक्ष राहणार आहे.

९८८१७१७८१७

## पानगळीच्या निमित्ताने!

निसर्ग सुंदर आहे आणि निसर्गातील प्रत्येक ऋतू देखील मनभावन आहे. उन्हाळा रूक्ष असला तरी विविधरंगी फुलांनी सृष्टी बहरून जाते. पावसाळ्यात तर हिरवाईच्या विविध छटा मन मोहून टाकतात आणि हिवाळा तर रंग गंधयुक्त बहर घेऊन येतो.

प्रत्येक ऋतूची एक वेगळी ओळख असतेच तशी आता सर्वत्र सुरू असलेली पानगळ. पानगळ देखील किती महत्त्वाची आहे हे निसर्ग सांगून जातो. पानगळ झाली नाही तर पुन्हा बहर येणार तरी कसा?

सर्वत्र पिवळी सोनेरी पाने धरतीवर अंथरली जातात. कधी पिवळ्या केशरी फुलांच्या पाकळ्यांचा गालिचा धरतीवर अंथरला जातो. पाऊल वाटेवर चालताना हा पाचोळा एक अनोखा नाद उत्पन्न करतो. वास्तविक ही नैसर्गिक क्रिया म्हणजे निसर्गाने भूमीवर केलेले आच्छादन आहे. हा पालापाचोळा म्हणजे झाडांचा वर्षभराचा अन्न द्रव्यांचा साठा आहे .हाच पाचोळा जीवाणूंच्या माध्यमातून कुजून झाडांना अन्न मिळते.

स्वच्छ भारत हे आपले स्वप्न आहे पण ते प्रत्यक्षात खरे करायचे तर या पालापाचोळ्याचा योग्य उपयोग करून आपले उद्दिष्ट साध्य करता येईल. एक लहानशी कृती पर्यावरण रक्षणाला हातभार लावणारी ठरेल. पानगळ आहे म्हणूनच बहर देखील आहे तो खरोखरीच मनाला मोहून टाकतो

संगीता वाईकर/ ९९२२५०४७९४

## वाचक पत्रे

### कुंभमेळ्यात लोक आकर्षित का होतात?

प्रयागराजमधील कुंभमेळ्याला जगभरातून भाविक मोठ्या संख्येने आकर्षित होतात. यामागची काही प्रमुख कारणे आढळतात धार्मिक महत्त्व : प्रयागराजमध्ये गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा संगम होतो, ज्याला त्रिवेणी संगम म्हणतात. हिंदू धर्मात या संगमाला विशेष महत्त्व आहे.&nb sp; कुंभमेळ्यात पवित्र स्नानाला विशेष महत्त्व आहे, ज्यामुळे पापक्षालन होते आणि मोक्ष मिळतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. ज्योतिषीय महत्त्व : कुंभमेळ्य चे आयोजन ज्योतिषीय गणनेवर आधारित असते. विशिष्ट ग्रहस्थितींमध्येच कुंभमेळा भरतो, ज्यामुळे त्याला विशेष महत्त्व प्राप्त होते. सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अनुभव : कुंभमेळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, तो एक सांस्कृतिक आणि आध्यात्मिक उत्सव आहे.&nb sp; यात विविध धार्मिक विधी, प्रवचने, कीर्तने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, ज्यामुळे भाविकांना एक वेगळा अनुभव मिळतो. १४४ वर्षांनी महाकुंभ येणार असल्याने आपल्या आधीच्या पिढीला आणि येणाऱ्या पिढीला हा योग मिळणार नाही. डिजिटल माध्यमांनी याचा जोरदार प्रचार केला. व्हीव्हीआयपी आणि सेलिब्रिटीसुद्धा महाकुंभात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आले.

जागतिक स्तरावर महत्त्व : महाकुंभम `ळ्याचे महत्त्व केवळ भारतातच नाही तर जगभरात आहे. युनेस्कोने या उत्सवाला 'मानवतेचा अमूर्त सांस्कृतिक वारसा' म्हणून मान्यता दिली आहे. या सर्व कारणांमुळे प्रयागराजचा कुंभमेळा जगभरातील भाविक, पर्यटक आणि अभ्यासक यांना आकर्षित करतो.

अनंत ताम्हणे / ९४२२६१४७६२

# मंगळवेढा नगरपालिकेच्या गावठाण भागात अतिक्रमण

**मुख्याधिकाऱ्यांच्या भूमिकेबद्दल संताप; कामात हलगर्जीपणा करणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांच्या निषेधार्थ गुरुवारी करणार हलगीनाद आंदोलन**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२६ फेब्रुवारी-**

मंगळवेढा नगरपरिषद हददीतील गावठाण भाग मध्ये झालेल्या अतिक्रमणावर कारवाई न करता मुख्याधिकारी व कर्मचारीवर्ग चालढकलपणा करतात उलट अतिक्रमण विरोधी कारवाई पुढे नेत अतिक्रमणधारकास मदत करतात ही भावना माळी गल्लीतील नागरिकांची निर्माण झाली आहे, त्यामुळे या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या मुख्याधिकारी व इतर कर्मचाऱ्यांच्या निषेधार्थ गुरुवार दि.२७ रोजी नगरपालिकेवर हलगीनाद आंदोलन करण्याचा इशारा परिसरातील रहिवाशांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

सांगोला नाका येथून काही अंतरावर असणाऱ्या एका महाविदयालया समोर एक इसम गेली १ वर्षापासून टप्याटप्याने अतिक्रमण करत असून, आतापर्यंत त्याठिकाणी तीन गाळयाचे पत्राशेड बनवले असून जवळपास १ एकर परिसराला तारेचे कंपाउंड केले असून माझीच जागा असल्याच्या अविर्भावात तो सध्या वावरत आहे. सदरच्या अतिक्रमणाबाबत परिसरातील नागरिकांनी याअगोदर मंगळवेढा नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना वारंवार माहिती देवून परिसरातील नागरिकांच्या सहयानिशी निवेदनही दिले आहे. सदर जागा ही गावठाण हददीतील असल्याचे मुख्याधिकारी यांनी मान्यही केले होते. त्यानुसार दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी नगरपालिकेच्यावतीने सदर अतिक्रमणधारकास ५ दिवसांचे आत अतिक्रमण काढण्याची नोटीस देखील बजावली होती. परंतु अजूनही त्यावर कारवाई झालेली नसून, मुख्याधिकारी हे अतिक्रमण काढणेस टाळाटाळ करीत असून व वेळकाढूपणा व चालढकल करीत आहेत. अतिक्रमणाबाबत मुख्याधिकारी यांची भूमिका शंकास्पद असल्याने त्यांच्याबद्दल या परिसरातील नागरिकांमधून नाराजी व्यक्त केला जात आहे.

# शेतकऱ्यांसाठी सोनालिका चीता लाँच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

भारतातील क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर ने 'चीता' श्रेणीतील ट्रॅक्टर सादर केले आहेत.यांचे डिझाईन नवीन लूकसह करण्यात आले असून त्यामध्ये शक्ती,शैली आणि प्रगत तंत्रज्ञानाचा परिपूर्ण मिलाफ आहे.

'चित्त्यासारखी चपळाई आणि वेगा'ची हमी देणाऱ्या या नवीनतम हेवी-ड्युटी ट्रॅक्टर मॉडेल्समध्ये सोनालिका चीता डीआय ३२, सोनालिका चीता डीआय ३० ४डब्ल्यूडी आणि सोनालिका चीता एमएम १८ ट्रॅक्टर यांचा समावेश आहे.यावेळी विवेक गोयल म्हणाले, नाविन्यपूर्णतेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची उन्नती करून त्यांना सुखी करण्यावर आमचा सातत्याने असलेला भर नवीनतम सोनालिका चीता ट्रॅक्टर दृढ करतात.

# श्रमदानातून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, ज्ञानसंवर्धनाचा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ फेब्रुवारी-**

श्रम हीच साधना, सेवा हीच आराधना! या ध्येयाने प्रेरित होत, बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी आणि राष्ट्रीय सेवा योजना विद्यमाने आगळगाव येथे सुरु असलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा चौथा दिवस उत्साहात संपन्न झाला. यामध्ये स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण व संवर्धन, तसेच प्रेरणादायी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवले. गावकऱ्यांनीही या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद दिला.

वृक्षारोपण व संवर्धन- निसर्ग रक्षणाचा संकल्प पर्यावरणाचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. माजी वन अधिकारी नजीम मुलानी सरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी झाडांची लागवड करुन त्यांना पाणी घालणे, गवत काढणे, खुरपणी करणे व झाडांच्या




मुळांना खत घालणे अशी देखभाल केली. निसर्ग वाचवा, भविष्य घडवा! हा संदेश देत विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. याचबरोबर दुपारच्या मार्गदर्शनपर सत्र: ज्ञानसंवर्धनाचा संदेश शिबिराच्या मुख्य कार्यक्रमात प्रा अशोक सावळे सरांनी विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांवर आधारित कथा सांगून प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष आगळगाव विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन उकिरडे सर यांनी वाचाल तर वाचाल या संकल्पनेवर भर देत विद्यार्थ्यांना दररोज एक तरी पुस्तक वाचण्याचा संकल्प सोडण्यास प्रवृत्त केले. याचबरोबर प्रमुख पाहुणे यांनी स्वयंसेवकांसाठी प्रेरणादायी संदेश दिले जसे की, श्रमदान हेच खरे दान! स्वच्छता, पर्यावरण आणि शिक्षण- विकासाचा मूलमंत्र! निसर्ग जपला तरच भविष्य उज्ज्वल राहील! शिक्षणाबरोबरच सामाजिक जबाबदारी ओळखूया! आजच्या यावेळी प्रा. एम. ए. ढगे, प्रा. के. एम. माळी, प्रा. एस एन. सारफळे, प्रा. डी. एन. कापसे, प्रा. वैजयंता पाटील, समाधान फोके उपस्थित होते. प्रास्ताविक स्वयंसेविका साक्षी कदम यांनी केले, शर्वरी कदम यांनी आभार तर प्रथमेश दळवी, स्वयंसेविका मीनाक्षी यांनी सूत्रसंचालन केले.


**मध्य रेल्वे**

**मध्य रेल्वे विविध बांधकामे**

भारताचे राष्ट्रपती, मुख्य अभियंता (C) RSP, सेंट्रल रॉलवे, G. M. Bullding, 2nd Floor, CSMT मुंबई - 400 001 यांच्या वतीने आणि त्यांच्या वतीने विविध बांधकाम कार्ये खालील कामासाठी http://www.ireps.gov.in या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर ई-बिड्स आमंत्रित करतात. निविदा सूचना क्र. आणि तारीख: Cons-RSP-02-2025 दिनांक 24.02.2025 कामाचे नाव: ROB/ RUB/ LHS/ FOB/ पादचारी भुयारी मार्ग/ रोड वळवण्याच्या विविध ठिकाणी प्रकल्प पर्यवेक्षण सेवा प्रदान करणे आणि प्लॅन यूनिआरएसपीसीए 30 आरएसपीसीए अंतर्गत लेव्हल क्रॉसिंगच्या बदल्यात इतर सहाय्यक कामे महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश राज्यात काम ाची अंदाजे किंमत रु. 11,07,11,523.96 बोली सुरक्षा रु.: 7,03,600 पूर्ण होण्याचा कालावधी: 42 महिने तारीख आणि बंद होण्याची वेळ: 08/04/2025 रोजी 11.00 वाजता. 1. वरील ई-निविदा सूचनेची संपूर्ण माहिती http://www.ireps.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे 2. वरील निविदेसाठी ई-बिड्स व्यतिरिक्त इतर निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. 3. वेळोवेळी जारी केलेली निविदा कागदपत्रे आणि शुद्धीपत्र निविदा उघडण्याच्या किमान 15 दिवस अगोदर वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि या वेबसाइटवर पाहता येतील. 812

अनधिकृतपणे रेल्वे रुळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.



**मध्ये रेल्वे**

**ई-लिलाव सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्यावतीने प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक, मार्च-2025 महिन्यात खालीलप्रमाणे भंगार विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित करतील. सुचना: भविष्यात वृत्तपत्रात ई-लिलाव कार्यक्रमाचे प्रकाशन बंद केले जाईल आणि खरेदीदारांनी फक्त मध्य रेल्वे IREPS वेबसाइट पत्ता- www.ireps.gov.in ला लिंक करावे.

| लिलाव आयोजित करणारे अधिकारी | लिलाव तारीख व दिवस | | | | | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| सिनी डीएमएम/एनजीपी | ०३/०३/२०२५ सोमवार | १०/०३/२०२५ सोमवार | १७/०३/२०२५ सोमवार | २१/०३/२०२५ शुक्रवार | २८/०३/२०२५ शुक्रवार | ७२१९६१२७५० |
| सिनी डीएमएम/बीएसएल एमएमआर डेपो सह. | ०४/०३/२०२५ मंगळवार | ११/०३/२०२५ मंगळवार | २०/०३/२०२५ गुरुवार | २४/०३/२०२५ सोमवार | २८/०३/२०२५ शुक्रवार | ७२१९६११७५१ |
| सिनी डीएमएम/पीए | ०५/०३/२०२५ बुधवार | १२/०३/२०२५ बुधवार | १७/०३/२०२५ सोमवार | २१/०३/२०२५ शुक्रवार | २८/०३/२०२५ शुक्रवार | ७२१९६१३७५० |
| सिनी डीएमएम/बीबी | ०६/०३/२०२५ गुरुवार | ११/०३/२०२५ मंगळवार | १८/०३/२०२५ मंगळवार | २५/०३/२०२५ मंगळवार | २८/०३/२०२५ शुक्रवार | ८८२८११९७५० |
| सिनी डीएमएम/एसयूआर | ०७/०३/२०२५ शुक्रवार | १३/०३/२०२५ गुरुवार | १९/०३/२०२५ बुधवार | २६/०३/२०२५ बुधवार | २८/०३/२०२५ शुक्रवार | ७२१९६१४७५० |
| डीवाय,सीएमएम (टीआर.) एचक्यू एसएमएम (जी) सीआरडीकरिता | ०५/०३/२०२५ बुधवार | १२/०३/२०२५ बुधवार | १९/०३/२०२५ बुधवार | २६/०३/२०२५ बुधवार | -- -- | ८८२८११०७६१ |
| डीवाय,सीएमएम (एम) पीआर | ०३/०३/२०२५ सोमवार | ०८/०३/२०२५ शनिवार | १३/०३/२०२५ गुरुवार | २१/०३/२०२५ शुक्रवार | २८/०३/२०२५ शुक्रवार | ८८२८११९७५५ |
| डीवाय, सीएमएम (सीडब्ल्यूई) एमटीएन | ०१/०३/२०२५ शनिवार | ०६/०३/२०२५ गुरुवार | १२/०३/२०२५ बुधवार | २०/०३/२०२५ गुरुवार | २८/०३/२०२५ शुक्रवार | ८८२८११९७७० |
| डीवाय,सीएमएम (टीआर.)एचक्यू एएमएम/एचबीएचआर करिता | ०५/०३/२०२५ बुधवार | १२/०३/२०२५ बुधवार | १९/०३/२०२५ बुधवार | २६/०३/२०२५ बुधवार | -- -- | ८८२८११०७६१ |
| डीवाय,सीएमएम (एसीएल) बीएसएल | ०४/०३/२०२५ मंगळवार | १०/०३/२०२५ सोमवार | १७/०३/२०२५ सोमवार | २२/०३/२०२५ शनिवार | २८/०३/२०२५ शुक्रवार | ७२१९६११७५० |

**टीप**: आवश्यक असल्यास पात्र लॉटसाठी लिलावाच्या मूळ तारखेपासून आणि वेळेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी पूरक लिलाव आयोजित केला जाईल. कोणताही पूरक लिलाव स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार रद्द करण्याचा अधिकार रेल्वे प्रशासन राखून ठेवतो. टीप: **ए)** ई-लिलावमधून कोणतीही लॉट काढण्याचा अधिकार रेल्वे राखून ठेवते. त्यानंतरच्या लिलावामध्ये कोणत्याही डेपो/विभागाच्या कोणत्याही लॉटचा कोणत्याही योग्य पद्धतीने लिलाव करण्याचा अधिकार रेल्वेने राखून ठेवला आहे. तसेच मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या पुढील लिलावात कोणत्याही डेपो/विभागाच्या न विकल्या गेलेल्या लॉटची विक्री केली जाऊ शकते. **बी)** शासनाप्रमाणे धोरण, जेथे भंगार सामग्रीच्या पुनर्वापरामध्ये पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्यांचा समावेश आहे, अशा लॉटची विक्री केवळ केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB)/ राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (SPCB) द्वारे जारी केलेले वैध परवाने असलेल्या अधिकृत बोलीदारांना केली जाईल. **सी)** ई-लिलाव कॅटलॉग www.ireps.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध असेल. **डी)** ई-लिलाव, डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि सहभाग इत्यादींबाबत काही सहाय्य आवश्यक असल्यास, कृपया वरीलप्रमाणे संबंधित लिलाव संयोजक अधिकाऱ्यांशी संपर्क साधा किंवा Dy.CMM/Sales/HQ, मोबाईल नं. 8828110761, ईमेल पत्ता- dycmm.s.cstm@gmail.com किंवा dycmms@cr.railnet.gov.in

**मुख्य साहित्य व्यवस्थापकासाठी**

804 अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे



**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)**

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**शाखा कार्यालय:** ऑफिस क्रमांक एफ-३, पहिला मजला, कनाले प्लाझा, डफरिन चौक,रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१
**वेबसाइट:** www.truhomefinance.in

**प्रतिकात्मक ताबा सूचना**

जसे की , निम्नस्वाक्षरीदार हे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात ) प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३ (१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार / सह-कर्जदार / तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती. कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि सदर नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून खाली नमूद केलेल्या रकमेसाठी व्याजासह शुल्क आकारले जाईल.
सुरक्षित मत्ता सोडवून घेण्यासाठी , उपलब्ध वेळेच्या संबंधात कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले आहे,

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१. श्री. औदुंबर दिगंबर सर्वेक्षण (कर्जदार)**
**२. श्रीमती कोमल औदुंबर सर्वेक्षण (कर्जदार)**
**सर्वांचा येथे निवासाचा पत्ता आहे: सोलापूर विद्यापीठ १२०,विद्या नगर, शेलागी, गणेश मंदिर मुळेगाव नॉर्थ सोलापूर, महाराष्ट्र-४१३००६ आणि भूखंड क्र.१२०,विद्या नगर, घर क्रमांक ३७८ पार्ट, सोलापूर, उत्तर सोलापूर, महाराष्ट्र- ४१३००६**
**मागणी सूचनेची तारीख: १०/१०/२०२४ प्रतिकात्मक ताबा तारीख: २० फेब्रुवारी २०२५**

**थकबाकी रक्कम**

दिनांक ०९-१०-२४ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000416 अंतर्गत रु. २६,१३,३०७/- (रुपये सव्वीस लाख तेरा हजार तीनशे सात फक्त) पूर्ण आणि अंतिम पेमेंटच्या तारखेपर्यंत वरील रकमेवर करारानुसार आणि/किंवा SHFL/NHB/RBI ने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार पुढील व्याजासह, आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादींसह.
मागणी सूचना दिनांक: १६/१०/२०२४ सांकेतिक ताबा तारीख: २६ डिसेंबर २०२४

**मालमत्तेचे वर्णन**

स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, भूखंड क्रमांक १२०, शहर सर्वेक्षण क्रमांक ३७८ असलेला, सर्वेक्षण क्रमांक ११४/१/बी पैकी ९०.०० चौ. मीटर क्षेत्रफळ असलेला, शेळगी, सोलापूर, उत्तर सोलापूर, महाराष्ट्र - ४१३००६ येथे स्थित.
खालीलप्रमाणे सीमा: पूर्व: प्लॉट क्रमांक १२१, पश्चिम: प्लॉट क्रमांक ११९ आणि १२०, दक्षिण: रस्ता, उत्तर: प्लॉट क्रमांक १२३

ठिकाण - सोलापूर | स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
दिनांक - २०-०२-२०२५ | ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )



Classifieds

**विकणे आहे**

**सैफुल ओमगर्जना चौक, प्लॉट नं. १७ व १८ प्रत्येकी ३,००० स्क्वे. फूट, खुला N.A. क्लिअर टायटल प्लॉट विकणे आहे.**
**संपर्क : ९७६६१५५२१४ ८२७७४९९६२९**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



॥ जो जे वांछिल तो ते लाहो ॥

मनोरमा परिवार अंतर्गत

**अंकुर सर्व व्यावसायिक नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

**श्री. राचण्णा माळसिध्दप्पा कटारे** — व्हा. चेअरमन (मो. ९४२१०७५४९८)
**प्राची अनिल गोसावी** — व्यवस्थापिका (मो. ७०५८९५५९८०)



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर व तालुका परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यू.पल हद्दीतील जुना गट नं. ७९३, नविन गट नं. ७९९ क्षेत्र ०८ हे. ८९ आर. व ६९ चौ.मी. या रहिवाशी विभागात समाविष्ट झालेल्या व असलेल्या भुखंडापैकी भुखंड क. १६ याचे क्षेत्रफळ १८६.०१ चौ.मी., आकार ०० रु. ०१ पैसे असा भुखंड चे बार्शी नगरपरिषद बार्शीने महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमांतर्गत बार्शी नगरपरिषदेने जा.क्र. स्थापत्य ६७४ दि. ०३/०२/२०२५ रोजी गुंठेवारी झालेला असून, तो हेमा उर्फ निता शहजादा सय्यद यांच्या खरेदो मालकी वहिवाटीचा असून, त्याचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे, असा सदरचा प्लॉट त्यांनी स्वतःचे कायदेशीर गरजेखातर विक्रीस काढला व मध्यस्थामार्फत तशा वाटाघाटी व बोलणी होऊन खाली सही करणार आमचे अशिल यांना कायमखुष खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे व उरलेल्या खरेदी किंमतीपेको इसार म्हणून नाममात्र रक्कम घेतलेली आहे व हेमा उर्फ निता शहजादा सय्यद यांनी मिळकत निर्वेध व निजोखमी असून, सदर मिळकतीबाबत कुठल्याही न्यायालयात कसलाही वाद नसून, सदर प्लॉटवर आरक्षण व संपादन नाही व यापुर्वी कोणाशीही कसलाही व्यवहार झालेला नाही, अशी खात्री दिली आहे. तसेच गुंठेवारीकामी सर्व कायदेशीर कागदपत्रांची माहिती देऊन खरी कागदपत्रे सादर केली असून, विक्री करावयाचा भूखंड आहे हा रहिवाशी विभागात समाविष्ट असून, त्यातील काहीही क्षेत्र बाधीत नाही, अशी पुर्ण खात्री दिलेली आहे.

सबब, वरील प्लॉटबाबत कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार असल्यास खालील पत्यावर संपर्क साधून स्वतःच्या हक्काची पुराव्यानिशी खात्री करुन ८ दिवसात करुन द्यावी. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून जाहीर नोटीस दिली असे. दि. २७/०२/२०२५.

सही/-
अशिलातर्फे ॲड. श्री. रोहित अनिल जोशी
बी.एसस्सी. ऑनर्स, एल.एल.बी.
ब्राह्मण गल्ली, बार्शी
मो. नं. ९९२३३३२३२९



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
आज़ादी का अमृत महोत्सव
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी आहेत आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, 2002 अंमलबजावणी आणि सुरक्षा हिताच्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेले अधिकार (अंमलबजावणी) नियम, 2002, 18/09/2024 रोजी मागणी सूचना जारी करून खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आवाहन केले. आणि हमीदारांनी सदर नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी.
कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि संबंधितांना नोटीस दिली जाते. सर्वसाधारणपणे सार्वजनिक आहे की खाली स्वाक्षरीने खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे कायद्याच्या कलम 13 च्या पोटकलम (4) अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना 20.02.2025 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002.
विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्रच्या रकमेच्या अधीन असेल येथे वर उल्लेख केला आहे.
कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेळेच्या संदर्भात आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- बार्शी** **कर्जदार -** **1. श्री दत्तात्रय आप्पा अलीस आप्पाराव विजागत** ग्रा.पं. घर क्रमांक 236, शेळगाव (व्हळे) ता. बार्शी जि. सोलापूर.413401 **हमीदार-** **2. अप्पा अलीस अप्पाराव विजागत** ग्रा.पं. घर क्रमांक 236, शेळगाव (व्हळे) ता. बार्शी जि. सोलापूर. 413401 **3. श्री. राहुल मरयप्पा कांबळे.** पाटील प्लॉट, शिवाजी नगर बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर 413401 | ग्रा.पं. घर क्रमांक 236, शेळगाव (व्हळे) ता. बार्शी, जि. सोलापूर पिन 413401 श्री दत्तात्रय आप्पा अलीस आप्पाराव विजागत यांच्या नावाने मोजमाप बांधकाम 61.50 चौ.मी. एकूण जमीन क्षेत्र-125.42 चौ.मी. **खालीलप्रमाणे सीमा:-** पूर्व :- शिवाजी विजगताचा प्लॉट पश्चिम :- विठ्ठल विजगताचे प्लॉट दक्षिण :- लाला विजगताचे प्लॉट उत्तर :- 33 रुंद रस्ता | **मागणी सूचना:** दि. 18/09/2024 रु.10,05,844.00/- अधिक लागू न केलेले व्याज 18.09.2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत **सांकेतिक ताबा तारीख:** 20/02/2025 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २५/०२/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
आज़ादी का अमृत महोत्सव
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 01/09/2023 रोजी मागणी सूचना जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.
कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे 21/02/2025 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत.
विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. वर नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्ता.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सूचना तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- जुळे सोलापूर** **कर्जदार -** 1.**श्री. महेश शिवण्णा म्हेत्रे** ब्लॉक क्र.20 योगीराजेंद्र नगर, नूतन हायस्कूल जवळ नेहरू नगर, सोलापूर 413004 2.**सौ. राजश्री महेश म्हेत्रे** ब्लॉक क्र.20 योगीराजेंद्र नगर नूतन हायस्कूल जवळ, नेहरू नगर, सोलापूर 413004 | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन** **मालमत्ता गहाण** प्लॉट नं.20 योगीराजेंद्र नगर, जुना सिटी सर्व्हे क्र. 352/1 नवीन सिटी सर्व्हे क्र. 8/1 नूतन हायस्कूल नेहरू नगर जवळ, सोलापूर 413004 **श्री महेश शिवण्णा म्हेत्रे यांच्या मालकीचे** **सीमा :-** पूर्व : प्लॉट क्र.29 पश्चिम: रस्ता दक्षिण: प्लॉट क्र.21 उत्तर : भूखंड क्र.19 | **मागणी सूचना:** दि.01.09.2023 रु.27,68,354.00/- अधिक 01.09.2023 पासून लागू न केलेले व्याज कर्जाची वसुली होईपर्यंत **प्रत्यक्ष ताबा तारीख:** 21.02.2025 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २५/०२/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
आज़ादी का अमृत महोत्सव
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 03/05/2024 रोजी मागणी सूचना जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.
कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे 25/02/2025 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत.
विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. वर नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्ता.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सूचना तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **कर्जदार:-** **श्री मो. गौस मो. शुकूर कडेचूर** पत्ता - 422 साखरपेठ, नागराज हॉटेल समोर, सोलापूर, महाराष्ट्र-413005 **सह-कर्जदार:-** **सौ. शमशाद मो.गौस कडेचूर** पत्ता - 422 साखरपेठ, नागराज हॉटेल समोर, सोलापूर, महाराष्ट्र-413005 | १. **मालमत्तेचे नोंदणीकृत साधे गहाण-** फ्लॅट क्रमांक F-1, CTS क्रमांक 5521/ मधील अब्दुल रहमान मंझिल कॉन्डोमिनियमचा पहिला मजला, भूखंड क्रमांक 159, नगरपालिका घर क्रमांक २६६, शनिवार पेठ, सोलापूर आणि सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सोलापूर महानगरपालिका क्षेत्र 18 चौ.मी. सुपर बिल्ट अप क्षेत्र. 32.50 चौ.मी. श्री मो. गौस मो. शुकूर कडेचूर यांच्या नावाने **खालीलप्रमाणे सीमा: -** उत्तर- श्री. कय्युम खान CTS क्रमांक 5521/A पूर्व- फ्लॅट क्रमांक F2 पश्चिम- CTS क्रमांक 5520/B मधील मालमत्ता दक्षिण- रस्ता | **मागणी सूचना:** दि. 03.05.2024 रु.16,31,632.49/- अधिक लागू न केलेले व्याज 03.05.2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत **प्रत्यक्ष ताबा तारीख:** 25.02.2025 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २५/०२/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
आज़ादी का अमृत महोत्सव
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 12/02/2024 रोजी मागणी सूचना जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.
कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे 24/02/2025 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत.
विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. वर नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.
कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्ता.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सूचना तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- वळसंग** **कर्जदार -** 1 **श्री. मुस्तफा बागवान** मु.पो. 1071, न्यू पाच्छापेठ, उत्तर सोलापूर, दाजीपेठ, सोलापूर-413005 2. **महिबूब वजीरसाब बागवान** मु.पो. 1071, न्यू पाच्छापेठ, उत्तर सोलापूर, दाजीपेठ, सोलापूर-413005. | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन** **मुस्तफा बागवान यांच्या नावावर मालमत्ता गहाण** भूदेवी टॉवर्समधील फ्लॅट क्रमांक 9, दुसरा मजला, त्याचे अंतिम भूखंड क्रमांक 35, सब प्लॉट क्रमांक 97/2, CTS क्रमांक 10389-A, टीपी क्रमांक 1, न्यू पाच्छापेठ ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. **खालीलप्रमाणे सीमा:-** पूर्व:- रस्ता पश्चिम:- समास जागा दक्षिण:- समास जागा उत्तर :- जिना | **मागणी सूचना:** दि.12.02.2024 रु.27,81,046.00/- अधिक लागू न केलेले व्याज 12.02.2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत **प्रत्यक्ष ताबा तारीख:** 24.02.2025 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २५/०२/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# मराठी भाषा गौरव दिन

## लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# मराठी ही ज्ञानभाषा झाली पाहिजे

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते आणि जेष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन जगात मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेचे स्मरण करत असताना मराठीतील कितीतरी चांगले शब्द काळाच्या ओघात लोप पावले आहेत असे शब्द हुडकून बोली भाषेत त्याचा सर्वांनी वापर केला पाहिजे,केवळ मराठी दिनाच्या निमित्ताने मराठीबद्दल बोलून तिला घासून लख्ख करण्यापेक्षा दरवेळी मराठीच्या अस्तित्वासाठी आपण सर्वांनी झटले पाहिजे. भ्रमणध्वनीवर सध्या मराठी भाषेचे विविध 'ॲप्स'ही आले आहेत अशा तंत्रज्ञानाचा स्पर्श मराठीला झाला असला तरी तिचा वापर राजभाषा, ज्ञानभाषा आणि व्यवहाराची भाषा म्हणून वाढला पाहिजे, अन्यथा इतर भाषांच्या आक्रमणात अमृताची भाषा मागे पडेल.अशी भीती मला वाटते .

मराठी भाषेची खरी घसरण सुरू झाली ती १९९१च्या आसपास. मराठी मंडळींनी मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालायला सुरुवात केली. इंग्रजी भाषेला विरोध करण्याचे कारण नाही. ती जगाची भाषा आहे आणि ती न येऊन चालणारे नाही, हे खरे असले तरी काळाच्या ओघात इंग्रजी भाषाच श्रेष्ठ असे जे अवडंबर माजवले गेले, तिथे मराठीचा ऱ्हास सुरू झाला.

आपला देश बहुसांस्कृतिक असून प्रत्येक मैला गणिक भाषा बदलते आणि म्हणूनच बहुभाषेच्या आधाराने भाषा टिकते आणि विकसित होते. मराठी ही ओळख टिकवणे आपले कर्तव्यच आहे. मराठी ही केवळ साहित्य भाषा म्हणून त्याकडे पाहून चालणार नाही. ती संस्कारभाषा, ज्ञानभाषा आणि व्यवहारभाषा होणे गरजेची आहे. नवे ज्ञानविज्ञान मराठी माध्यमातून सुलभपणे येण्यासाठी भाषा तज्ज्ञां कडून विश्वसनीय आणि प्रमाणभूत साधने उपलब्ध झाली पाहिजे,

अद्ययावत ज्ञाननिर्मितीच्या कामात सहज सुलभपणे उपलब्ध होणारी ज्ञानभाषा म्हणून मराठीची वाढ झाली पाहिजे. ज्ञानविज्ञान, तत्त्वज्ञान आणि कला यांच्यातील संशोधन मराठीतून उपलब्ध होणे गरजेचे आहे. विखुरलेल्या मराठी समाजाला मराठीच्या माध्यमातून जोडून घेत या सर्व समाजाचे भाषाज्ञान वाढवणे आवश्यक आहे. मराठी भाषेला सक्षम करण्यासाठी आणि मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी आपण सर्व मराठी जणांनी आणि महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेतला व केंद्र शासनाने अभिजात दर्जा देऊन त्यावर मोहोर अमटवली आता आपण सर्वजण मराठी भाषा वृध्दींगत करण्यासाठी कसोसीने प्रयत्न करू या संस्कृत नंतर सर्व भाषांत मराठी भाषा अधिक सात्त्विक आहे. प्रायोगिक स्तरावर प्रत्येकाने तिचे वैभव टिकवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, 'माय मराठी'ला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मराठी भाषिकांनी संघटितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपण दृढ निश्चय करूया आणि संघटितपणे 'मराठी'चे रक्षण तसेच संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करूया ! आणि प्रत्येक मराठी माणसांनी आजच्या मराठी दिनी ठरवलं पाहिजे की माझी मराठी ही माझी जबाबदारी नाही का ? महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी आहे. मराठी ही राजमान्य, लोकमान्य राज्यभाषा झाल्याला आता अनेक वर्ष होऊन गेले, तरी महाराष्ट्रातही मराठीला योग्य स्थान नाही. हे मनातील शल्य व्यक्त करताना कवी कुसुमाग्रज असे म्हणतात, महाराष्ट्राच्या राजधानीत मंत्रालयासमोर मराठी भाषा, डोक्यावर राज्य मान्यतेचा सोनेरी मुकुट घालून उभी आहे. परंतु तिच्या अंगावरचे वस्त्र फाटके आहेत. मराठीचे स्वतःचे राज्य असावे, मराठीला राजभाषेचा मान मिळावा म्हणून वर्षानुवर्षे हजारो मराठी सुपुत्रांनी धडपड केली, संघर्ष केले. प्रसंगी बलिदान ही केले.

प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, चिं. वि. जोशी, ग. दि. माडगूळकर, वि. स. खांडेकर, ना. सि. फडके, साने गुरुजी यांच्या सारख्या साहित्यिकांनी मराठीत आपल्या साहित्याची भर घालून मराठी भाषा मराठी माणसाच्या मनामनात जागृत ठेवली.आज सामाजिकशास्त्रे, तत्त्वज्ञान, चित्रकला, साहित्य, संगीत, नाटक यासारख्या कलांचे समीक्षा-विचार मराठीत मूळ धरू लागले आहेत. तर एकीकडे इंग्रजीच्या वाढत्या आक्रमणाने मूळ मराठी भाषाच बदलत चालली आहे.

दैनंदिन बोली भाषेतून मराठीचे संवर्धन करणे, मराठीचे सौंदर्य, खानदानीपणा टिकवून ठेवणे हे प्रत्येक मराठी भाषकाचे कर्तव्य आहे. मायमराठीचा जयजयकार असो' म्हणा, 'गर्व से कहो हम मराठी है' म्हणा किंवा 'वुई वॉन्ट मराठी' म्हणा... आपल्यातली मराठीपणाची ज्योत तेवत ठेवणं महत्त्वाचं आहे. भाषा आणि संस्कृतीची स्पंदनं प्रथम मनात उमटतात, नंतर ती उच्चारांतून आणि कृतीतून प्रकटतात. केवळ दिखाऊ पणासाठी मराठीचं प्रेम नको, आंतरिक जाणीवांतून ते प्रकट होत राहिलं, तर भाषा आणि संस्कृती कधीच मरत नाही.असे मला वाटते. आपली स्वाक्षरी मराठीतून करा ! 'गुड मॉर्निंग'च्या ठिकाणी 'शुभ प्रभात' म्हणा ! मुलांना 'मम्मी-डॅडी' नको, तर 'आई-बाबा' म्हणायला शिकवा ! दूरभाषवर बोलतांना 'हॅलो' म्हणण्यापेक्षा 'नमस्कार' म्हणून बोलण्यास प्रारंभ करा ! सणाच्या शुभेच्छा मराठीतून द्या, उदा. 'हॅपी दिवाली'च्या ठिकाणी 'शुभ दीपावली' म्हणा ! मुलांना 'हॅरी पॉटर' वाचायला न देता 'पंचतंत्रा'तील कथा आणि साने गुरुजी यांची पुस्तके वाचायला द्या ! दारावर पाटी मराठीतून लावा ! 'नावात इंग्रजी अक्षरांनी आद्याक्षरे न लिहिता, मराठी (मातृभाषेतील) आद्याक्षरे वापरा. हे काम आपण शाळांमधून करू शकत नाही का? म्हणजेच माझी मराठी ही माझी जबाबदरी नाही का ? मराठी ही निव्वळ भाषाच नाही तर ती एक संस्कृती आहे. मराठी भाषेचा इतिहास खूप आधीपासून म्हणजेच अगदी राष्ट्रकुट राजापासून अस्तित्वात आहे. मराठी भाषा लवचिक आहे. थोडया थोडया फरकाने शब्दांचे अर्थ बदलतात. मुंबईची मराठी भाषा। हल्ली खिचडी भाषा झाली आहे. शुद्ध मराठी राहिली नाही. तिच्यात हिंदी, मराठी, इंग्रजी यांची भेसळ झाली आहे. हिंदी आणि इंग्रजी सिनेमा पाहून भाषा अशी झाली आहे. पूर्वी मराठीला मान नव्हता, पण आता काही प्रमाणात आहे. आणि आता केंद्र शासनाने आपल्या मराठी भाषेचा अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे, त्यामुळे भाषा संवर्धनाचे मोठे काम यापुढे होणार यात शंका नाही. परंतु आपण सर्व मराठी भाषकांनी एकत्रीत येऊन मराठी ही ज्ञानभाषा झाली पाहिजे यासाठी प्रयत्न करूया!

*'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' !*
*'जाहले खरेच धन्य ऐकतो मराठी'॥*

**- पद्माकर कुलकर्णी,**
अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद

# माझी मराठी

अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजांबरोबरच माणसाला गरज असते संवादाची आणि त्या साठी हवी भाषा. देहबोली, गंधबोली, स्पर्शबोली आणि सर्वात महत्त्वाची मायबोली तुमची माझी मराठी भाषा. संवादाचे आधुनिक तंत्रज्ञान अवगत झाले (भ्रमणध्वनी, आंतरजाल, संगणक प्रणाली) त्यामुळे आपल्याला भाषेच्या वापराचा विसर पडू लागला. आपण मराठी सहित सगळ्याच भाषांकडे दुर्लक्ष करू लागलो. अमृताते पैजा जिंके म्हणायचे आणि दुसरीकडे मराठीचे बोट सोडून द्यायचे असे नको.

मराठी भाषेचा इतिहास एक हजार वर्षे जुना आहे. पण वर्तमानात मराठी भाषेचे अस्तित्व लयास जाईल की काय असे वाटू लागले आहे. कारण कुटुंबात बोलली जाणारी मायबोली मराठी कमी झाली,प्राथमिक शिक्षणातूनही मराठी माध्यमाच्या शाळा बंद होऊ लागल्या. संवादभाषा, संपर्क भाषा,राजभाषा प्रशासकीयभाषा, ज्ञानभाषा, मनोरंजनभाषा व्यापारभाषा, सर्वत्र मराठीचा वापर कमी झाला ही वस्तुस्थिती. भाषेची सरमिसळ, संक्षेपिकरण, मत्सर, खच्चीकरण, मराठीवर येणाऱ्या संकटांची यादी वाढतच आहे.

राजकारणाच्या अस्मितेच्या गुंत्यात मराठी भाषा जेरबंद झाल्याची भावना निर्माण होते आहे. मराठी भाषा ही नदीच्या प्रवाहासारखी सतत वाहती राहिली की जास्त भावते .

**एल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन**
**निळा सावळा झरा वाहतो बेटा बेटातून**

पार नर्मदेपासून कृष्णपर्यंतच्या टापूत प्रामुख्याने बोलली जाणारी मराठी भाषा विवेक सिंधू ,महादंबेचे ढवळे, ज्ञानेश्वरी लीळाचरित्र, तुकाराम गाथा, अशी मोठी यादी आणि कालखंड आहे. बोलीभाषा ते लिपीभाषा या प्रवासात, शिलालेख ताम्रपाट भृजपत्रे, खलिते, पोथ्या,पुस्तके असा प्रशस्त प्रवास आहे.

इतिहास जतन करायला आणि हो मराठी वृद्धिंगत करायला सुद्धा उपयुक्त तंत्रज्ञान आता वापरू या मराठीचे संगोपन करू या.

आजच्या मराठी वापरात इमोजी आणि संक्षेपीकरणामुळे काही शब्दच गायब होऊ नयेत. मराठीची मुळं संस्कृत, प्राकृत, तमिळ, कन्नड तेलगूत आहेत. फारसी, उर्दू , इंग्रजी, पोर्तुगीज, अशा भावंडांचा वावर मराठी भाषेमधे आहे. त्यांचे कधी वादविवाद होतात कधी हातापायी होते पण त्यांचं नातं घट्ट आहे हे आपण भाषा वापरकर्त्यांनी लक्षात घ्यावे. मराठी आपली आवडती भाषा तर तिचाच आपण राग राग करून कसं चालेल? तिच्या वाढीची संगोपनाची, भरण पोषणाची जबाबदारी आपलीच आहे ना? मराठी भाषा आपलं संगोपन करते. तसंच आपणही मराठी भाषेचे संगोपन केलं पाहिजे. भाषा ही द्वेषाचे वणवे पेटवण्यासाठी नाही तर संवादाचे पुल जोडण्याचे साधन आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, जनाबाई एकनाथ, रामदास स्वामी चोखोबा ,किती नाव घ्यावीत? भाषेचा वापर माणसांना जोडण्यासाठी करण्याची शिकवणच या संतपरंपरेनेच दिली ना ? शिवाजी महाराजांच्या खलित्यातली भाषा प्रशासकीय मराठी कशी वापरावी याचे धडे देते. जात्यावरच्या ओव्या पासून शाहिरी, बतावणी गणगवळण, लावणी पोवाडा गोंधळ सगळ्यांनी समृद्ध झालेली मराठी टिकवण्याची जबाबदारी आपलीच. मराठी महाराष्ट्राची मुख्य संवादभाषा वापरभाषा, प्रशासकीय भाषा, ज्ञानभाषा राजभाषा म्हणून वापरायला आपण सुरुवात करू या. ज्यांची मातृभाषा मराठी नाही, त्यांना मराठी निदान संवादापुरते का होईना शिकवण्याची जबाबदारी घेऊ या. प्राथमिक शिक्षणाची ज्ञानभाषा मराठीच रहावी यासाठी पालक म्हणून आग्रह धरू या. मराठी भाषेचा विस्तृत अभ्यास करणाऱ्यांना प्रोत्साहन देऊया, कोसाकोसा वरच्या बदलत्या मराठी बोलायची चेष्टा मस्करी करणे ऐवजी त्यांची गुणवैशिष्ट्य टिकवून ठेवूया. मुद्रित वापरासाठी, प्रशासकीय वापरासाठी ज्ञानसंवर्धनासाठी ,मराठी भाषा वापरली जाते तिचे व्याकरण व वापर नियमावली सुसूत्रपणे अंमलात आणू या. मराठीचा सहज सुलभ सर्वत्र वापर होतोय ना यावर लक्ष ठेवूया आणि इतर भाषा शिकण्यासाठी इतरांना मराठी शिकवण्यासाठी अनुवादित साहित्याच्या देवाण-घेवाणीमध्ये सहभागी होऊ या. मराठीची मुस्कटदाबी, अध:पतन उच्चारण यांची भीती नको. फक्त तुमच्या माझ्यासारख्या प्रत्येक सामान्य माणसाने मराठी भाषेचा सातत्याने गांभीर्यपूर्वक आणि जाणीवपूर्वक वापर केला की मराठी भाषेचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. म्हणून आपल्या सर्वांसाठी ती माझी मराठी भाषा आहे.



**- डॉ. श्रीकांत कामतकर**




## लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,
## जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।
## धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी,
## एवढ्या जगात माय मानतो मराठी ॥

# माय मराठी

आपण दरवर्षी २७ फेब्रुवारी हा महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी, साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिवस' म्हणून उत्साहाने साजरा करतो. एके काळी 'मराठी असे आमुची मायबोली । परी आज ती राजभाषा नसे' अशी खंत कवी माधव त्र्यंबक पटवर्धन उर्फ माधव जुलियन यांनी व्यक्त केली होती. पुढे १९६४ मध्ये तिला राजभाषेचा दर्जा मिळाला.

आपल्या माय मराठीची थोरवी अनेक थोरा मोठ्यांनी मुक्तकंठाने सांगितलेली आहे. 'माझ्या मन्हाठीचिये बोल कवतिके । परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरेचि रसिके। मेळविन।' असे आत्म विश्वासाने लिहिणारे संत ज्ञानेश्वर आणि 'आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे यत्न करूं ॥' असे मन:पूर्वक व्यक्त होणारे संत तुकाराम हे आपल्या भाषेबद्दल किती जिव्हाळ्याने, ममत्वाने लिहितात. आपल्या मायभाषेबद्दलचे प्रेम मनापासूनच असल्याशिवाय असे हृदयस्पर्शी लेखन होत नाही.

यंदा मात्र आपल्या आनंदात, उत्साहात अजून एका चांगल्या बातमीची भर पडली आणि ती आपल्या सर्वच मराठी भाषिकांसाठी मानाची, अभिमानाची, गौरवाची बाब आहे. ही महत्त्वाची घटना म्हणजे आपल्या माय मराठीला केंद्र शासनाकडून अभिजात मराठी भाषेचा दर्जा बहाल करण्यात आला आहे. पण अभिजात भाषा म्हणजे नक्की काय ? हे ही आपण समजून घ्यायला हवे. अभिजात भाषा म्हणजे, वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारद्वारे दिला जाणारा एक दर्जा. या दर्जाची घोषणा केंद्र सरकार करते. अभिजात भाषेचे निकष ठरवल्याप्रमाणे हा दर्जा दिला जातो. अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे अधिकार केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाला आहेत.

अभिजात भाषेचे काही निकष ठरलेले असतात. ते पुढीलप्रमाणे - अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी ती भाषा किमान दीड ते दोन हजार वर्षे प्राचीन असायला हवी. त्या भाषेतील समृद्ध ग्रंथ व अन्य साहित्य परंपरा असावी. ते मूळ त्याच भाषेतील लिहिलेले असावे, अनुवादित नसावे. भाषेचा प्रवास अखंडित असावा आणि प्राचीन व सध्याच्या भाषेतील नाते सुस्पष्ट असावे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या भाषांची यादी: तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, उडिया, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत. संपूर्ण जगामध्ये आत्ता सुमारे ७००० भाषा आहेत असे मानले जाते. या भाषांपैकी सगळ्यात ताकदवान ज्या भाषा आहेत, त्यात आपल्या मराठी भाषेचाही समावेश आहे. सुमारे अकरा कोटी लोकांची मातृभाषा असलेली माय मराठी आता जगामधल्या २० पेक्षा जास्त देशांमध्ये बोलली जाते. तेथे मोठ्या संख्येने मराठी बोलणारे लोक आहेत. भाषा मरता देशही मरती, संस्कृतीचाही दिवा विझे असे कुसुमाग्रजांनी लिहून आपल्याला एक इशारा दिला आहे. म्हणूनच आता वेळ आली आहे ती आपल्या मराठीच्या संरक्षणाची, संवर्धनाची. मराठीच्या प्रचार-प्रसाराची, आणि यात तुम्ही देखील खारीचा वाटा उचलू शकता. एकमेकांशी बोलताना, गप्पा मारताना, विविध वस्तू, पदार्थ, उपकरणे, यंत्रे यांचा उल्लेख करताना जाणीवपूर्वक, आवर्जून मराठीचा वापर करा. आपल्या आई-बाबांना, ताई दादाला, मित्रांना देखील तसे करायला सांगा. तुम्हां सर्वांना मराठी भाषा गौरव दिवसाच्या खूप शुभेच्छा.

**- दिपक पारडे,**
प्राथमिक शिक्षक, मोहोळ.


# आपली मायबोली मराठी

**कविवर्य कुसुमाग्रजांचा जन्मदिवस आपण हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करतो. मराठी भाषा ही जगभरात बोलली जाते. या भाषेला अभिजात भाषेचा दर्जाही यावर्षी मिळालेला आहे. मराठी भाषेला संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज इत्यादी अनेक संतांनी आणि शिवाजी महाराज स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर, खांडेकर, विंदा करंदीकर कवी कुसुमाग्रज, भालचंद्र नेमाडे इत्यादी ज्ञानपीठ विजेत्या लेखकांनी व ग्रामीण भागातील लोकांनी दैनंदिन जीवनात मराठीचा वापर करून तिला समृद्ध केले आहे, महान केले आहे. आपल्या साहित्यात उच्च दर्जाचे लेखन करून अनेक मराठी सारस्वतांनी माय मराठीच्या गळ्यात अनेक ग्रंथांची कौस्तुभ माला अर्पण केली आह इये मराठीचे नगरी ब्रह्म विद्येच्या सुकाळुकरी असे म्हणणारे संत ज्ञानेश्वर असतील किंवा माझ्या मराठी मातेच्या लावा कपाळास टिळा, हिच्या संघाने जगातील माय देशातील शिळा असे म्हणणारे कुसुमाग्रज असोत आजवर असंख्य सारस्वतांनी मराठी भाषेला समृद्ध केले आहे.**

कौशल इनामदार यांनी एवढ्या जगात माय मानतो मराठी असे म्हटले आहे. हे मराठी विषयी असे गौरव उद्गार आपण नुसते ऐकून चालणार नाही तर आपणही माय मराठी साठी लहान सहान प्रयत्न करायला हवेत. प्रत्येक मराठी माणसाने हिच्या संवर्धनासाठी आपला खारीचा वाटा तरी उचलायला हवा असे वाटते. जागतिकीकरणाच्या




आजच्या या काळात मराठीला जपणे तिचे संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे नव्हे ती काळाची गरज आहे या विज्ञान युगात जीवन सुकर, संपन्न होते हे खरे पण भाषा , कला, संस्कृतीच्या अभिवृद्धीने जीवनात शांती, सौख्य व व्यक्तिमत्वाचे विकसन होते हे ही खरे. म्हणून याकाळात सर्व क्षेत्रीय भाषांचा व आपण मराठी आहोत म्हणून माय मराठीला जपणे तिचे संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे. इतर भाषा जरूर शिकायला हव्यात पण मातृभाषा ही शिकलीच पाहिजे असा आग्रह सरकारने व पालकांनी धरायला हवा. या मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आज. मराठी ज्याची त्याची या लेखातून आपण विविध ठिकाणी राहणाऱ्या मराठी भाषकांच्या बोलण्यातील एकेका शब्दांचा विचार करू या. शब्दाचे अर्थवाहीपण त्यातील नेमकेपणा आणि अर्थ सौंदर्य, एकाच आशयासाठी वेगवेगळे शब्द कसे वापरले जातात. याचा आपण विचार या लेखात करणार आहोत. भाषा ही दर बारा कोसावर बदलते म्हणूनच मराठी माणूस त्या-त्या भागातील मराठीतले शब्द आपल्या बोलण्यात वापरत असतो. उदा: ग्रामीण भागात आजही सुंदर, चांगले, सुरेख, छान यासाठी 'नादर' हा शब्द वापरला जातो. माझी मदतनीस कविता कोपऱ्याला कोंटा हा शब्द वापरते म्हणजे भिंतीचा कोपरा. वस्तू त्या कोपऱ्यात आहे, हाताला येत नाही असं तेव्हाच ती म्हणते जेव्हा तिचा हात पोचत नाही. कोंटा म्हणजे कोपरा हा अर्थ लक्षात येतो. हैदराबादला बोगल कुंटा,नल्लाकुटां अशी नावे विविध भागाला दिलेली आहेत.म्हणजे कोंटा. म्हणजे कोपरा.हे शब्द एकाच अर्थाने आले असावेत असे म्हणण्यास जागा आहे. दुसरी मदतनीस राजाबाई ही देगलूर भागातील एखादी वस्तू उंच ठिकाणी असेल व ते हाताने काढता येणार नसेल तर ती म्हणते आम्मा हा डबा मला अंबडत नाही. अंबडत नाही म्हणजे हाताला येत नाही असा तो अर्थ माझ्या लहानपणी गावामध्ये पिठाची गिरणी एकच असे. तेथे ओळीने धान्याचे. डबे ठेवून बायका घरी येऊन तास दोन तासाने घरातलं काम करून परत दळलेले पीठ आणायला गिरणीकडे जात असत. त्यात एकमेकीला मग अशावेळी निरोप सांगत. आत्ताच जाऊ नको गं बाई! लई मुरकंड हाय. मूरकंड म्हणजे गर्दी. किंवा गर्दी या शब्दासाठी-मिट्टी असा शब्द प्रयोगही केलेला मी ऐकलेला आहे. मिट्टी म्हणजे काय तर मिट्टी म्हणजे मिठी. आवडत्या व्यक्तीस घट्ट पकडून ठेवणे, या हृदयीचे त्या हृदयात घालणे किंवा जवळ घेणे. तेथे हवेला सुद्धा जायला जागा नसावी ह्या अर्थाने मिट्टी म्हणजे भयंकर गर्दी दाटीवाटी असा शब्द तयार झाला असावा. आजही ग्रामीण भागात बांगड्यांना काकनं, असा सुंदर शब्द आहे. तर मुबलक किंवा पुष्कळ या साठी मांयंदळ किंवा बक्कळ हा शब्द वापरला जातो. हरवलेली वस्तू सापडली की बहुजन वग गवसली का? असे म्हणतात. आजही मराठवाड्यात दाराला कवाड म्हणतात. ओढ्यावरलकपडे धुतले का असे म्हणण्या ऐवजी व्होळाला कापडं धुतले म्हणतात तर पावसाळ्यात लहान लहान झऱ्यांना ओहोळांना पाणी येते त्याला लेंड होळ असानशब्द आहे.ओहोळ या शब्दापासून व्हळ असे शब्दसौकय झाले.काटवटीसाठी परात, धटी साठी लुगडे , साडी हे शब्द प्रचलित झाले.जुन्याशब्दांचा बोलण्यातवापर कमी झाला म्हणून ते शब्द विलुप्त होत गेले. भाषा ही सतत बदलणारी असते नवे शब्द येतात परॅतु लुप्त होत जाणार्या शब्दांचा अभ्याससकरणे, त्यांना संकलित करणे हे आपले काम आहे. जसे शब्दांचे तसेच वाक्प्रचाराचे आहे.मुलगी ऋतूमती होणे वयात येणे किंवा पाळी येणे असे अभिजन वर्गात म्हटले जाते..पण बहुजन वर्गात तिला *पदर येणे*,न्हाण येणे,शहाणी होणे, मोट्टी होणे, मुलगा होणे इ. बहुपर्यायी शब्दयवापरले जातात. मराठी भाषा गौरव तीन खर्या अर्थाने साजरा करायचा असेल तर ज्ञानदेवांनी जसे संस्कृतचे प्राबल्य असताना , माझ्या मराठीचा बोलू अमृतातेही पैजा जिंके । ऐसी अक्षरे रसिके मेळविन असे विद्वानांनी ठणकाउन सांगितले तसे आपण इंग्रजी भाषेला अवास्तव महत्व न देता मराठीचा झेंडा घट्ट पकडायला हवा.मराठी नीट बोलता , वाचता , लिहिता न येणे हे अपमानास्पद आहे असे वाटले पाहिजे.मराठी भाषा आली तरच, तेव्हाच आपण मराठी म्हणवून घेऊ.इंग्रजी ही पोटाची भाषा असली तरी ओठांची भाषा मराठी आहे.दु:खाच्या वेळी आ-ई गं हेच शब्द ओठी येतात हे सर्वं श्रुत आहे. मुले शाळेतकोणत्याही माध्यमातून शिकू देत. घरात आपण. जाणीववपूवक मराठी. बोलू या, मराठी साहित्याचे गोष्टीरूप करुन मुलांना ऐकवू या, मराठी वृत्तपत्र, मराठी बातम्या मुलांच्या कानावर पडू द्या. मराठी आरत्या, कहाण्या संत चरित्रे यांचे सामूहिक वाचन करु या. तरुण पिढीवर हसत खेळत , येता, जाता मराठीचा संस्कार करु या.तरच कुसुमाग्रजांचा जन्म दिवस खर्या अर्थाने साजरा केल्याचे समाधान मिळेल नाहीतर तो एक निव्वळ सोपस्कार होईल.




**- डॉ. कांचन जतकर,**
हैदराबाद.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### अरण येथे ट्रान्सफॉर्मर सबस्टेशनचे उद्घाटन

**माढा, दि. २६ फेब्रुवारी-**

आ. अभिजीत पाटील यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या माढा तालुक्यातील अरण येथे ५ केव्ही ट्रान्सफॉर्मर सबस्टेशनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आनंदबापू पाटील, संतोष मुटकुळे, यशवंत शिंदे, काकासाहेब पाटील, सरपंच दीपक ताकतोडे, संचालक विठ्ठल पाटील, विशाल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. आ. अभिजीत पाटील यांनी नवीन सबस्टेशनमुळे अरण व परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम आणि अखंडित वीजपुरवठा मिळेल असा विश्वास व्यक्त केला. अनेक वर्षांपासून माढा विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवले जात होते. अभिजीत पाटील यांनी निवडून गेल्यानंतर येथील नागरिकांचे प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले होते. अरण येथील नागरिकांनी आ. अभिजीत पाटील यांच्याकडे सब स्टेशन उभारण्याची मागणी केली होती. आ. पाटील यांनी तात्काळ संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून काम मार्गी लावल्याने येथील नागरिकांचा विजेचा प्रश्न कायमचा मिटलेला आहे. यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### टेंभुर्णी येथे नऊ वर्षांच्या मुलाचा शेत तळ्यात बुडून मृत्यू

**टेंभुर्णी, दि. २६ फेब्रुवारी-**



टेंभुर्णी येथील कुर्डूवाडी रोड एमआयडीसी चौक येथे नऊ वर्ष मुलाचा शेततळ्यावर चालताना पाय घसरून पाण्यात पडून बुडून मृत्यू झाला असल्याची घटना बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास कुर्डूवाडी रोड, एमआयडीसी चौक येथे घडली. बुधवारी सकाळी ७ वा. ते ७:४५ वा. दरम्यान सतीश गोरख व्होटकर यांचा मुलगा वेदांत सतिश व्होटकर (वय ९) हा एमआयडीसी लगत आनंता कुटे यांच्या शेत तळ्यावर चालत असताना पाय घसरून तळ्यातील पाण्यात पडून बुडून मयत झाला आहे, अशी माहिती टेंभुर्णी पोलीस ठाण्यात मयत वेदांतचे वडील सतीश गोरख व्होटकर वय ४० यांनी दिली आहे. सदर घटनेचा तपास पोहेकॉ लांडगे करीत आहेत.



### शिवशंकर पतसंस्थेच्या चेअरमनपदी घुगे

**पिलीव, दि. २६ फेब्रुवारी-**

श्री शिवशंकर वीज कामगार पतसंस्था मर्या. अकलूजच्या चेअरमनपदी राजाराम घुगे तर सचिवपदी संतोष चव्हाण यांची एकमताने निवड करण्यात आली. इंटक विज कामगार संघटना सोलापूरच्या अधिपत्याखालील श्री शिवशंकर वीज कामगार पतसंस्था मर्यादित अकलूजची नूतन संचालक मंडळाच्या निवडी बिनविरोध झाल्यानंतर इंटकचे जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन चेअरमन निवडीसाठी बैठक घेण्यात आली. संचालक सरगम साठे, आरती सूर्यवंशी, प्रदीप सुरवसे, देविदास लोंढे, युवराज गौड, राहुल शिंदे, कृष्णदेव काळे, प्रकाश हुंडे, गोरख करचे, गणेश शिंदे, परमेश्वर व्यवहारे यांच्या निवडी झाल्या. याप्रसंगी इंटक जिल्हा कार्याध्यक्ष आनंदराव पाखरे, उपकार्याध्यक्ष नागनाथ पांढरे, काँग्रेसचे सरचिटणीस किशोर जाधव, फड महाराज उपस्थित होते.

### बेरोजगार उमेदवारांसाठी आज रोजगार मेळावा

**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर आणि हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील नोकरी इच्छुक बेरोजगार उमेदवारांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी दिली. या मेळाव्यात १० वी, १२ वी, आयटीआय वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीय, मशिन ऑपरेटर, बी. कॉम, एम. कॉम, अशा प्रकारची ५०० पेक्षा जास्त रिक्तपदे १० उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत. इच्छुक उमेदवारांनी बायोडाटांच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, वालचंद कॉलेज कॅम्पस, अशोक चौक येथे उपस्थित रहावे.

## निधन वृत्त...



### कृष्णा कुंभार

**मंगळवेढा, दि. २६ फेब्रुवारी-**

कासेगाव येथील कृष्णा केशव कुंभार (वय ५५) यांचे अपघाताने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. ते श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे केनयार्ड विभागात बैलगाडी फिटर म्हणून कामास होते.



### राकेश माने

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

शहरातील मुरारजी पेठेतील लोभा मास्तर चाळीतील रहिवासी राकेश नारायण माने यांचे वयाच्या ५० व्या वर्षी अल्पशा आजाराने बुधवारी पहाटे निधन झाले. त्यांच्यावर जुना पूना नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राकेश माने यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.



### डॉ. मंजुनाथ प्रचंडे

**अक्कलकोट, दि. २६ फेब्रुवारी-**

नागणसूर येथील डॉ. मंजुनाथ हणमंत प्रचंडे (वय ४०) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक भाऊ, दोन बहिणी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी सकाळी ११ वा. राहत्या घरातून निघणार आहे.

# पारंपारिक प्रथांचे रहस्य जाणल्यास जीवन परिवर्तन

**ब्रह्माकुमारी संगीतादीदी; बार्शीतील ईश्वरीय विश्वविद्यालयात शिवध्वजारोहण**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ फेब्रुवारी-**



महाशिवरात्रीनिमित्त पालन केल्यास जात असलेल्या पारंपारिक प्रथांमध्ये आध्यात्मिक रहस्य लपले आहे. त्यांचे रहस्य जाणले, त्या रहस्यांचे अनुकरण केले तर जीवन परिवर्तन होईल, असे उद्गार ब्रह्माकुमारी संगीतादीदी यांनी काढले.

त्या येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सभागृहात महाशिवरात्रीनिमित्त आयोजित शिवध्वजारोहण समारंभात बोलत होत्या. शिवरात्रीच्या पारंपारिक प्रथांचे रहस्य' हा त्यांच्या मार्गदर्शनाचा विषय होता. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी रुपाने बालाजी कुकडे (पोलीस निरीक्षक), डॉ. ए. बी. शेख (प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय), गुरु भांगे (ग्रामविकास अधिकारी), राजाभाऊ देशमुख (अध्यक्ष, सोलापूर जिल्हा द्राक्ष बागायतदार संघ), शेख शाकिरभाई मुल्ला हातिमभाई पुनावाला (बार्शी शहर बोहरी समाजाचे मुल्ला), गणेश प्रकाश डमरे (राष्ट्रीय खेळाडू) हे मान्यवर उपस्थित होते.

संगीताबहनजी आपल्या मार्गदर्शनात पुढे मृहणाल्या, आपण या सणाचा शिवरात्री असा उल्लेख करतो. पण शंकररात्री असा उल्लेख कधीच करत नाही. यावरुनच स्पष्ट होते की शिव व शंकर वेगवेगळे आहेत. शिव हे निराकार ज्योतिर्बिंदू परमात्मा आहेत. शंकर हे सूक्ष्म देहधारी देवता आहेत. शिव हे रचयिता आहेत तर शंकर हे रचना आहेत. म्हणूनच शंकर सुध्दा शिवाचे ध्यान करतात. शिवपिंडीवरील भस्माचे त्रिपुंड, बेलाची तीन वहाणे, त्रिशूल हे शिवाची तीन कर्तव्य दर्शक आहेत. शिव हे ब्रह्मा, विष्णू शंकर या तीन देवतांचा निर्माता असून ब्रह्माव्दारे, स्थापना, विष्णूव्दारे पालना व शंकरा व्दारे विनाश ही तीन कर्तव्य करतात. महाशिवरात्री हा शिवाच्या जन्मोत्सवाचा सण आहे. कोणत्याही देवतांच्या वा मनुष्याचा जन्मोत्सवात रात्री शब्द येत नाही पण शिवाच्याच जन्मोत्सवाचा शिवरात्री असा उल्लेख केला जातो. बहनजी म्हणाल्या, सध्या सुरु असे कलियुगाचा हा अंतिम काळ पाच विकारांमुळे अंधकारमय झाला आहे. हीच अज्ञान अंधाराची रात्र आहे. अशा काळात प्रजापिता ब्रह्माबाबांच्या शरिरामध्ये परकाया प्रवेशाने अजन्मा निराकार शिवाचा दिव्य जन्म झाला आहे. म्हणून शिवाच्या जन्मोवास शिवरात्री म्हणतात.स्वयं शिव परमात्मा ब्रहमाकुमारी विद्यालयामार्फत करत असलेले विश्वपरिवर्ताचे कार्य जाणलेले अनेकजण ब्रह्माकुमारी विद्यालयाचे नियमित विद्यार्थी बनले आहेत.

**यांचा करण्यात आला गौरव**

पॉवर लिफटिंग प्राविण्यप्राप्त दिपक फडतरे, नॅशनल प्लेअर ऑफ स्केटिंग प्रियंका एडलवार, राजश्री गवळी, मुख्याध्यापक विलास शिराळ यांचा सत्कार करण्यात आला. मृणाली सातव व गायत्री जेवरे या कन्यांनी सादर केलेले शिवमहिमा गीतावरील नृत्य नयनमनोहर होते. अनितादीदी करवा यांनी सूत्रसंचलन केले.

**तणावमुक्तीवर शो सादर**

श्री रामेश्वर मंदिरात तणावमुक्त शांततामय जीवनाची विधी दाखवणारा विशेष प्रोजक्टर शोही ब्रह्माकुमारी विद्यालयाव्दारे दाखवला जात आहे. ज्याचा लाभ पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, त्यांचे पोलीस सहकारी, संतोष सूर्यवंशी, रामेश्वर मंदिराचे व्यवस्थापक बसवेश्वर गाडवे यांनीही घेतला. अमनाथ देखावाही सादर केला आहे.

# माचणूर येथे दर्शनासाठी मांदियाळी

**हर... हर.. महादेवच्या जयघोषाने मंदिर परिसर गेला दुमदुमून**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २६ फेब्रुवारी-**



तीर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वर देवस्थानमध्ये महाशिवरात्रीनिमित्त पहाटेपासून भाविकांची दर्शनासाठी रीघ लागली होती. दरम्यान तहसीलदार मदन जाधव यांनी अभिषेक करुन पूजा केली. त्यानंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. मंदिर परिसर हर.. हर.. महादेवच्या जय घोषाने दुमदुमून गेला होता.

माचणूर येथे भव्य असे हेमाडपंथी श्री सिध्देश्वराचे भीमा नदी काठावर कडाकपारीत मंदिर आहे. वेशीपर्यंत पायऱ्यावर चटई टाकली नसल्यामुळे त्याचा त्रास भाविकांना भोगावा लागला. पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. यामध्ये पोलीस निरीक्षक १, सहाय्यक पोलीस निरीक्षक २, पोलीस उपनिरीक्षक ३, पोलीस अंमलदार ४५, होमगार्ड २५, आरसीपी १ पथक असा बंदोबस्त नेमला होता. मंगळवेढा आगाराने येणे व जाणे अशा ४० फेऱ्या केल्या तर सांगोला आगाराने १ बस, अक्कलकोट आगाराने १ अशा बसेसनी फेऱ्या करुन भाविकांना ने-आण केले. यावेळी वाहतूक नियंत्रक अशोक चव्हाण, वाहक शिवाजी लोखंडे आदींनी भाविकांची दखल घेत सोय केली. देवस्थान कमिटीने भाविकांच्या प्रसादाची व्यवस्था केल्याने दुरूवरुन आलेल्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला. मंगळवेढा वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार संभाजी यादव, प्रविण जाधव, मुजगोंडे वाहतूक सुरळीत ठेवली. सिध्देश्वर प्रशाला येथे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. सायंकाळी माचणूर गावातून श्रीच्या पालखीचे आगमन मंदिरात झाले.

यावेळी आकाशात फटाक्याची आतषबाजी करण्यात आली. सायंकाळी माचणूर, ब्रम्हपुरी व अन्य गावातून महिला वर्ग पालखीच्या दरम्यान आरत्या दुतर्फा घेऊन बसल्याने अधिकच नयनरम्य चित्र दिसत होते. आ. समाधान आवताडे, प्रांताधिकारी अमित माळी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे आदी उपस्थित होते.

**खा. प्रणिती शिंदेंनी घेतले दर्शन**

काँग्रेसच्या खा. प्रणितीताई शिंदे यांनी दुपारी श्री सिध्देश्वराचे दर्शन घेऊन कार्यकर्त्यांना कामासाठी बळ मिळू दे अशी देवाकडे पार्थना केली. माजी डीवायएसपी राजश्री पाटील, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दर्शन घेतले.



# थरारक हत्याकांड उघड; दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यात खळबळ उडवणाऱ्या खून प्रकरणाचा बार्शी तालुका पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. ऊसाच्या शेतात पुरलेले प्रेत आढळल्यानंतर उलगडलेल्या या गुन्ह्याने संपूर्ण परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र, पोलिसांच्या तडफदार तपासामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

बाभुळगाव येथील सुरेश रंगनाथ शिंदे (वय ६८) हे १७ फेब्रुवारी रोजी बार्शीवरुन आपल्या गावी निघाले, मात्र ते घरी पोहोचले नाहीत. त्यांच्या मुलाने शोध घेतला, पण कुठेच पत्ता लागला नाही. २० फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता बाभुळगाव येथील ऊस शेतीमध्ये मानवी पाय दिसल्याने खळबळ उडाली. बार्शी तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असता, दोन्ही हात बांधलेले आणि गळ्यावर आवळल्याच्या खुणा असलेला मृतदेह आढळला. तपासादरम्यान सुरेश शिंदे यांच्या शेजारील दिलीप निवृत्ती झोंबाडे आणि बाभुळगाव येथे सालगडी म्हणून काम करणारा राहूल नागेश गायकवाड (रा. कडलास, ता. सांगोला) यांचा या हत्येत सहभाग असल्याचा पोलिसांना संशय आला. तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे दोघांना अटक करण्यात आली. चौकशीत त्यांनी लुटीसाठी हत्या केल्याची कबुली दिली. ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकूल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.तपासात सहायक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, पोलीस उपनिरीक्षक बालाजी वळसने, तसेच बार्शी शहर व तालुका पोलिसांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

**नागरिकांमधून समाधान**

या जलद तपासामुळे परिसरातील भीतीचे वातावरण निवळले असून, पोलिसांच्या धाडसी कारवाईबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. बार्शी तालुका पोलिसांच्या या यशस्वी ऑपरेशनचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# महामार्गाची कामे तात्काळ पूर्ण करा



**खा. ओमराजे निंबाळकर यांचे अधिकाऱ्यांना आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २६ फेब्रुवारी-**

गेली अनेक वर्षे संथगतीने सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्ग व अणदूर उड्डाण पुलाची पाहणी आज धाराशिव चे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पाहणी करून सर्व अर्धवट कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांना दिले आहेत.

उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूचे सर्व्हिस रोड व पावसाचे तुंबणारे पाणी काढून देणे, भुजबळ प्लॉटजवळील पाणी काढून देण्यासाठी च्या सूचना देशमुख कोटा जवळ सर्व्हिस रोड व गटार, चिवरी पाटीजवळ पावसाळ्यात तुंबणारे पाणी आदी कामे जलद गतीने पूर्ण करून रखडलेला उड्डाण पूल वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी या वेळी केल्या या वेळी प्रकल्प अधिकारी कदम, संबंधित गुत्तेदार, सर्व अधिकारी वर्ग उपस्थित होता अर्धवट कामाचे पाणी करून काम तात्काळ पूर्ण करून चिवारी पाटी, भुजबळ वस्ती, मधुशाली नगर येथील पाण्याचा वीसर्ग व्यवस्थित काढून देण्याच्या सूचनाही त्यांनी या वेळी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी शिवसेना नेते तथा ग्रामपंचायत सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, माजी तालुका प्रमुख बाळकृष्ण घोडके, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेली अनेक वर्षे या राष्ट्रीय महामार्गाचे काम संथगतीने सुरू असून ४ ते ५ गुत्तेदार बदलून गेले. पण काम जैसे थे अशीच अवस्था या उड्डाण पुलाची व रोडची झाली असून आता खासदारांच्या या अचानक भेटीने या कामाला निश्चित वेग येणार आहे.

**कामाच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करणार**

अणदूर हे सांस्कृतिकदृष्ट्या ऐतिहासिक गाव असून येथील श्री खंडोबाचे मंदिर हे असंख्य जनतेचे कुलदैवत आहे. त्यामुळे भाविकांचे मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. याचा विचार करून हा उड्डाण पूल व सर्व कामे जलद गतीने पूर्ण व्हावीत त्यासाठी आपण निश्चितच प्रयत्न करणार असल्याची ग्वाही खा. ओमराजेंनी दिली.



# विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून जीवनात वाटचाल करावी

**पोनि महेश स्वामी : कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार निवासी शिबिराचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ फेब्रुवारी**

माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करावे. त्यानंतर मोठे स्वप्न पहावे. ते साकारण्यासाठी कठोर परिश्रम करावेत. यश निश्चित मिळते असा विश्वास अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी व्यक्त केला.

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने करजगी येथे आयोजित केलेल्या विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच विवेकानंद उंबरजे होते. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, श्री बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दयानंद उंबरजे, उपसरपंच शब्बीर पटेल, ग्रामपंचायत सदस्या सुषमा येळमेळी, संगीता गंगदे, दस्तगीर गोडीकट्टी उपस्थित होते. स्वामी म्हणाले की, रासेयोच्या स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास विविध उपक्रमातून झालेला असतो. त्यामुळे त्याचे ध्येय निश्चित झालेले असते. त्यामुळे यशाचा मार्ग त्यांच्यासाठी खूपच सोपा होतो, म्हणून उपक्रमात सहभागी व्हावे. स्वागत प्रा. राजशेखर पवार यांनी केले, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले तर शब्बीर पटेल यानी आभार मानले.

**स्वयंसेवकांनी समाजसेवा करावी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी समाजसेवेसाठी कटिबद्ध झाले पाहिजे. वृक्षारोपण, पर्यावरण, स्वच्छता अशा उपक्रमात सहभागी झाले पाहिजे, हीच खरी समाजसेवा आहे, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

# शाळा परिसरात मद्य, तंबाखूजन्य पदार्थांची दुकाने

**मंद्रुप ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष; तक्रारी देऊनही होईना कारवाई**

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**मंद्रुप, दि. २६ फेब्रुवारी-**

मंद्रुप येथील अनेक जिल्हा परीषद शाळा आवारात अवैध दारूसह धुम्रपानजन्य तंबाखू, सिगारेट आदींची राजरोष विक्री करण्यात येत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची व मुलींची शाळा, भीमनगर, सेवालाल नगर व इंदिरा नगर येथील शाळांचा परिसर दारू, गुटखा, मावा, सिगारेट अशा तंबाखूजन्य पदार्थांच्या दुकानांनी वेढली गेली आहेत. या संदर्भात पालकांकडून मंद्रुप ग्रामपंचायत व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार देऊनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

शाळेत अनेक लहान मुले व मुली शिक्षण घेत आहेत. शाळेजवळच दारू दुकाने असल्याने मद्यपींमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या परिसरातील मद्यपींच्या वावरण्यामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर वाईट परिणाम होण्याची भीती आहे. जिल्हा परिषद केंद्रीय मुलांच्या शाळेला पत्राशेडचा विळखा असून छोट्या-मोठ्या टपऱ्यांसह चायनीजच्या व्यावसायिकांनी शाळा वेढलेली आहे. शाळेतील वर्गांच्या खिडक्यांना या पत्राशेड व टपऱ्यांमुळे अडथळा निर्माण झाल्याने वर्गात बसणाऱ्या विद्यार्थ्यांना खेळती हवा मिळत नाही. शिवाय वर्गात दुर्गंधीही पसरते. यामुळे डासांचे प्रमाण वाढले असून, उन्हाच्या तापामुळे उकाडा वाढल्याने विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. शाळेच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

महात्मा फुले विद्यालय शाळेच्या प्रवेशद्वारापासून ते रस्त्यांपर्यंत टपऱ्यांचा विळखा आहे. त्यामुळे शाळा सुरू होताना किंवा सुटल्यावर वांगी रोडवरून किंवा हायवेवरुन येणारी वाहने दिसत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होणार आहे, ग्रामपंचायतने त्वरित अतिक्रमण हटवावे.

**-सुनील टेळे, शिक्षक, महात्मा फुले विद्यालय, मंद्रुप**

धुम्रपान, तंबाखूजन्य पदार्थ व मद्य विक्री शाळेच्या परीसरात केली जाते. ही फारच गंभीर बाब आहे. स्थानिक शालेय समिती, मुख्याध्यापक व सरपंच यांचे दुर्लक्ष होत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उद्भवला आहे. शाळा परीसरातिल अतिक्रमण हटवून सुरक्षित शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावे.

**-उमाशंकर राऊत, पालक, जि. प. शाळा, मंद्रुप**



# हणमंत गवळी यांचे तज्ज्ञ संचालकांकडून कौतुक

### अवकाळी पाऊस, अतिवृष्टीवर मात करत फुलविली द्राक्ष बाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील वडगाव (काटी) येथील प्रगतशील द्राक्ष बागायतदार तथा महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक हणमंत गवळी यांच्या द्राक्ष बागेत महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ आयोजित शिवार फेरी काढून तज्ञ संचालकांकडून द्राक्ष बागेचे कौतुक करण्यात आले. दरम्यान, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी अन् परतीच्या पावसावर मात करून द्राक्ष बाग फुलविल्याने अशा शेतकऱ्याचा पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी आदर्श घ्यावा, असाही सल्ला या संचालक मंडळींनी यावेळी दिला.

द्राक्ष बागायतदार हणमंत गवळी यांनी अवकाळी पाऊस, अतिवृष्टी आणि परतीच्या पावसावरही मात करून अन् दोन्ही भावंडांच्या सहकार्याने जवळपास ७० एकरात द्राक्ष बाग फुलवली आहे. या त्यांच्या यशामध्ये त्यांचे बंधू श्रीमंत भानुदास गवळी यांचाही सिंहांचा वाटा आहे. दरवर्षी त्यांच्या ७० एकरावरील संपूर्ण निर्यातक्षेम द्राक्ष युरोप खंडात निर्यात होत आहेत. दोन भावांच्या एकत्रित कुटुंब पद्धतीत त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडेही लक्ष दिले. त्यांचा एक मुलगा अर्जुन हणमंत गवळी बीएससी ॲग्री, मुलगी वैभवी हणमंत गवळी बीई कॉम्प्युटर तर एक मुलगा समर्थ हणमंत गवळी व बंधू श्रीमंत गवळी यांची कन्या स्वेता गवळी ही प्रवरा नगर अहमदनगर येथे वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएसचे शिक्षण घेत आहेत. त्यांच्या द्राक्ष बागेतील यशस्वी वाटचालीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य द्राक्ष संघाचे संचालक महादेव चाकोते, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे खजिनदार शिवाजीराव पवार, सोलापूर विभागाचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, सचिव शंकरराव येंगुरे, संचालक डॉ. हविनाळे, शिवानंद माळी, महादेव वडणे, लालासाहेब गव्हाणे, काकडे, राजाभाऊ जाधव, माळवधे, औसा येथील साईबाबा कृषी सेवा केंद्राचे संजय पवार आदींनी गवळी यांच्या द्राक्ष बागेला भेट देऊन गवळी बंधूंचे कौतुक केले.







# लाखो भाविकांनी घेतले १००८ शिवलिंगांचे दर्शन

## होटगी मठात महाशिवरात्र भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

महाशिवरात्रीनिमित्त अक्कलकोट रस्त्यावरील वीर तपस्वी मंदिराचे व मंदिर परिसरात असलेल्या श्रीशैल पीठाचे आद्य जगद्गुरु पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या लिंगोद्भव मूर्तीचे व तिच्याभोवती असलेल्या १००८ शिवलिंगाचे दर्शन लाखो भाविकांनी घेतले.

श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने श्री १००८ जगद्गुरु पंडिताराध्य, विश्वाराध्य जयंती व महाशिवरात्र महोत्सव काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रमाने संपन्न झाली .बुधवारी स. ६.०० वा. अक्कलकोट रस्त्यावरील श्री वीरतपस्वी मंदिरातील पंचमुखी परमेश्वर लिंगास रुद्राभिषेक. रुद्रपूजा, सहस्त्र बिलवारचन, महामंगलारती करण्यात आली. ७.०० वा. बाळीवेस येथील मठात श्री १००८ जगदाचार्य मूर्तीस महारुद्राभिषेक ,सहस्त्रबिलवारचंन महामंगलारती करण्यात आली. ८.०० वा. थोबडे यांच्या वाड्यातून श्री पंडिताराद्य लिंगोद्भव मूर्तीचे मठात आगमन झाल्यानंतर रथपूजा करून श्री १००८ जगद्गुरु पंडिताराध्य व विश्वाराध्य मूर्तीच्या सवाद्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. बैलजोडी, शंकराची मूर्ती, रेणुकाचार्यांची मूर्ती, जगद्गुरु पंडिताराजांची प्रतिमा, जगद्गुरु विश्वाराद्यांची प्रतिमा, रथ, शिवलिंगाची व श्री वीरतपस्वीजींची प्रतिमा, सनई, चौघडा, हलगी, बँड आदी पारंपारिक वाद्यासह ही मिरवणूक उत्तर कसबा, होटगी मठ, मल्लिकार्जुन मंदिर, मंगळवार पेठ पोलीस चौकी, कुंभार वेस, मधला मारुती, कन्ना चौक, जोडबसवन्ना चौक, पाण्याची टाकी, अक्कलकोट नाका या मार्गाने एमआयडीसी येथील श्री वीरतपस्वी मंदिरात मिरवणुकीची सांगता झाली.

कार्यक्रमास चिटगुपाचे गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांचे सानिध्य लाभले. मिरवणुकीत विद्यार्थ्यांचे झेंडा, टिपरी, लेझीम, झांज, पारंपारिक वेशभूषेतील नृत्य, विविध आकर्षक गणवेशात खेळाचे सादर करीत होते. या मिरवणुकीत २ हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. सायंकाळी ७ वाजता दीपोत्सव कार्यक्रम, रात्री ९.०० वाजता वीरतपस्वी पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मंदिराच्या प्रांगणातून वीर तपस्वी पालखीची मिरवणूक काढण्यात आली रात्री ९.३० वा. शोभेच्या दारूकामाने कार्यक्रमाची सांगता झाली. मंदिरात रात्री भजन व कीर्तनाचा कार्यक्रम पार पाडला. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता दर्शनी भागात व मंदिरात बॅरिगेटस् लावण्यात आले होते. महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र रांग, पार्किंगची व्यवस्थेबरोबरच पोलीस बंदोबस्त होता.

### रांगोळीतून साकारली महादेवांची प्रतिमा

मल्लिनाथ जमखंडी यांनी अक्कलकोट रस्त्यावरील वीरतपस्वी मंदिरात ८ बाय १८ फूट आकाराचे जटाधारी महादेवाचे प्रतिमा रांगोळीतून साकारले. महादेवाचे निसिम भक्त असणारे जमखंडी हे गेल्या १५ वर्षापासून वीरतपस्वी मंदिरात दरवर्षी भगवान शंकराची रांगोळी साकारात असतात. त्यांच्या या कार्यात कला श्री जमखंडी, नितेश जमखंडी, बसवराज जमखंडी, रमेश मदभावी व इरेष कणगी यांचे सहकार लाभले.

### लाख भाविकांना महाप्रसादाचे वाटप

श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने महाशिवरात्रीच्या मंगल दिवशी सकाळी ८.०० वाजल्यापासून रात्री १०.००पर्यंत दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना श्री वीरतपस्वी अन्नछत्रात प्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली होती. जवळजवळ १ लाख भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला.




# मार्चमध्ये नॅशनल दर्जाचा कार्यक्रम

### बिबिषण चवरे : तब्बल ६०० कलाकार होणार सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

मार्च महिन्यात सोलापूरकरांसाठी नॅशनल दर्जाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून या सहा दिवसांच्या कार्यक्रमात तब्बल ६०० कलाकार सहभागी होणार असल्याची माहिती महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्यसंचालनयाचे संचालक विभीषण चवरे यांनी सांगितले.

मराठी चित्रपट गीतांचा महोत्सव 'चीत्रवेल' या कार्यक्रमात चवरे हे बोलत होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन हुतात्मा स्मृती मंदिरामध्ये करण्यात आले आहे. या कार्यक्रमात गायक सिद्धेश जाधव, संपदा माने, विशाल भांगे, आसावरी बोधनकर-जोशी या गायकासोबतच विघ्नेश जोशी यांनी सुरेख असे सूत्रसंचालन केले. तबला : अर्चिस लेले, ढोलकी निलेश परब, ढोल नागेश भोसेकर, ऑक्टोपॅड भिसाजी तावडे, बासरी अभय ओक, गिटार प्रेषित जैन, कीबोर्ड दीप वझे व सागर गिजरे यांनी साथ दिली. चवरे म्हणाले की, संगीत संयोजक कमलेश भडमकरमुळे जुन्या व नव्या चित्रपटातील गाणी सादर करण्यात येत आहेत. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून ३६ जिल्ह्या त ३६ महोत्सव आम्ही घेत आहोत. त्यातला सोलापूरचा हा एक महोत्सव आहे. राज्यभरात साडेतीनशे पेक्षा जास्त असे कार्यक्रम घेणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. चित्रपटाच्या रंजक गोष्टी, इतिहासातील गाजलेली गाणी आणि शंभर वर्षांचा मराठी चित्रपटाचा घेतलेला आढावा हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. अभिषेक देशपांडे यांनी हुतात्मा स्मृती मंदिर प्रवेशद्वारासमोर सेल्फी पॉइंट केला होता. शंभो शंकरा करुणा करा जग जागवा....यमुना जळी खेळ खेळूया...फिरत्या चाकावरती मातीला देसी आकार.. झुक झुक झुक झुक आगीनगाडी...सूर तेची छेडीता..रात्रीस खेळ चाले..काय बाई सांगू गोड गोजिरी लाज लाजिरी.. झुलतो बाई रास झुला. जांभुळ पिकल्या झाडाखाली ढोल कुणाचा वाजती, अशा एकापेक्षा गाण्यांनी भुरळ घातली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, अविनाश मागावकर, संहिता लेखिका डॉ. सुवर्णा पापाळ, अण्णासाहेब कोतली, डॉ.नवनीत तोष्णीवाल, सुनील गुरव, आधी सह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते उपस्थितांचे आभार अमोल धाबळे यांनी मानले.

# सकारात्मक काम केल्याचे समाधान

### आयुक्त डॉ. ओंबासे; धाराशिव जिल्हा प्रशासनाच्या वतीने निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

धाराशिव जिल्हा आकांक्षित जिल्हा म्हणून ओळखला जातो. यामुळे येथे प्रचंड काम करणयाची गरज होती.अतिशय गुंतागुंतीच्या परिस्थितीतही सकारात्मक काम करत राहिलो, केलेल्या कामाचे समाधान आणि आनंद असल्याचे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी केले.



जिल्हा प्रशासनाच्या निरोप समारंभात ते बोलत होते. यावेळी पत्नी अस्मिता ओंबासे, आई-वडील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, प्र. जिल्हाधिकारी प्रकाश आहेरराव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, उदयसिंह भोसले, संतोष राऊत, संतोष भोर, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील व गणेश पवार, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम गोडभरले, जिल्हा महिला व बालविकास कार्यक्रम अधिकारी देवदत्त गिरी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक गणेश बारगजे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हारनाळे, रोजगार कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त संजय गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव व संतोष भोर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, उमरगा उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसीलदार अरविंद बोळंगे, तहसीलदार ठोंबरे, विशाल खळदकर, सोमनाथ गवळी, नागटिळक आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी केले. सूत्रसंचालन तहसिलदार डॉ. मृणाल जाधव यांनी तर आभार तहसीलदार अभिजीत जगताप यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त



### महाशिवरात्रीनिमित्त श्री विष्णू-महादेव मंदिरात भाविकांची गर्दी

**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील हेमाडपंथी बांधकाम असलेल्या अन् ऐतिहासिक अशा श्री विष्णू महादेव मंदिरात महाशिवरात्रनिमित्त पहाटे पासूनच मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी सुरू झाली होती. दिवसभरात हजारो भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले असल्याची माहिती मंदिर पुजारी तथा कीर्तनकार केशव गुरव यांनी दिली. पर्वकाळानिमित्त पहाटे ४ ते ६ अनेक भाविकांचे अभिषेक होवून महाआरती झाली, सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यंत शिवलिलामृत ग्रंथ पारायण प्रवचनकार विनायक महाराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. सायंकाळी ७ वाजता महाआरती, रात्रौ ९ ते ११ कीर्तनसेवा, रात्री १२ नंतर हरिजागर असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. महाशिवरात्रीनिमित्त पहाटेपासूनच तामलवाडी आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी श्रींच्या दर्शनासाठी गर्दी केल्याचे दिसून आले. सकाळी ८ नंतर दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्याचे दिसून आले. येथील मंदिर अतीप्राचीन असून, हेमाडपंथी बांधकाम आहे. या मंदिराचे वैशिष्टये म्हणजे श्री विष्णू मुर्ती आणि महादेवाची पिंड एकाच गाभाऱ्यात आहेत. श्री काशी विश्वेश्वरानंतर तामलवाडी येथेच अशी मूर्ती असल्याची माहिती येथील ज्येष्ठ नागरिकांनी दिली. यामुळेच ग्रामदैवत श्री विष्णू-महादेवाच्या दर्शनासाठी धाराशिव जिल्ह्यातूनच नाहीतर सोलापूर जिल्ह्यातूनही अनेक भाविक येतात. महाशिवरात्रीनंतर एप्रिल महिन्यात या ठिकाणी यात्रा महोत्सवही मोठ्या प्रमाणात साजरा होतो.

### पोलिसात तक्रार दिल्याने डोक्यात रॉडने हल्ला; वर्षानंतर दाखल झाला गुन्हा

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

पोलिसांना तक्रार दिल्याने रॉडने डोक्यात हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार जानेवारी २०२४ मध्ये घडला. सुमारे वर्षानंतर याप्रकरणी पोलिसात फिर्याद दाखल झाली आहे. लहू महादेव भोसले ( वय ४८, रा. यशोदा नगर, मोरेवाडी) असे हल्लात जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर अंकुश महादेव भोसले व गंगा अंकुश भोसले अशी हल्ला करणाऱ्यांची नावे आहेत. यातील जखमी लहू आणि आरोपी अंकुश यांची शेती एकमेका लगत आहे. गतवर्षी वेळ अमावस्या असल्याने फिर्यादी शेतात पूजा करण्यासाठी नातेवाईकांसह गेला होता. त्यावेळी आमच्या विरोधात पोलिसात का तक्रार दिली यावरून आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ केली. तेव्हा आरोपी गंगा याने फिर्यादीस गच्ची धरून खाली पाडले. त्या वेळी आरोपी अंकुश याने तेथील लोखंडी रॉड फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यास जखमी केले. या हल्लूयात फिर्यादी बेशुद्ध पडला होता. या प्रकारानंतर यातील आरोपी तेथून पळून गेले. दरम्यान जखमी अवस्थेत फिर्यादीला शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. उपचारादरम्यान फिर्यादीच्या डोक्यात सात ते आठ टाके पडले आहेत. या प्रकारानंतर सुमारे वर्षभरानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पोसई तरंगे तपास करत आहेत.

# कमीत कमी मार्जिन ठेवून जास्तीत जास्त लोकांना जोडण्याचे 'द्वारकादास शामकुमार'चे उद्दिष्ट : आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

नऊ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालन पोषण ची जबाबदारी द्वारकादास श्यामकुमारने घेतलेली आहे. तसेच बाजारपेठेत कमीत कमी मार्जिन ठेवून जास्तीत जास्त लोकांना कसे जोडता येईल याकडे द्वारकादास शामकुमारने लक्ष दिलेला असल्याचे मत आ. विजयकुमार देशमुख यांनी व्यक्त केले.



अक्कलकोट रोड येथील सुप्रसिद्ध अशा पंजवानी मार्केटमध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या शुभारंभाप्रसंगी घरोघरी मातीच्या चुली या मालिकेतील सुप्रसिद्ध अभिनेत्री रेश्मा शिंदे या उपस्थित होत्या. तसेच डॉक्टर किरण देशमुख, भाजपा शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, योगेश जम्मा, ज्येष्ठ नेते सत्यनारायण बोह्ली, जयनारायण भुतडा, समाजसेवक ब्रिजमोहन फोफलिया, डॉ. माणिक गुर्रम, मेहुलजी पटेल, राजकुमार हंचाटे, कल्पना कारभारी, अनिल विडप, मेहुलजी पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

अनेक शोरूम उभे केलेल्या द्वारकादास शामकुमार टेक्स्टाईलच्या उद्घाटनाने मी भारावून गेल्याचे गौरवोद्गार रेश्मा शिंदे यांनी काढले तर असे अनेक शाखांच्या माध्यमातून आम्ही ग्राहकांना अगदी कमीत कमी दरात साड्या देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे ज्येष्ठ मार्गदर्शक द्वारकादास माहेश्वरी यांनी सांगितले. अक्कलकोट रोड येथे पंजवानी मार्केट येथे सुरू करण्यात आलेल्या या द्वारकादास शामकुमार यांच्या नवीन शोरूमचा नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन निलेश भुतडा आणि बाबुलाल जाखड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू खोत यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आस्था रोटी बँकेच्यावतीने हजार जणांना फराळ वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**
आस्था फाऊंडेशन संचलित आस्था रोटी बँकेतर्फे महाशिवरात्री निमित्त शहरातील विविध झोपडपट्टी तसेच कुष्ठरोग वसाहत, बेघर निवारा तसेच अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतून सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचाराकरिता आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना महाशिवरात्री निमित्त एक हजार रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना फराळ वाटप करण्यात आले.

यामध्ये शाबू खिचडी, वेफर्स, शाबू चिवडा, केळी, खजूर, राजगीर लाडू, ताक इत्यादी पदार्थांचा समावेश होता. यावेळी एनटीपीसी अधिकारी मनिष शर्मा, उद्योगपती राहुल चंडक, गुरुनाथ निंबाळे, राजू हौशेट्टी, बाबा मिस्त्री आदींच्या उपस्थितीत फराळ वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय छंचुरे, पुष्कर पुकाळे अविनाश मार्चला, कांचन हिरेमठ, निलिमा हिरेमठ, छाया गंगणे, संगिता छंचुरे, विदया माने, अनिता तालीकोटी, संपदा जोशी, निता आक्रुडे, सुवर्णा पाटील, राजू नडगिरी, पप्पु धुळराव आदींनी परिश्रम घेतले.

## ▶▶ क्राईम वृत्त...




### सिमेंट बल्करच्या धडकेने तरूण पादचाऱ्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी -**
सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्कर वाहनाने जोरदार धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या तरूण पादचाऱ्याचा मृत्यू झाला. महेश बसवण्णप्पा लोहार (वय ३५, रा. वागदरी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास महेश लोहार हे वागदरी येथील जय भीम चौक येथून घरी चालत जात होते. त्यावेळी वागदरी-आळंद कॉर्नरवर लोखंडे यांच्या घरासमोर समोरून येणाऱ्या बल्करने लोहार यांना जोदार धडक दिली. यामध्ये लोहार हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारसाठी भाऊ श्रीशैल लोहार यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात बेशुध्दावस्थेत दाखल केले. त्यावेळी उपचारापूर्वीच महेश लोहार यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. प्रतीक माने यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### चारचाकी वाहनाला धडक दिल्याने ट्रकमधील दोघे जखमी

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**
अज्ञात चारचाकी वाहनाला धडक दिल्याने ट्रकमधील दोघे जखमी झाले. अफसर इसाक पटेल (वय ३३, रा. कमलानगर, कुमठा नाका, सोलापूर) आणि तुकाराम अर्जुन वाघमोडे (वय ३९, रा. जुळे सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी पावणे सातच्या सुमारास पटेल व वाघमोडे हे दोघे सोलापूर ते पुणे मालट्रक घेऊन जात होते. त्यावेळी कोळेगाव येथे समोरून जाणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनास धडक दिल्याने पटेल व वाघमोडे हे दोघे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मंदिरात महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**
शहरातील भवानी पेठेतील वैद्यवाडी येथील दुर्गादेवी मंदीरात महिलेला महिलांकडून मारहाण करण्यात आली. अनिता गोविंद शिवरल (वय ३०) असे जखमी महिलेचे नाव आहे. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी एकच्या सुमारास अनिता शिवरल या दुर्गादेवी मंदीरात गेल्या होत्या. त्यावेळी घरगुती वादातून ताई वरगंटे व इतर चार जणांनी मिळून अनिता यांना लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे अनिता यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### तणनाशक प्राशन करून तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**
विषारी तननाशक प्राशन करून तरूणाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सोमनाथ लक्ष्मण काकडे (वय ३७, रा. सासुरे, ता. बार्शी) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. २५ फेब्रुवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास सोमनाथ काकडे यांनी गावातील रस्त्याच्या कडेला अज्ञात कारणावरून गवतावर फवारणी करण्याचे तननाशक औषध प्राशन केले. यामुळे काकडे यांस त्रास होऊ लागल्यावर त्यांना नातेवाईक अशोक आवटे यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आला आहे.

### मुरूम टाकल्याच्या कारणावरून महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**
घरासमोर मुरूम का टाकला असे विचारण्यास गेलेल्या महिलेला लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. अनिसा सादिक शेख (वय ४०, रा. कुर्बान हुसेन नगर, गुरुनानक चौक, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी अनिसा शेख या घरासमोर मुरूम का टाकला म्हणून विचारण्यास गेल्या असता त्यांना आरिफ मैंदर्गी व इतर चार जणांनी मिळून ढकलून देत लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामुळे मुलगा शेहबाज शेख याने अनिसा यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# महाशिवरात्रनिमित्त शिवनामाचा जागर

## हर हर महादेवचा सर्वत्र घुमला निनाद

## सिद्धरामेश्वर मंदिरासह विविध मंदिरात भक्तांची मांदियाळी







महाशिवरात्री निमित्त सिद्धेश्वर मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. (छायाचित्र - केवल तिवारी)



### कसबा गणपती शिवशंकराच्या रुपात

**महाशिवरात्रनिमित्त श्री कसबा गणपतीला भगवान शिवशंकराच्या रुपात सजविण्यात आले होते. सकाळी रुद्रपूजन करण्यात आले. सकाळी इष्टलिंगास रुद्राभिषेक, रुद्रपठण करण्यात आले. यावेळी पूजेस संदीप जोशी उपस्थित होते. नंतर श्रींची महापूजा केल्यानंतर आरती करण्यात आली. भक्तांना प्रसाद वाटप करण्यात आले. दिवसभर दर्शनासाठी गर्दी झालेली होती.**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी**
ओम नमः पर्वती पतये हर हर महादेव... नाथांचा नाथ भोलेनाथ... की जय... या जयघोषाने शहरातील सर्व मंदिर परिसर दणाणून सोडले होते. निमित्त होते महाशिवरात्रीचे...! महाशिवरात्री निमित्त सोलापूर शहरातील विविध शिवमंदिरात शिवशंकर, महादेव, नीलकंठ, भोलेनाथांचे दर्शन घेण्यासाठी आबालवृद्ध तसेच महिला भाविकांची पहाटेपासूनच मंदियाळी दिसून आली. शहरातील विविध मंदिरात नवचैतन्याचे व प्रसन्नतेचे चित्र दिसून आले. धूप, दीप नैवेद्य अर्पण करून भाविकांनी भोलेनाथाचा जयजयकार केला.

दरम्यान, शहराचे ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी पहाटेपासून भाविकांनी तसेच महिलांनी मंदिरात श्रींचे दर्शन घेण्यासाठी एकच गर्दी केली होती. दुपारी बारा वाजता श्रींचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना मंदिराचा गाभारा खुले करण्यात आले. यावेळी भाविकांनी श्रीफळ वाढवून श्रींचा जयघोष करत दर्शन घेतले. तत्पूर्वी मंदिरातील विविध शिवलिंगासह सुहासिनी महिला भाविकांनी दुग्धशर्करा त्यानंतर बेलपत्र आणि पुष्प अर्पण करत श्री चरणी प्रार्थना केली. महाशिवरात्रीनिमित्त शिवयोग समाधीला फुलांनी तसेच सभामंडपाने सजवण्यात आले होते. अक्कलकोट रोड येथील श्री ब्रह्मठ होटगी मठात महाशिवरात्रीचा अनोखा उत्साह दिसून आला. मठातील प्रवेशद्वारापासून ते दासोहपर्यंत भाविकांची मोठी मांदियाळी होती. मठाच्या गाभाऱ्यात असणाऱ्या विशालकाय शिवलिंगाचे दर्शन घेऊन महिला भाविक धन्य झाल्या. प्रतीकात्मक शिवलिंगावर दुग्धाभिषेक घालून बेलपत्र, शवंतीचे फुल, धोत्र्याचे फुल, वाहून महिला भाविक श्री समोर नूतन मस्तक झाले. गर्भ गाभाऱ्यात महादेवाची आकर्षक अशी रांगोळी साकारण्यात आली होती. विविध आकर्षक रंगसंगतीमध्ये अलंकृत केलेली रांगोळी भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी महिला व पुरुष अशा दोन दर्शनरांगा निर्माण करून दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले होते. शहराच्या बाळीवेस भागात असणाऱ्या श्री कपिल सिद्ध मल्लिकार्जून मंदिरात देखील महाशिवरात्रीचा उत्कंठावर्धक उत्साह दिसून आला. उन्हाची तमा न बाळगता भाविकांनी रांगेमध्ये उभे राहून श्रींचे दर्शन घेतले. मंदिरात पहाटेपासून काकड आरती, महारुद्र पूजा, महाआरती असे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.

यावेळी मुली, सुवासिनी महिला आणि वृद्धमातांनी हर हर महादेव चा जयघोष करत १०१ वातींचे दीप प्रज्वलित करून श्रींची आराधना केली. गुरुनानक चौकातील जयशंकर आश्रम येथे देखील महाशिवरात्रीचा उत्साह पहावयास मिळाला. प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेच्या वतीने देखील इंचगिरी मठ येथे देखाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महादेवांचे दर्शन घेण्यासाठी व देखावा पाहण्यासाठी या ठिकाणी देखील भाविकांची मोठी गर्दी होती. विविध शिवमंदिरात आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील विविध शिवमंदिर परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस व होमगार्ड यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### महिला, मुलींनी केली शिवाराधना

महाशिवरात्रीनिमित्त सुवासिनी महिला वर्तवैकल्य उपवास करतात. शिवनामाचा जप या निमित्ताने रात्रभर केला जातो. त्यासाठीच महाशिवरात्र म्हणून प्रचलित आहे. या दिवशी सुवासिनी महिला तसेच कुमारीका मुली महाशिवरात्रीचा उपवास करून विशेष पूजा संपन्न करतात. त्या अनुषंगाने शहरातील विविध मंदिरात महिला व मुलींनी शिवनामाचा जप करून १०१ वातींचे दीप प्रज्वलित करून शिवाराधना केली. आपल्या आयुष्यातील यापुढचे क्षण चांगले असावेत, योग्य वर प्राप्त व्हावा. यासाठी मुली शिवाराधना करतात. तर सुवासिनी महिला देखील आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी शिवाराधना संपन्न करतात. असे ही यावेळी सांगण्यात आले.

### ठिकठिकाणी महाप्रसादाचे वाटप

शहरातील विविध चौका-चौकात शिवशंकराचे पूजन करून महाप्रसाद वाटप करण्यात आला. शहरातील लष्कर, नवीपेठ, भवानी पेठ, घोंगडे वस्ती, शिंदे चौक अशा विविध ठिकाणी महादेवांच्या प्रतिमेचे पूजन करून भाविकांना उपवासाचे महाप्रसाद वाटप केले गेले. त्याच पद्धतीने सिद्धेश्वर मंदिर परिसरात भाविकांना प्रसाद म्हणून केळी वितरण केले गेले. अन्नदान श्रेष्ठदान या अंतर्गत अनेक मंडळांनी उत्स्फूर्तपणे शाबू खिचडी, केळी, राजगिरा लाडू असे महाप्रसादाचे वाटप केले गेले.



## मंद्रुपच्या मल्लिकार्जुन मंदिरात दर्शनासाठी गर्दी

### पाच हजार भक्तांनी घेतले दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**
येथील कपिलसिध्द मल्लिकार्जुन मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी होती. पहाटे चार वाजता मंदिराचे पुजारी सुयेश स्वामी व शेखर स्वामी यांच्या हस्ते मल्लिकार्जुन देवाच्या मूर्तीस महाभिषेक करण्यात आला.

पहाटे सहा वाजल्यापासून दर्शनासाठी भक्तांची गर्दी सुरू झाली. मंद्रुप परीसरातील पाच हजार भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी कपिलसिध्द मल्लिकार्जुन युवक मंडळाच्या वतीने महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर प्रमोद नडविनंगळ यांनी रांगोळीतून महादेवाचे चित्र साकारले होते. यावेळी शिवपुत्र जोडमोटे, सातप्पा जोडमोटे, रेवणसिद्ध जोडमोटे, बाळासाहेब जोडमोटे, रमेश जोडमोटे, विजय जोडमोटे, कुमार जोडमोटे, महेश लिंबितोटे, नागेश माळी, शंतनु जोडमोटे, निलेश जोडमोटे, करबसय्या स्वामी, विशाल ख्याडे, विरेश जोडमोटे आदींनी परीश्रम घेतले.



## महाशिवरात्रनिमित्त गोशाळेत नंदी पूजन

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**
महाशिवरात्री निमित्त वडकबाळ येथील श्री कट्टेव्वादेवी गोशाळा येथे नंदीचे पूजन करून महाशिवरात्री कार्यक्रम उत्साहाने साजरी करण्यात आला. याप्रसंगी गोशाळेच्या अध्यक्ष उमा बिराजदार, व्यवस्थापक रुद्रप्पा बिराजदार यांच्यासह अनेक गोपालक उपस्थित होते.

## अकलूजमध्ये शिवरात्रनिमित्त लघुरुद्राभिषेक

### विविध धार्मिक कार्यक्रम; पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी





**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २६ फेब्रुवारी-**
हर हर महादेवचा जयघोष करीत दर्शनासाठी भाविकांनी केलेल्या गर्दीमूळे शंकरनगर व अकलूज परिसरात महाशिवरात्री मोठ्या भक्ती भावाने व उत्साहात साजरी झाली.

शंकरनगर येथील शिवपार्वती मंदिरामध्ये पहाटे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते शिवपार्वती मूर्तीस लघुरुद्राभिषेक व महापूजा करण्यात आली. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, नंदिनीदेवी मोहिते-पाटील, समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, सुलक्षणादेवी मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, कांचनमालादेवी मोहिते-पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते पाटील, इशिता धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह मोहिते-पाटील परिवारातील सदस्य, विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी व पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी दिवसभरात शिवपार्वतीचे दर्शन घेतले. मंदिराचे पुजारी प्रसाद कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी लघुरुद्र अभिषेकाचे आयोजन केले होते. यावेळी महर्षी जिमखाना यांच्या वतीने भाविकांना शाबुदाणा खिचडी व केळीचे वाटप करण्यात आले. पहाटेपासूनच दर्शनासाठी येथे भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. विजय चौकातील पुरातन श्री महादेव मंदिरात पहाटेची महापूजा जालिंदर लिगाडे व भीमाशंकर वैद्य यांच्या हस्ते झाली. वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने येथे प्रसादाचे वाटप करण्यात आले. रामायण चौकातील मल्लिकार्जुन महादेव मंदिरात सतीश कोरे यांच्या हस्ते पूजा झाली. नीरा नदीकाठच्या महादेव मंदिरात सुरेश कुंभार रोमन कुंभार ओंकार कुंभार सुभाष कुंभार व कुंभार कुटुंबीयांच्या वतीने अभिषेक करण्यात आला. किल्ला परिसरातील पुरातन बुरुजा महादेव मंदिरातही पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. अर्जुननगर येथील सोमेश्वर महादेव मंदिरात दीपक शेटे व सौ मंगल शेटे यांच्या हस्ते मूर्तीस अभिषेक व महापूजा पार पडली.

श्री क्षेत्र आनंदी गणेश आनंदनगर येथे स्वयंसिद्धेश्वर मंदिरात लघुरुद्र महाभिषेक कीर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील, ईश्वरीदेवी मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील व देवन्या मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाला. डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यावेळी उपस्थित होत्या. आनंदी गणेश संस्थेच्या वतीने दिवसभर प्रसादाचे वाटप झाले.

### कृषी महोत्सवातील विजेतयांना बक्षिस वितरण

शंकरनगर येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सव समितीच्या वतीने आयोजित केलेल्या कृषी व औद्योगिक प्रदर्शन, पीक स्पर्धा, दुग्ध स्पर्धा यामधील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वाटप करण्यात आले. यात्रेनिमित्त जनावरांच्या बाजारालाही हजारो भाविकांनी भेट दिली. सायंकाळी रघुवीर खेडकर कांताबाई सातारकर यांचा लोकनाट्य तमाशा चे आयोजन करण्यात आले होते यात्रेमध्ये पाळणे खेळणी चे दुकानात नागरिकांनी गर्दी केलेली दिसत होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०४१

**तुका म्हणें जया चित्तीं जे वासना ।**
**तयाची भावना तयापरी ।।**

चांगली आणि वाईट असे वासनेचे दोन प्रकार पडतात. यांपैकी ज्या प्रकारची वासना मानवाच्या मनात बळकट होते, त्या प्रकारची माणसाची भावना बळकटी धरते. त्याची ही बळकटी त्याचेकडून तशा प्रकारचे वर्तन करुन घेते. अर्थात, वर्तनाला त्याची वासना कारणीभूत असते. आपल्या मनात, चित्तात वाईट वासना असेल तर आपणाला समोरचे वाईट दिसू लागते. भावनेला बळकटी आणणारी आपली वासना समोरच्यांना आपल्या भावनेत शोषून घेण्याचा प्रयत्न करते. चांगली वासना जोपासणारा भावनाही चांगली ठेवतो आणि समोरच्यात चांगले पाहतो.वाईट वासनेच्या व्यक्तिच्या बाबतीत याउलट घडते. आपल्याप्रमाणे तो इतरांनाही वाईटच समजू लागतो. आपल्या वाईट वासनेचा तो अनेकांना बळी करतो. अर्थात, आपली भावना चांगली किंवा वाईट हे आपल्या चित्तात निर्माण होणाऱ्या वासनेवर अवलंबून असते. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणें जया चित्तीं जे वासना । तयाची भावना तयापरी ।। वाईट वासना जोपासणाऱ्यांना कुठे ना कुठे तरी ठेंच खावीच लागते. त्याउलट चांगली वासना जोपासणाऱ्यांना निश्चितच चांगलेपणाची प्रचिती येते. दुर्दैवाने नमूद करावे लागते की, वाईट वासना जोपासणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. समाजातील चांगले आदर्श कमी होत जाण्याचा हा परिणाम आहे. चुकीच्या पध्दतीने अनेकांच्या वाईट वासनांना पुष्टी मिळत असल्याने वाईट भावना जोपासणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. वाईट वासना-भावना जोपासणारा माणूस त्याच्या वाईट भावनेला जेव्हा प्रत्यक्ष कृतीत उतरवतो तेंव्हा त्याचा विपरीत परिणाम केवळ त्यालाच भोगावा लागत नाही, तर त्याची कृती ज्याच्याशी संबंधित आहे त्यालाही त्या परिणामाला सामोरे जावे लागते. महिलांवरील, दीन-दुबळ्यांवरील वाढते अत्याचार ही दुष्ट वासनेची, दुष्ट भावनेचीच उदाहरणे आहेत. मूळात चित्तच जर शुध्द असेल तर वाईट भावना जोपासलीच जात नाही आणि वाईट भावनाच जर नसेल तर आपल्या हातून वाईट घडण्याचे कारणच नाही. चित्त शुध्द होण्यासाठी चांगल्यांचा सहवास लाभला पाहिजे. चांगल्यांचा सहवास आपोआपच घडेल असे नसल्याने त्याचा शोध आपणाला घ्यावा लागेल. समाजात भरपूर चांगले लोक आहेत. सर्वांना वाईट म्हणून चालणार नाही. आपल्या दृष्टीवर बरेच कांही अवलंबून असल्याने आपण आपली दृष्टी सकारात्मकच जोपासायला हवी. आपली सकारात्मक दृष्टी निश्चितच आपणाला चांगल्यांच्या सहवासात नेईल. मूळात आपण नकारात्मक दृष्टी जोपासली तर चांगलासुध्दा वाईट दिसू लागेल. अर्थात, चांगल्यांचा सहवास केवळ आपल्या दृष्टीमुळे दुरापास्त होऊन बसेल. संत, महात्म्यांची ग्रंथ संपदा, त्यांची चरित्रं आपल्याजवळ आहेत. या सर्वांचा सहवाससुध्दा आपली चित्तशुध्दी करण्याला खूप मदत करु शकेल. कोणाकडून कसे आणि किती घ्यायचे हे बऱ्याच अंशी आपल्यावरच अवलंबून असते, हे ही आपण याप्रसंगी लक्षात ठेवायला हरकत नसावी.



जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार**
**दि. २७ फेब्रुवारी २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**कृ. चतुर्दशी (०८.५४)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - धनिष्ठा (१५.४३)**
**योग - शिव (२३.४०)**
**करण - चतुष्पाद (१९.३७)**

**दिनविशेष - चांगला दिवस**
**मराठी भाषा गौरव दिन**
**दर्श अमावस्या**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल.

# सोलापूरकरांचा कल तडजोडीकडे

## लोकअदालतीत सामंजस्याने तोडगा; पक्षकारांचा वेळ अन् पैशाची बचत

**तभा वृत्तसेवा, अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

कौटुंबिक वाद असो, वा मालमत्तेसाठीची भांडणे... न्यायालयात वर्षानुवर्षे लढा देऊन प्रचंड पैसे आणि वेळ खर्च करण्यापेक्षा त्यात तडजोड करण्याकडे सोलापूरकरांचा कल वाढत आहे. त्यामुळेच गेल्या वर्षभरात सोलापूर न्यायालयात झालेल्या चारही लोकअदालतींमध्ये एकूण ४५ हजार २४२ प्रकरणे न्यायालयात दाखल होण्यापूर्वीच निकाली निघाली असून, त्यातील पक्षकारांमध्ये सुमारे ३३० कोटी १३ लाख रुपयांची तडजोड झाली आहे.

लोकअदालतीत तडजोड केल्यास पक्षकारांचा वेळ, श्रम आणि



पैसा वाचतो; तसेच जलदगतीने न्याय मिळतो. त्यामुळे लोकअदालतीत दावा ठेवण्यास पक्षकार प्राधान्य देत आहेत. गेल्या वर्षी झालेल्या चारही लोकअदालतींमध्ये एकूण ४५ हजार २४२ दावे निकाली निघाले. निकाली दाव्यांमध्ये दाखलपूर्व प्रकरणांची संख्या अधिक होती. हे दावे दाखल करण्यापूर्वीच निकाली निघाल्याने न्यायालयांवरील कामाचा ताण कमी झाला आहे.

### दाखलपूर्व प्रकरणांत मध्यस्थीने तोडगा

एखाद्या भांडणातून न्यायालयात दावा दाखल केल्यानंतर वर्षानुवर्षे सुनावणी चालते, त्यासाठी पक्षकारांचा पैसा आणि वेळ खर्च होतो. त्यामुळे न्यायालयात खटला दाखल करण्यापूर्वीच सामंजस्याने तोडगा काढल्यास जलदगतीने न्याय मिळतो. अशा दाखलपूर्व प्रकरणांमध्ये मध्यस्थीने तोडगा निघतो. त्यामुळे पक्षकारांमधील वाद सामंजस्याने सोडविण्यासाठी लोकअदालतीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

### २०२४ मध्ये झालेल्या चारही लोकअदालतींचे यश

| दिनांक | निकाली प्रकरणे | तडजोड रक्कम |
|---|---|---|
| ०३/०३/२०२४ | ३००८ | ६३,६५,९१,२३२/- |
| २७/०७/२०२४ | ११,४१३ | १,१४,३६,६७,८३४/- |
| २८/०९/२०२४ | १०,९९० | ८१,०५,८१,३६०/- |
| १४/१२/२०२४ | १९,८३१ | ७१,०५,१४,६०५/- |

### लोकअदालतीत निकाली निघालेली दाखलपूर्व प्रकरणे

तडजोडयोग्य फौजदारी, दिवाणी, धनादेश न वटणे, बँकांची कर्ज वसुली, कामगार व कंपनी यांच्यातील वाद बीज आणि पाणीबिले, कौटुंबिक दावे, मोटार : अपघात न्यायाधिकरण, भूसंपादन, महसूल, वाहतूकसंबंधी तक्रारींचे दावे.

न्यायालयात प्रकरण दाखल होण्यापूर्वी न्यायालयात प्रकरण दाखल होण्यापूर्वी पाठविण्यात येते. मध्यस्थ दोन्ही पक्षकारांचे समुपदेशन करून त्यांच्यातील वाद सामंजस्याने सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यानंतर लोकअदालतीत तडजोड झाल्याने पक्षकारांचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो आणि जलदगतीने न्याय मिळतो.

**- उमेश देवर्षी,**
सचिव, सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण.



# 'रोटरी' चे व्यावसायिक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे वर्ष २०२४-२५ चे व्यावसायिक पुरस्कार रंगभवन शेजारील हॅच फ्री मेसन्स हॉल येथे जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग रजपूत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

ॲड. रजपूत यांचे कायदा व पोलीस आणि जनता ह्या विषयावर व्याख्यान झाले क्लबचे अध्यक्ष सीए सुनील माहेश्वरी यांनी प्रास्ताविकात रोटरी क्लब ऑफ सोलापूर मागील ५० वर्षांपासून हे पुरस्कार देत आहे असे नमूद केले क्लब वोकॅशनल संचालक आनंद गुंड्याल यांनी रोटरी तर्फे देण्यात येणाऱ्या या पुरस्कार आणि निवड प्रक्रियेबद्दल माहित दिली. धनश्री केळकर यांनी सूत्रसंचालन आणि ब्रिजकुमार गोयदानी यांनी आभार मानले.

### सर्वोत्कृष्ठ पुरस्कारार्थी असे-

पोलीस स्टेशन : विजापूर नाका पोलीस स्टेशन.
पोलीस कर्मचारी : अमृत सुरवसे.
पोस्टमन : लखन किसन पवार.
रेल्वे लोको पायलट : एल. जी. सगर.
एम.एस.आर.टी.सी.ड्रायव्हर : फरहद हुसेन दाऊद शेखजी.
सर्वोत्कृष्ठ जनमित्र (एमएसईबी) : किरणकुमार इरनाळे.



# अवयवदानाविषयी नागरिकांनी पुढे यावे : डॉ. जगताप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

सोलापूर विद्यापीठात रक्तदान, अवयवदान संकल्प कार्यक्रम अवयवदान काळाची गरज असून एका मेंदू मृत व्यक्तीपासून सहा ते सात जणांचा जीव वाचू शकतो. त्यामुळे कोणताही गैरसमज न बाळगता अवयवदानाविषयी नागरिकांनी स्वतःहून पुढे येण्याची गरज असल्याचे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजीत जगताप यांनी व्यक्त केले.

मंगळवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त शासनाच्या सूचनेनुसार कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान व मरणोत्तर नेत्रदान संकल्प कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर अवयदान याविषयी डॉ.अभिजीत जगताप यांचे व्याख्यान ही पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले. डॉ. हेडगेवार रक्तपेढी यांच्या सहकार्याने विद्यापीठात रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. कुलसचिव योगिनी घारे यांनीदेखील यात सहभागी होत रक्तदान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रुती देवळे यांनी केले तर आभार डॉ. केदारनाथ काळवणे यांनी मानले.

# शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केंद्र सरकार कटीबद्ध

## मंत्री रामदास आठवले; कृषी विज्ञान केंद्रात किसान सन्मान समारोह कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केंद्र सरकार कटीबद्ध आहे. सर्वसामान्य जनतेला सामाजिक न्याय देणे शेतकऱ्याचे कल्याण करण्यासाठी केंद्र सरकार प्राथमिकता देत आहे. महिला शेतकऱ्यांची उपस्थिती त्यांचे अधिक योगदान असल्याचे दर्शवते, असे प्रतिपादन केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचे राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. ते शबरी कृषी प्रतिष्ठान सोलापूर संचलित कृषी विज्ञान केंद्र सोलापूर येथे आयोजित किसान सन्मान समारोह कार्यक्रमांमध्ये बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, शबरी कृषी प्रतिष्ठान सोलापूरचे अध्यक्ष प्रदीप गायकवाड, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूरचे संचालक डॉ. राजीव मराठे, राजाभाऊ सरवदे, कृषी विज्ञान केंद्र सोलापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. लालासाहेब तांबडे उपस्थित होते.

सन्मान निधीच्या एकोणिसाव्या हप्त्याचे वाटप माननीय पंतप्रधान यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शबरी कृषी प्रतिष्ठान सोलापूरचे अध्यक्ष प्रदीप गायकवाड हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मान्यवरासह कृषी प्रदर्शनाची पाहणी केली. प्रास्ताविक कृषी विज्ञान केंद्र सोलापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. लालासाहेब तांबडे यांनी केले. नैसर्गिक शेती व सेंद्रिय निविष्ठांचा वापर याविषयी सेंद्रिय शेती करणारी शेतकरी उमेश श्रीधर देशमुख काळेगाव, तालुका. बार्शी आणि अजित ओक हत्तुर, तालुका. दक्षिण सोलापूर यांनी आपले अनुभव कथन केले. अंतिम सत्रामध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भागलपूर बिहार येथून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संभाषणाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी काळेगाव सुरडी, दहिटणे, ढोराळे, पिंपरी. तालुका बार्शी बांगी, हत्तुर, कंदलगाव, बोरामणी. तालुका. दक्षिण सोलापूर, चुंगी, मोठ्याळ, बोरगाव, साफळे, काजीकंवस, किणीवाडी ता. अक्कलकोट येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन विशेषज्ञ अमोल शास्त्री यांनी तर आभार प्रदीप गोंजारी यांनी मानले.

# डी. के. मागासवर्गीय संस्थेतर्फे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीचे औचित्य साधून डि.के. मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती कार्याध्यक्ष गौतम कसबे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या उपक्रमाचे हे १८ वे वर्ष आहे. यंदाच्या वर्षी सुमारे १०० जोडप्यांचा विवाह करण्याचे नियोजन आहे. या विवाह सोहळ्यात वधुस पांढरी साडी, शालू आणि मनी मंगळसूत्र, जोडवे आणि वरास पांढरे कपडे आणि सूट त्याचबरोबर संसार उपयोगी साहित्य देण्यात येणार आहे. इच्छुक वधू-वरांनी आपली नावे दि. १४ एप्रिल २०२५ पर्यंत नोंदवावीत. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी धीरज माने ९८९०४३०९४२, उत्तम कसबे ८८८८४८४३७५, शशिकांत शिरसट ९८५०८००८४१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कार्याध्यक्ष गौतम कसबे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस शशिकांत शिरसट, बापू सदाफुले, किरण डोळसे, विकास निकाळजे आदी उपस्थित होते.

# निलम गोऱ्हेंच्या वक्तव्याचा शिवसेना महिला आघाडीकडून निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

विधान परिषदेच्या उपाध्यक्षा नीलम गोऱ्हे यांनी संविधानिक पदावर असताना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठाचा वापर असंविधानिक कामासाठी करत माननीय पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर बिन बुडाचे निराधार आरोप केले आहेत. या बेताल वक्तव्याचा जाहीर निषेध शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली व युवा सेना सहसचिवा पूजा खंदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सोलापूर जिल्हा महिला आघाडीने केला आहे.




नीलम गोऱ्हे या कृतघ्न आहेत. त्यांना पक्षाने चार वेळा विधान परिषदेवर आमदार केले. विधान परिषदेवर उपसभापती बनवले, आता पुन्हा आमदारकी मिळवण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेबांवर खोटे आरोप केले आहेत.त्यामुळे महाराष्ट्रात गोऱ्हे यांच्या विरोधात संतापाची लाट निर्माण झाली आहे. सोलापूर जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीने पूर्व भागातील अक्कलकोट रोड लगत शनिधाम चौकात निदर्शने केली. पैसे देऊन पद दिली जातात असे खोटे आरोप करून तुम्ही स्वतःची प्रतिमा मलीन केली व स्वतःच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण केलेआहे. चार वेळा आमदारकी व उपसभापती पद घेताना उद्धव साहेबांना तुम्ही किती मर्सिडीज दिल्या त्याच्या पावत्या आम्हाला द्या, अन्यथा माफी मागा असेही महिला आघाडीने सांगितले. यावेळी लोकसभा क्षेत्र संघटिका शशिकला शिवडीशेट्टी, शहर संघटिका रंगरेज, उपशहर संघटिका मीना सुरवसे, गीता मदन, पूजा धोत्रे आदी महिला पदाधिकारी उपस्थित होते

# आवडत्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी प्रगती साधावी

## आ. विजयकुमार देशमुख; दांडपट्टा विश्वविक्रमवीर मावळ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंगी काहींनाकाही सुप्त गुणे असतातच. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात अधिकाधिक ज्ञान प्राप्त करून आपल्या शहराचा नावलौकिक वाढविण्याचा प्रयत्न करावा' असे प्रतिपादन आ. विजयकुमार देशमुख यांनी केले.

शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रशालेचे इयत्ता ७ वी मधील विद्यार्थी आदिनाथ खंडेराव व सुयश हुच्चे यांनी सलग १९ तास, १९ मिनिटे,१९ सेकंद दांडपट्टा चालविण्याचा विश्वविक्रम केल्याबद्दल सहस्रार्जुन शैक्षणिक संकुलच्या वतीने आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात



आला. याप्रसंगी ते बोलत होते. सहस्रार्जुन शैक्षणिक संकुलाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष संजीव बिद्री हे होते. यावेळी व्यासपीठावर शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजू भुमकर, सदस्य भरतकुमार शालगर, संजीव हिरलालसा रंगरेज, तुकाराम पवार, संजीव वसंतसा रंगरेज, श्रीराम पवार, शिरीष कोल्हापुरे यांच्यासह प्रशालेचे मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजूषा काशीद, इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक डॉ. विष्णू रंगरेज आदी उपस्थित होते. प्रास्ताविक सचिव गजानन गोयल यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री व शालेय समितीचे अध्यक्ष राजूसा भुमकर यांनीही विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन सहशिक्षक जय कबाडे यांनी केले तर आभार सहशिक्षक अनिल गायकवाड यांनी मानले.

# संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (६४) राष्ट्रीय

डॉक्टरजी म्हणायचे एखादी व्यक्ती राष्ट्रीय हे कसे ठरवायचे, ते त्याच्या वृत्तीवरून कळते. त्याची वृत्ती भक्तीमय आहे की भोगवादी, याला अनुसरून तो भारतमातेला उपमा अलंकारांनी सजवतो. त्यावेळी शाळेतील लहान मुले कवी इकबाल चे गाणे समूह स्वरात म्हणायची. तो हिंदुस्थानचे वर्णन करताना 'हम बुलबुले है उसकी। वह गुलिस्ताँ हमारा ।। म्हणजे तो आमचा बगीचा आहे व आम्ही त्यातील लहान लहान बुलबुल पक्षी आहोत असे म्हणतो. संघाला भारत मातेला अशी उपमा देणे अजिबात पसंत / मान्य नाही. (मला आठवते हे गाणे दुर्बुद्धीच्या संस्काराने स्वातंत्र्यानंतरही आम्ही शाळेत म्हणत असू. नंतर हा इकबाल पाकिस्तानात पळून गेला होता तरीही; याहून आपल्या शिक्षण पद्धतीचे दुर्दैव कोणते ? असो) संघात राष्ट्रीय वृत्तीने हिंदूंची अंतकरणे घडवली जातात. डॉक्टर म्हणतात आपल्या देशात उेश्रश्रशसश ेष ठढ आहे पण उेश्रश्रशसश ेष क्ए्ठढ नाही. संघ राष्ट्रीय वृत्ती घडवणारे, जीवन जगण्याचे शास्त्र शिकवणारे महाविद्यालय आहे. यावर भर देऊन शाखेतील रोजचे उपक्रम असावेत; याची संघात उच्चस्तरीय पाहणी होत असे. आज सुद्धा संघाची / समितीची देशभक्तीपर गीते हृदयस्थ संस्कार करणारी असतात हे वादातीत सत्य आहे.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### महाराष्ट्र ग्रामीण साहित्य विकास मंडळाच्या अध्यक्षपदी सूर्यकांत भिसे



**अकलूज, दि. २६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र ग्रामीण साहित्य विकास मंडळाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यीक सूर्यकांत भिसे यांची निवड करण्यात आली आहे. अध्यक्षपदी सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष प्रा. विष्णू सुर्वे, सचिव तानाजी बावळे, खजिनदार सुहास उरवणे तर सदस्य वीरेंद्र पतकी, गणपत जाधव, जयंत बोबडे, संजीवनी घोडके व स्वाती कळसुले यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र ग्रामीण साहित्य विकास मंडळ, अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय व इंग्लिश स्कूल, वेळापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिनाच्या निमित्ताने गुरुवारी २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता इंग्लिश स्कूल, वेळापूर येथे ज्येष्ठ साहित्यिक सुहास उरवने यांचे माझा मराठीची बोलू कौतुके परि अमृतातेहि पैजासी जिंके। या विषयावर व्याख्यान तसेच दुपारी ३ वाजता धानोरे येथे ज्येष्ठ कवी तानाजी बावळे, वीरेंद्र पतकी, प्रतिभा गोडसे, गणेश गोडसे, सुहास उरवणे व जयंत बोबडे या मान्यवर कवींचे काव्य वाचन होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष प्रा. विष्णु सुर्वे, प्राचार्य मनोजकुमार नांगरे व आर. बी. पवार यांनी केले आहे.



### अनगर अप्पर तहसील कार्यालय रद्दचे पत्र नागनाथांच्या चरणी अर्पण

**मोहोळ, दि. २६ फेब्रुवारी-**

अनगरचे अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्याच्या निकालाची प्रत महाशिवरात्रीच्या निमित्ताने नागनाथ चरणी अर्पण करून अनोख्या पद्धतीने विजय साजरा केला आहे. संतोष पाटील यांच्यासह अनेकांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या निमित्ताने व खासदार धनंजय महाडीक, उमेश पाटील व आ. राजू खरे यांच्या प्रोत्साहनामुळे मला उच्च न्यायालयात बाजू मांडण्याची संधी मिळाली व आम्ही ही लढाई जिंकली याचा मला अभिमान असून मी स्वतःला भाग्यवान समजते अशा शब्दात जनहित याचिकेच्या मुख्य ॲड. वृषाली मैंदाड यांनी आपली भावना पत्रकार परिषदेत व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे माजी मुख्य प्रवक्ते उमेश पाटील, मोहोळ तालुका भाजपाचे अध्यक्ष सुनील चव्हाण, नगराध्यक्ष नेते रमेश बारसकर, भीमा कारखान्याचे संचालक संभाजी कोकाटे, माजी नगरसेवक सुशील क्षीरसागर उपस्थित होते. अप्पर तहसील कार्यालय रद्ध करण्यासाठी लढा दिलेल्या मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

### उमा महाविद्यालयात रक्तदान, मरणोत्तर अवयव दान संकल्प शिबीर

**पंढरपूर, दि.२६ फेब्रुवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय सेवा योजना पंढरपूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, कुलसचिव योगिनी घारे, रासेयो संचालक डॉ. राजेंद्र वडजे, जिल्हा समन्वयक डॉ. विरभद्र दंडे यांच्या मार्गदर्शनानुसार स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या ६० व्या पुण्यतिथी निमित्त उमा महाविद्यालय पंढरपूर येथे भव्य रक्तदान व मरणोत्तर अवयव दान संकल्प शिबीर घेण्यात आले. उद्घाटन विभागीय समन्वयक प्राचार्य डॉ. संजय मुजमुल, प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एन. एस. लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सुवर्णा हजारे यांनी केले.आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.सिंधू खिलारे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. डॉ.हेडगेवार रक्त केंद्र सोलापूर येथील डॉ. स्मिता बूब उपस्थित होते.




### वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप

**बार्शी, दि. २६ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक सेनाचे बार्शी तालुकाध्यक्ष युवराज गोवर्धन जगताप (काटेगाव, ता. बार्शी) यांच्या ४९ व्या वाढदिवसानिमित्त छत्रपती क्रीडा शिक्षण व समाजसेवी संस्था उपळाई (ठों) या संस्थेच्या दत्त प्राथमिक विद्यामंदिर व दिलीपराव सोपल प्रशाला, बार्शी या दोन्ही शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना म्हणजे साधारण ३०० विध्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी खाऊचा आनंद घेतला. सर्व शिक्षक, विद्यार्थ्यांनी युवराज जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. चौथीच्या सर्व मुलांनी त्यांना भिंतीवरील सुंदर घड्याळ भेट दिले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहन ठोंगे यांनी आभार मानले. यावेळी मुख्याध्यापक श्रीकांत कुंभार, मंगेश मोरे, चंद्रकांत लोखंडे, राहुल ठोंगे, अरुणा मठपती, ललिता चव्हाण, शितल पाटील, सारिका लंगोटे उपस्थित होते.

### प्रा. सुनिता लोंढे नेट परीक्षेत उत्तीर्ण



**मंगळवेढा, दि.२६ फेब्रुवारी -**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्यावतीने डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या नेट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून श्री संत दामाजी महाविद्यालयातील प्रा. सुनिता हरीदास लोंढे या अर्थशास्त्र विषयामधून नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमधून त्यांनी हे यश मिळविलेले असून यापूर्वीही त्या सेट व विविध स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आहेत. या यशाबद्दल विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष राहुल शहा, उपाध्यक्ष बाबासाहेब पाटील, सचिव किसनराव गवळी, संचालक मंडळ प्राचार्य डॉ. ए. जे. जाधव, उपप्राचार्य राजेंद्र गायकवाड यांनी अभिनंदन केले.

# साखर कारखान्याच्या मनमानीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

## धोत्रीतील प्रकारामुळे जमिनी बनत आहेत नापीक; दहशतीमुळे बळीराजाचे काही चालेना

**तभा वृत्तसेवा । कल्लप्पा स्वामी**
**वळसंग, दि. २६ फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथे असणाऱ्या गोकुळ साखर कारखान्याची प्रदूषित पाणी कारखान्याच्या आजूबाजूला असणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतात जात आहे. यामुळे पिकाची व जनावरांचे भरपूर नुकसान होत आहे. शेतकऱ्यांची नुकसान भरपाई न देता मनमानी पद्धतीने व राजकीय बळाचा वापर करण्यात येत आहे. यामुळे शेतकरी भरडला जात आहे.

धोत्री येथील गट नंबर १७६, १७० व १६५ तसेच शेकडो एकर जमीन कारखान्याच्या दूषित पाण्यामुळे खराब व नापीक होत आहे. पीडित शेतकरी शांतता महादेव बिराजदार (वय ८२) यांचे शेती गट नंबर १६५ मधून ३५ एकर कारखान्याने खरेदी घेतली असून उरलेल्या आठ एकरमध्ये सांडपाणी सोडण्यात येत असल्याने शेती करण्यायोग्य जमीन राहिली नाही. नुकसान भरपाई मागितल्यावर त्या शेतकऱ्यावर स्थानिक व मोठ्या राजगाण्यांची दबाव आणून त्रस्त केले जात आहे. शांतप्पा बिराजदार यांची मुले परगावी आहेत. उदरनिर्वाह भागविणाऱ्या जमिनीवर अशा पद्धतीने पाणी सोडण्यात येत असल्याने त्यांच्यावर उपाशीमारीची वेळ आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ उ प्रादेशिक कार्यालय सोलापूर येथे त्यांनी नुकसान भरपाईची याचिका दाखल केली आहे.

प्रदूषित पाण्यामुळे जानेवारी २०२३ मध्ये ३ लाख ५४ हजारांची नुकसान भरपाई मिळाली होती. परंतु त्यानंतर अद्याप कुठलाही नुकसान भरपाई दिली नाही. वारंवार कारखान्यामध्ये चेअरमन यांच्याशी संपर्क साधला असून उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहे. अधिकाऱ्यांनी शेत व विहिरीची पाहणी करून नुकसान भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

धोत्रीचे लक्ष्मण काशिनाथ बिराजदार यांच्या गट नंबर १७६ व १७० एकूण नऊ एकर सदर बोअर आणि विहिरीमध्ये कारखान्याचे दूषित पाणी येत आहे. यामुळे पाणी दूषित झाले आहे. त्यामुळे पाण्याची उपयोग पाळीव प्राण्यांना केल्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच शेतातील ऊस, सोयाबीन, ५०-६० लिंबूचे झाडे खराब होत आहेत. सध्या जमीन नापीक झाली असून प्राण्यांची पण दैनिय अवस्था झाली आहे.



### चेअरमनचा शेतकऱ्यांवर दबाव

नुकसान भरपाईबाबत चेअरमन यांच्याकडे मागणी केल्यानंतर मोठमोठ्या राजकारण्यांची नावे सांगत शेतकऱ्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी तालुका कृषी अधिकारी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ उपप्रदेश कार्यालय सोलापूर यांनी या बाबीचे सविस्तर पाहणी करून नुकसान भरपाई मिळवून द्यावी असे त्यांना निवेदन देण्यात आले. कारखान्याजवळील सर्व शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. परंतु काही शेतकरी त्यांच्या दबावाखाली कुठलाही विरोध घेण्यास घाबरून नकार देत आहेत. निवेदन देताना रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार, जिल्हा सरचिटणीस रमेश भंगे, जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण बिराजदार, शांतप्पा बिराजदार, नंदकुमार गणपती बिराजदार यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## पाणी प्रश्नावर राधाकृष्ण विखे-पाटील, आ. डॉ. देशमुख यांच्यात चर्चा



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२६ फेब्रुवारी-**

जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी भेट घेत सांगोला तालुक्यातील पाणी प्रश्नासंदर्भात विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

सांगोला तालुक्यात पाण्याची पातळी खालावलेली आहे. नदी, तलाव, बंधारे, ओढे, नाले कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. पाणी प्रश्न मार्गी लावण्याची मागणी शेतकऱ्यांनी केलेली असून काही ठिकाणी पाण्याआभावी पिके जळून जाण्याचा धोका निर्माण झालेला आहे. तरी तालुक्यातील पिकांना जीवदान देण्यासाठी टेंभू तसेच म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरु करून माण व कोरडा नदी वरील सर्व बंधारे लवकरात लवकर भरून द्यावेत त्याचबरोबर तालुक्यातील बरेचसे क्षेत्र नीरा उजवा कालव्याच्या लाभक्षेत्रा मध्ये येते. सद्य स्थितीमध्ये लाभक्षेत्रा मध्ये उन्हाची त्रीवता वाढली असल्याने पिकांना तातडीने पाण्याची आवश्यकता भासत असून दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झालेली असुन पाण्याची पातळी खालावलेली आहे. तरी नीरा उजवा कालव्याचे सन २०२४-२०२५ चे उन्हाळी आवर्तन तातडीने सुरु करावे तसेच सोनके तलाव लवकरात लवकर भरून देण्यात यावा आणि म्हसवड (राजेवाडी) या मध्यम प्रकल्प योजनेतून कटफळ तलावात पाणी सोडण्यात येवून आगामी उन्हाळी आवर्तन मिळावे अशी निवेदनाद्वारे मागणी केली. यावेळी राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मकता दर्शवत लवकरात लवकर यावर कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले असल्याचेआ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

## केम रेल्वे भुयारी मार्गाचा प्रश्न लवकरच निकाली निघणार

### संदीप तळेकर यांची माहिती; माजी आ. संजयमामा शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२६ फेब्रुवारी-**

केम-ढवळस हा जिल्हा प्रमुख मार्ग क्रं १४ रेल्वे लाइन कि.मी क्र.३५९/२६ ३५९/२८ या मार्गावर रेल्वे लाईन असल्यामुळे केम गावाच्या रेल्वे लाईन पलिकडे छोटी मोठी सुमारे सात ते आठ गावे असून केम ढवळस व इतर गावांना जोडण्यासाठी व येणे-जाणे व दळणवळण करण्यासाठी कोणताही रस्ता उपलब्ध नसल्यामुळे येथील लोकवस्ती अनेक गावातील लोकांना व आजूबाजूला असणाऱ्या अनेक गावातील लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. हा प्रश्न लवकरच निघाली लागणार असल्याचे संदीप तळेकर यांनी सांगितले.

रेल्वे मार्गाच्या अलीकडील व पलीकडील गावातील लोकांना पाऊस पडल्यावर येण्या जाण्यासाठी अडथळा निर्माण होऊन सदर गावातील लोकांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना रेल्वे लाईन ओलांडून येणे जाणे करावे लागते त्यामुळे त्याच्या जीवास धोका निर्माण होऊ शकतो. या कारणास्तव रेल्वे प्रशासन यावर लक्ष घालून लोकांच्या सेवेसाठी केम ढवळस जिल्हा प्रमुख कि.मी क. ३५९/२६/३५९/२८ या मधून भुयारी मार्ग रेल्वे प्रशासनाने बनवून द्यावे अशी मागणी माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी पत्राद्वारे केली होती. त्यानंतर रेल्वे प्रशासन खथऊ प्रमुख आधिकारी प्रसाद जोशी व सार्वजनिक बांधकाम विभाग करमाळा कुडूवाडी लोकरे यांनी मिळून सर्वे करून प्रस्ताव रेल्वे विभाग सोलापूर यांच्याकडे पाठवून दिला व सोलापूर मंडल रेल्वे प्रबंधक डॉ. सुजित मिश्रा व ताजऊदीन यांच्याकडून केम ढवळस रेल्वे मार्गावरील भुयारी मार्गाला तीन ते चार महिन्यांमध्ये मंजुरी मिळून काम लवकर चालू होणार आहे अशी माहिती दिली.



### लवकरच शटल सेवा

रोज सकाळी दौंड व सोलापूर येथे शेतकरी वर्ग, शालेय विद्यार्थी, व कर्मचारी लोकांना येण्या-जाण्यासाठी लवकरच शटल चालू होईल, असेही आश्वासन देण्यात आले. त्यामुळे केम गावामध्ये व आजूबाजूच्या गावामध्ये आनंद व्यक्त होत आहे. याचा सर्व पाठपुरावा प्रहार संघटना करमाळा तालुकाध्यक्ष संदीप तळेकर हे करत आहेत.




## सहकार महर्षी महाविद्यालयामध्ये पालक-शिक्षक मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २६ फेब्रुवारी-**

येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च,शंकरनगर-अकलूज या अभियांत्रिकी महाविद्यालयामधील पदविका कम्प्युटर इंजिनीरिंग विभागामध्ये विकास समिती अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालक-शिक्षक मेळावा झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण ढवळे यांनी दिली.

कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात प्रा. श्रेया देशमुख. यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. आणि पुढील मनोगत विभाग प्रमुख फडे जी.एम यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

सर्वप्रथम त्यांनी सर्व प्राध्यापक सदस्यांची पालकांशी ओळख करून दिली. त्यांनी विभागामध्ये वर्षभर चालणाऱ्या शैक्षणिक क्षेत्रातील तसेच शैक्षणिक व्यतिरिक्त उपक्रम याबद्दल पालकांना अवगत केले. तसेच विद्यार्थी आणि पालक या दोघांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यावर भाष्य केले. त्यानंतर विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि प्रथम चाचणी चे गुण संबंधित मार्गदर्शकांनी पालकांना दाखवले.

प्राचार्य डॉ. ढवळे पी. ए. यांनी मार्गदर्शन केले. प्रथम सत्रामध्ये कॉम्प्युटर विभागातील अंतिम वर्षातील अभियांत्रिकीच्या शेख अब्दाल (९३.८९) प्रथम क्रमांक, बचुटे आदित्य (९१.८९) द्वितीय क्रमांक, येवले साक्षी (९०.७८) तृतीय क्रमांक, व कॉम्प्युटर विभागातील द्वितीय वर्षातील अभियांत्रिकी पदविकेच्या पेटकर श्रद्धा (९६.००) यांनी प्रथम क्रमांक, स्वरांजली माने-देशमुख (९२.९४) द्वितीय, स्नेहा माने-देशमुख (८७.७७) हिने तृतीय क्रमांक मिळवला आहे. कॉम्प्युटर विभागातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविकेच्या शेख माहेविश हिने (८५.८८) यांनी प्रथम, तलवार अप्पासाहेब (८५.२९) द्वितीय, धनश्री माने (८३.४१) तृतीय क्रमांक मिळवला. शेवटी प्रथम वर्ष विभाग प्रमुख गोडसे यांच्या आभार प्रदर्शनाने सभेची सांगता झाली. समन्वयक म्हणून प्रा. श्रेया देशमुख यांनी काम पाहिले.

## लहूजी शक्ती सेनेच्या अधिवेशनाचे निमंत्रण



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ फेब्रुवारी-**

लहुजी शक्ती सेनेच्या वतीने १ मार्चला मातंग समाजाच्या प्रलंबित प्रश्न, समस्या, विविध मागण्यासंदर्भात राज्यस्तरीय महाधिवेशन होणार आहे. त्या संदर्भात जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष महादेव भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत संघटनेकडून निवेदन व आमंत्रण देण्यात आल्याची माहिती लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी दिली.

आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे यांना आमंत्रण देण्यात आले.

यावेळी लहुजी शक्ती सेना पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष महादेव भोसले, कार्याध्यक्ष खंडू बनसोडे, जिल्हाध्यक्ष वसंत देडे, राज्य कार्यकारिणी सदस्य अनिल बनसोडे, जिल्हा युवक अध्यक्ष सोमनाथ कसबे, सोलापूर शहराध्यक्ष योगेश सोनवणे, सोलापूर शहर संपर्कप्रमुख परशुराम कांबळे, अजित पवार, अजय मोहिते, किरण क्षीरसागर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

अ, ब, क, ड सुप्रीम कोर्टाच्या प्रस्तावाला राज्य शासनाने अंमलबजावणी करणे, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार मिळावा, अण्णाभाऊ साठे महामंडळाकडून लाभार्थ्यांच्या जाचक अटी शिथील केल्या जाव्यात, आण्णा भाऊ साठे महामंडळाकडून लाभार्थ्यांना थेट ५ लाख ते २५ लाख त्यांच्या खात्यात जमा व्हावी. याशिवाय लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीची शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी.

**- वसंत देडे, जिल्हाध्यक्ष, लहुजी शक्ती सेना, सोलापूर**

## निसर्ग अभ्यासासाठी शाळा थेट निसर्गात

### पक्षी अभ्यासक डॉ. कुंभार यांचे निसर्गविषयक अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २६ फेब्रुवारी-**

बालवयातील शालेय विद्यार्थ्यांना निसर्गाबद्दल ओढ निर्माण व्हावी व निसर्ग अभ्यासून निसर्गाच्या संवर्धनाचे धडे गिरवावे या हेतूने प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'शाळा थेट निसर्गात' हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती जेष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी प्रसार माध्यमांना दिली.

निसर्गात अचंबित करणारे अनेक विस्मयकारक घटना घडत असतात. शालेय विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी कुतूहल असते व त्यांच्यामध्ये अवलोकन व आकलनशक्ती विलक्षण असते. त्यामुळे या काळात जर विद्यार्थ्यांना निसर्गाविषयी माहिती दिली तर भविष्यात ते एक उत्तम निसर्गोपासक होऊन निसर्गाविषयी आस्था बाळगतील व भविष्यात निसर्ग संवर्धनाची कामं करतील अशी अपेक्षा आहे असे मत डॉ. कुंभार व्यक्त केले.

या उपक्रमात शाळेत जाऊन पक्ष्यांची माहिती देऊन मानवी वसाहतीत वावरणाऱ्या पक्ष्यांसाठी कृत्रिम घरटी तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाईल व शाळेजवळच्या एकदा पास्थळ, वनराई, माळरानावर विद्यार्थ्यांना नेऊन तिथे आढळणाऱ्या पक्ष्यांची निरीक्षण करण्यात येईल अशी माहिती डॉ. कुंभार यांनी दिली. सामान्यपणे ग्रामीण भागातील व वसतीशाळांमध्ये प्राधान्याने हा उपक्रम राबविण्यात येईल असे डॉ कुंभार यांनी सांगितले.

मार्च महिन्यापासून शाळा सकाळच्या वेळेत भरण्यात येतील. हा उपक्रम राबविण्यासाठी सकाळचा वेळ उत्तम असेल असे मत व्यक्त करत राजेंद्र काकडे (द. सोलापूर), सूर्यकांत बनकर (पंढरपूर), वैशाली कार्वेकर (उत्तर सोलापूर), कल्याणराव साळुंखे (करमाळा), राजू रायभान (मंगळवेढा), शिवानंद गोगाव (अक्कलकोट), सुहास ढेकणे (वैराग-बार्शी), राजेंद्र कुंभार (सांगोला) एकनाथ कदम व वीरेंद्र पत्की (माळशिरस), महेश कोठीवाले (मोहोळ) आदी शिक्षकांनी ते सेवा बजावत असलेल्या शाळेत हा उपक्रम. राबिविण्यासाठी उत्सुकता दाखवली.



### मोफत उपक्रम

सदर उपक्रम विनामोबदला राबवाणार असून कोणताही मानधन व प्रवास खर्च स्वीकारले जाणार नाही असे डॉ. कुंभार हे म्हणाले. तरी जिल्यातील ज्या शिक्षकांना हा उपक्रम राबविण्या इच्छा आहे अशांनी ९८२२१२४१९१ या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन डॉ. अरविंद कुंभार यांनी केले आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी; १९ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेअंतर्गत जिल्ह्यातील २ लाख ३७ हजार ५२१ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४७ कोटी ५० लक्ष रुपये जमा करण्यात आले आहे. ही योजना २०१९ पासून शेतकरी कुटुंबांना निश्चित उत्पन्न देण्यासाठी सुरू करण्यात आली असून, शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये (दर चार महिन्यांनी २ हजार रुपये) थेट बँक खात्यात (उ्दढ) मिळतात. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी बिहारमधील भागलपूर येथून पंतप्रधानांच्या हस्ते १९ व्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण करण्यात आले. जिल्ह्यातील कृषि विज्ञान केंद्र, तुळजापूर येथे जिल्हास्तरीय थेट प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास पुरस्कार प्राप्त प्रगतशील शेतकरी,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी खंडेराव सराफ, कृषि विज्ञान केंद्राचे समन्वयक सचिन सूर्यवंशी, उपविभागीय कृषि अधिकारी महादेव आसलकर, तालुका कृषि अधिकारी एस.पी. जाधव (धाराशिव), महेश देवकते (तुळजापूर) व कृषि विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. आधार लिंक,ई-केवायसी व लँड सिडिंग प्रक्रिया पूर्ण असलेल्या शेतकऱ्यांनाच हप्ता मिळाला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### मुंबई पोलीसात निवड; शेतकरी पुत्राचा सत्कार

**परंडा, दि.२६ फेब्रुवारी -**

परंडा तालुक्यातील भोत्रा ग्रामस्थच्या वतीने मुंबई पोलीसपदी निवड झालेले शेतकरी पुत्र प्रविण बाबुराव पवार भोत्रा व अभिषेक जाधव, विनायक नेटके, आब्बास अलजुफ्री, प्रज्ञा ढेरे व वडील बाबुराव पवार व आई शालन पवार व राहुल पवार यांचा भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रम प्रमुख पाहुणे परंडा नायब तहसिलदार माढेकर व महसूल मंडळ अधिकारी पवार, सागर कचे, प्रा. विकास काळे, प्रा. धनंजय आडगळे, मुख्याध्यापक प्रा. कालीदास चव्हाण, सुनिल पवार, राजकुमार देशमुख, अमोल गोडगे, अजिनाथ शेळके, अतुल गोफणे, अरुण गोफणे, शंकर पवार, यल्लाप्पा काळे, नेर्लेकर, मोहन डिकुळे, शामराव काळे, सुभाष जाधव, शिवदास काळे, सुनिल सल्ले, राहुल कोकाटे, कृष्णा घुले, विजयराज घुले, अरविंद गोडगे, आबासाहेब शेलार यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

### शेतकऱ्यांसाठी अर्थसहाय्य योजना; २८ पर्यंत मुदत

**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

खरीप २०२३ हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची प्रति हेक्टर (कमाल २ हेक्टरपर्यंत) अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.या योजनेसाठी पात्रतेसाठी निकष पुढीलप्रमाणे आहे.ज्यांनी ई-पिक पाहणी केलेली नाही, पण ७/१२ उताऱ्यावर पिकाची नोंद आहे. वनपट्टेधारक, वैयक्तिक व सामाईक खातेदार शेतकरी यांनी आपले नाव www.scagridbt.mahait.org पोर्टलवर किंवा संबंधित कृषि सहाय्यकांकडून तपासून घ्यावे. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी किंवा कृषि सहाय्यकांशी संपर्क साधावा, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धाराशिव यांनी कळविले आहे.




### महाशिवरात्रीनिमित्त भाविकांना फराळाचे वाटप

**तुळजापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

येथील रयत सेवाभावी संस्थेच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना उपवासा निमित्त फराळीचे वाटप करण्यात आले. यावेळी भाविक भक्तांसोबत शहरातील नागरिकांनी याचा लाभ घेतला. शिवसेना (शिंदे गट) ओबीसी विभागाचे तालुकाध्यक्ष देविदास राठोड, पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे, रयत सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष उमेश जाधव, उपाध्यक्षा भाग्यश्री जाधव, सचिव सचिन गायकवाड, रंजना मनोज जगताप, अंजू अमोल जगताप, रमेश जाधव, शंकर जाधव आदींची उपस्थिती होती.

### शिव-बसव-राणा जन्मोत्सव समिती अध्यक्षपदी पुदाले


**नळदुर्ग, दि.२६ फेब्रुवारी -**



नळदुर्ग येथे सालाबादाप्रमाणे याहीवर्षी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर महाराज व वीर महाराणा प्रतापसिंह महाराज यांची एकत्रित जयंती साजरी करण्यात आहे. यासाठी जन्मोत्सव समितीची नवीन कार्यकारीणीची निवड करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे. समितीच्या अध्यक्षपदी संतोष पुदाले तर उपाध्यक्ष म्हणुन प्रमोद कुलकर्णी, वैभव पाटील तसेच कोषाध्यक्ष शिवय्या स्वामी, नवल जाधव, सचिव शिवाजी गायकवाड, सहसचिव राहुल जाधव, सांस्कृतिक प्रमुख नेताजी महाबोले, अमित शेंडगे, प्रविण चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

### मातंग समाजासाठी थेट कर्ज योजना

**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**



मातंग समाज व त्याच्या १२ पोटजातींकरिता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना राबविण्यात येत आहे.मागील शासन निर्णयानुसार योजनेअंतर्गत २५ हजार रुपयेपर्यंत कर्ज मर्यादा होती,मात्र नवीन शासन निर्णयानुसार ती १ लक्ष रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. लाभार्थी हा मांग, मातंग, मादीग, मिनी मादीग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडो तसेच शासन निर्णय (दि.२२ मे २०१२) अंतर्गत मादगी व मादिगा या जातीच्या व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. ही योजना ग्रामीण भागातील गरजू लाभार्थ्यांसाठी मोठी संधी असून, इच्छुकांनी अर्ज निश्चित मुदतीत दाखल करावेत, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

# तुळजाभवानीच्या शिखराला मिळणार सोन्याची झळाळी

## सिमेंटचे नवे आवरण हटणार, शिखराचे प्राचीन रूप सहा महिन्यात पुन्हा साकारणार...मंदिर समितीचे विश्वस्त तथा आ.राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**

पुरातत्व खात्याने केलेल्या तुळजाभवानी मंदिराच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल प्राप्त झाला आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिराचे प्राचीन शिखर चुना आणि जुन्या विटांपासून तयार करण्यात आलेले आहे. त्यावर नंतरच्या काळात अडीच फूट जाडीचे नवे सिमेंट काँक्रीटचे व दगडांचे आवरण दिल्यामुळे वजन वाढले आहे. परिणामी मंदिराचे शिखर ज्या तुळईवर उभे आहे त्याच्या चार पैकी दोन दगडी शिळांना तडे गेले असल्याचा निष्कर्ष पुरातत्व विभागाने नमूद केला आहे. त्यामुळे संपूर्ण शिखर उकलून पुन्हा उभारले जाणार आहे. प्राचीन काळी ज्या प्रकारचे शिखर होते तसे मूळ शिखर साकारून त्याला सोन्याने मढविण्यात येणार असल्याची माहिती तुळजाभवानी मंदिर समितीचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

पुरातत्व खात्याने सादर केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानुसार तुळजाभवानी देवी मंदिराच्या मूळ इमारतीवर सिमेंट काँक्रीट आणि दगडांचा अतिरिक्त बोजा पडला आहे. चुना आणि विटांपासून साकारण्यात आलेल्या प्राचीन शिखरावर अडीच फूट जाडीचे नवे सिमेंट काँक्रीटचे आवरण आहे. त्यामुळे जगदंबेच्या गाभाऱ्यातील तुळईच्या चार पैकी २ दगडी शिळांना तडे गेले आहेत असे स्पष्ट निरीक्षण नोंदवण्यात आले असल्याने मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे सर्व काढून पुरातन पद्धतीने परंतु पुन्हा नव्याने करणे आवश्यक आहे हे पुरातत्व विभागाचेच मत असल्यामुळे याबाबत कोणीही गैरसमज निर्माण करू नयेत असे आवाहन आ.पाटील यांनी केले आहे.

पुरातत्व खात्याने संरचनात्मक लेखापरिक्षण अहवालच्या (स्ट्रक्चरल ऑडिट) आधारे जे निष्कर्ष काढले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत. यामध्ये त्यांनी मंदिर बांधकाम हे दगडामध्ये असले तरी मुळ मंदिराच्या बांधकामध्ये वारंवार बदल करण्यात आल्याचे दिसून येत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणात संरचनात्मक बदल झालेला आहे. सध्या मंदिरामध्ये शिखराचा अतिरिक्त भार।झाला।असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शिखराची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच तुळजाभवानी मातेचे मंदिर हे भूकंप क्षेत्र ४ च्या आणि किल्लारीच्या भूकंप प्लांट झोनच्या ८० कि.मी.च्या आत असल्याने मंदिराच्या गर्भगृहाचे व शिखराचे काम करणे आवश्यक असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. एकंदरीत संरचनात्मक लेखापरिक्षण अहवाल बघता मुख्य मंदिराच्या गर्भगृहाचे व शिखराचे काम करणे आवश्यक असून पुढील योग्य कार्यवाहीस्तव हा अहवाल सविनय सादर करीत असल्याचा सुस्पष्ट निष्कर्षही पुरातत्व खात्याने काढला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

मंदिर समितीच्या स्वउत्पन्नातुन मंदिर जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले आहे. गाभाऱ्यातील टाईल्स हटवून मूळ रूपातील दगडी गाभारा भविकांसमोर मांडण्यात येणार आहे. टाईल्स हटवण्याचे काम सुरू असताना गाभाऱ्यातील दगडी शिळांना तडे गेल्याचे निदर्शनास आले. या कामाच्या निमित्ताने ही बाब लक्षात आल्यामुळे भविष्यातील दुर्घटना टाळता आली आहे. त्यावर शास्त्रीय आणि अचूक पद्धतीने काम करण्यासाठी पुरातत्त्व खात्याच्या माध्यमातून स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची शिफारस केली होती. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनीही आपण केलेल्या शिफारशीनुसार तात्काळ कारवाईचे निर्देश पुरातत्व विभागाला दिले होते. तोच अहवाल आता प्राप्त झाला असून मंदिराच्या शिखरावर सिमेंट काँक्रीटच्या अतिरिक्त वजनामुळे गाभाऱ्यातील शिळांना तडे गेल्याचा निष्कर्ष अहवालामुळे स्पष्ट झाले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

श्री तुळजाभवानी मंदिर शेकडो वर्ष जुने आहे. मंदिरामध्ये असलेले दगडी खांब, भिंती, मंदिराचे छत तसेच मंदिराचे शिखर आणि कळस या सर्व भागांची तपासणी शास्त्रोक्त पद्धतीने भारतीय पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. पुढील अनेक पिढ्यांना या मंदिरामधील प्राचीनता, मूळ कलाकुसर पाहता यावी आणि मूळ रूपातील कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी आणि मंदिराचे समाधानकारक दर्शन मिळावे यासाठीच पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून श्री तुळजाभवानी मंदिराचे प्राचीन रूप जतन करण्याचा प्रयत्न आहे. मंदिराची मूळ रचना कशा पद्धतीची आहे ? याची वस्तुनिष्ठ माहिती पुरातत्व खात्याने सादर केलेल्या अहवालाच्या निमित्ताने समोर आली आहे. आता त्याचा आधार घेऊन श्री तुळजाभवानी मंदिराचे प्राचीन स्वरूप जपण्यासाठी सर्वसमावेशक काम सुरू करणे गरजेचे आहे. भविष्यकाळातही तुळजाभवानी देवीचे मंदिर चिरंतन राहावे यासाठी पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून श्री तुळजाभवानी मंदिराचे मूळ रूप जतन करण्याचा आपला प्रयत्न आहे. मंदिराच्या पावित्र्याला आणि मूळ पुरातन स्वरूपाला कोणताही धक्का न लावता हे काम केले जाणार असल्याचेही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.


तुळजाभवानी मातेचे शिखर सोन्याने मढविण्यात येणार आहे. सुवर्ण मंदिर, अक्षरधाम मंदिर, तिरुपती मंदिर, शिर्डीचे साई मंदिर आदी मंदिरांची शिखरे सोन्याने मढलेली आहेत. त्याच धरतीवर हा निर्णय घेण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक, स्थानिक व्यापारी आणि पुजारी बांधव आशा सर्वांचे सहकार्य महत्त्वाचे असणार आहे. याबाबत कोणाला काही सुचवावे वाटत असेल अथवा काही शंका असतील तर त्यांनी मंदिर समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे लिखित स्वरूपात आपले म्हणणे सादर करावे असे आवाहनही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

### सहा महिन्यांच्या आत शिखर पूर्ण होणार

साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण पीठ असलेल्या कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदिराचे शिखर सहा महिन्यांच्या आत पूर्ण होईल असा विश्वास पुरातत्व विभागाने व्यक्त केला आहे. सध्याच्या अहवालावरून मंदिराच्या भिंती काढण्याची आवश्यकता भासत नाही. मात्र काम करताना त्याकडे बारकाईने लक्ष ठेवले जाईल आणि आवश्यकता भासल्यासच भिंती काढल्या जातील असेही पुरातत्व विभागाने म्हटले असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

## मोबाईलच्या अतिवापराने तरुण वाचनापासून कोसो दूर : डॉ.दबडे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ फेब्रुवारी -**



कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे व काळाच्या ओघात दिवसेंदिवस साहित्य नष्ट होत आहे त्यामुळे तरुण पिढी वाचनापासुन दुर गेली असुन मोबाईलच्या आहारी गेली आहे, असे मत डॉ. तुळशिराम दबडे यांनी व्यक्त केले.


नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे आयोजित इंग्रजी विषयाच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद चे दि. २४ व २५ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अणदुर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ.अनिता मुदकन्ना यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय सावंत हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थित पाहुण्यांचा परिचय राष्ट्रीय परिषदेचे समन्वयक डॉ.टी.एल.दबडे यांनी करून दिला. या इंग्रजी विषयाच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये इंग्रजी विषयाच्या ९१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ.सुभाष राठोड कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील प्रा.आशिष हंगरगेकर, प्रा.दादासाहेब जाधव, प्रा.बाबा सूर्यवंशी, प्रा.गजानन चिंचडवड, प्रा.झरीना पठाण यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आशिष हंगरगेकर यांनी केले तर आभार प्रा दादासाहेब जाधव यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## हरभऱ्याची गंज अज्ञाताने पेटवली: शेतकऱ्याचे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२६ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील शेतकऱ्याच्या शेतातील सहा एकर वरील हरभऱ्याची गंज अज्ञात इसमाने पेटवून दिल्याने शेतकऱ्याचे ३ लाखाचे नुकसान झाल्याने अज्ञात इसमाविरूध्द ढोकी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तेर येथील शेतकरी चरणसिंग विजयसिंग राजपूत यांच्या गट नंबर ४१० मध्ये सहा एकर वरील हरभऱ्याची गंज लावली होती. ही गंज मंगळवारी (दि.२४) रात्री पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमाने पेटवून दिली. त्यामुळे शेतकऱ्याचे तीन लाख रूपयांचे नुकसान झाले. शेतकरी चरणसिंग राजपूत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास स.पो. नि.विलास हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार प्रदीप मुरळीकर करीत आहेत

## आर.पी.औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**



डॉ.वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुल, गडपाटी धाराशिव येथील आर. पी. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि धाराशिव जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्र तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिक्रिया दल यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत नैसर्गिक, रासायनिक, जैविक, किरणोत्सारी तसेच मानवनिर्मित आपत्तींसंदर्भात सखोल मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घेण्यात आली.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शेख गाझी यांनी औद्योगिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या विविध आपत्ती आणि त्यावरील उपाययोजनांबाबत विद्यार्थ्यांना संक्षिप्त माहिती दिली.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिक्रिया दलाचे प्रमुख अधिकारी पंकज चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाच्या महत्त्वपूर्ण तत्त्वांची सविस्तर माहिती दिली.

त्यांनी भोपाळ गॅस दुर्घटना आणि वैझाग येथे घडलेल्या वायू दुर्घटनेचे उदाहरण देत अशा आपत्ती कशा टाळता येऊ शकतात, यावर प्रकाश टाकला. तसेच, आपत्तीजनक परिस्थितीत वेळेप्रसंगी घेतली जाणारी त्वरित कृती, मनुष्यहानी टाळण्यासाठीच्या उपाययोजना आणि प्रत्यक्ष बचाव कार्याची प्रात्यक्षिके करून दाखवली.

विद्यार्थ्यांनी कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.राम लोमटे, प्रा.मुजकिर पठाण आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

## महाशिवरात्री : फळे आणि फराळाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

महाशिवरात्री निमित्त जिजामाता नगर परिसरातील नागरिकांना विनोद गंगणे यांच्या वतीने फळे आणि फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले. महाशिवरात्रीच्या उपवासनिमित्त नागरिकांना साबुदाणा, भगर, खरबूज, कलिंगड व रताळे असे फराळचे साहित्य वाटप केले.

यावेळी माजी नगरध्यक्ष सचिन रोचकरी, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य आनंद कंदले, विशाल छत्रे, लखन पेंदे, शांताराम पेंदे, संतोष इंगळे व सहकारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

स्वातंत्र्यवीर सावरकर विचार मंच यांच्यावतीने सावरकर चौकामध्ये पुण्यतिथी साजरी करण्यात आली. जेष्ठ पत्रकार अंबादास पोपळे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्प हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सावरकर विचारमंचचे सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी सावरकरांच्या प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी महेश कुलकर्णी, उमेश गवते, महेश गरड, सुहास साळुंके, बाळासाहेब शामराज, सचिन अमृतराव, शिवाजी डावकरे उपस्थित होते.

## राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ च्या कामांना गती : खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर

### महामार्गाच्या अपूर्ण कामांची आमदार प्रवीण स्वामी यांच्या नेतृत्वाखाली पाहणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**



सोलापूर-उमरगा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ च्या कामाला वारंवार सूचना देऊनही विलंब होत असल्याने गतवर्षी शिवसेना स्टाईल आंदोलन करत टोल बंद आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर काही प्रमाणात कामाला गती मिळाली, मात्र अद्याप काही भागांतील काम अपूर्ण असल्याने आमदार प्रवीण स्वामी यांच्या नेतृत्वाखाली महामार्गाची पाहणी करण्यात आली. या दौऱ्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक श्री.जवादे, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि संबंधित प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

अणदूर ते उमरगा दरम्यानच्या अपूर्ण कामांची पाहणीसह तपासणी करण्यात आली. अणदूर गावात नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाल्याने काही घरांमध्ये पाणी शिरत असल्याचे निदर्शनास आले. त्यावर तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. महामार्गावरील महत्त्वाच्या कामांच्या मुदती निश्चित करत पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात आला.

अणदूर उड्डाणपूल व नळदुर्ग बायपास -५ मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश, येणेगूर व मुरूम मोड उड्डाणपूल -३१ मार्चपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे निर्देश, आष्टा मोड उड्डाणपूल -३१ डिसेंबरपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना, भोसगा व जकेकुर येथे पादचारी पूल-उभारणीसाठी सुचना करण्यात आल्या आहेत.

डाळिंब, उमरगा चौरस्ता आणि तुरोरी येथे उड्डाणपूल पूर्ण झाल्याने वाहतूक सुरळीत झाली असून अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. आलियाबाद शिवारातील शेतकऱ्यांचा शेतरस्ता पूर्णतः बंद झाल्याने त्यासाठी पर्यायी मार्ग देण्याची मागणी करण्यात आली. तसेच, भू-संपादन व मावेजा प्रकरणे निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीचे आदेश देण्यात आले. हा पाहणी दौरा आणि सातत्याने करण्यात येणारा पाठपुरावा यामुळे महामार्गाच्या कामांना गती मिळाली असून, ठरवलेल्या मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लहुजी शक्ती सेना कार्यकारणी जाहीर

**उमरगा, दि.२६ फेब्रुवारी -**
मातंग समाज महाअधिवेशनासंदर्भात व लहुजी शक्ती सेना कार्यकारणी जाहीर करण्यात आले. यावेळी महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा मायाताई लोंढे, मराठवाडा उपाध्यक्ष राजाभाऊ शिंदे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सारिका कांबळे, जिल्हा संघटक भाग्यश्री सूर्यवंशी, उमरगा तालुका अध्यक्ष विजय तोरडकर, महिला तालुकाध्यक्षा अलकाताई कांबळे, तालुका कार्याध्यक्षा गिण्यानबाई कांबळे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. युवक तालुका अध्यक्षपदी विशाल गायकवाड, उपाध्यक्षपदी गजानन एडके, लोहारा तालुका संपर्कप्रमुख पदी अर्जुन थोरात, उमरगा शहराध्यक्षपदी विआदींचीके, सचिवपदी मंगेश सुरवसे, विद्यार्थी महिला आघाडी तालुका अध्यक्षपदी सुप्रिया शिंदे,उपाध्यक्ष निकिता चिमुकले, सचिव जोगेश्वरी शिंदे आदींची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजक लहुजी शक्ती सेना उमरगा तालुका अध्यक्ष विजय तोरडकर होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव सरवदे यांनी केले.



# निम्न तेरणा प्रकल्पाची उंची वाढवण्यासाठी करण्यात येणारे भूसंपादन होवू देणार नाही

**शेतकऱ्यांसोबत तीव्र विरोध करणार... सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांचा प्रसिद्धी पत्रकाद्वारे इशारा**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**
माकणी ता. लोहारा येथील निम्न तेरणा प्रकल्पाची उंची वाढविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत या संदर्भात मंत्रालय मुंबई येथे १२ फेब्रुवारी रोजी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीदरम्यान अतिरिक्त भूसंपादन न करता सुरुवातीला उंची वाढवण्या संदर्भात चाचपणी करण्यात आली आहे. निम्न तेरणा प्रकल्पात पाणी साठवण क्षमते पैकी जवळपास ३० टक्के गाळ साचला असल्याने प्रकल्पाची पाणी क्षमता कमी झाली आहे.

सदरील प्रकल्पाची पाणी क्षमता १३० दशलक्ष घनमीटर इतकी आहे. नाशिकच्या मेरी या संस्थेने केलेल्या गाळ सर्वेक्षणातून प्रकल्पात जवळपास ३० टक्के गाळ साठला असल्याचा अहवाल यापूर्वी दिला आहे.

निम्न तेरणा प्रकल्पाची निर्मिती सन १९८९ रोजी करण्यात आली. प्रकल्पाची निर्मिती करताना देखील धरणासाठी भूसंपादित करण्यात आलेली जमीन ही काळी असल्याने गाळ साठण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

मात्र तत्कालीन पाटबंधारे मंत्र्यांनी त्याला जुमानता धरणाची निर्मिती केली. काळी जमीन असल्यामुळे अल्पावधीतच धरणात ३० टक्के गाळसाठा झाला आहे त्याचा परिणाम पाणी क्षमतेवर झाला आहे.

धरणाची उंची वाढवायची म्हटलं तर जमीन संपादित करावी लागणार आहे कारण आत्ता धरण १००% पूर्ण भरले तरी संपादित न केलेल्या काही शेतकऱ्यांच्या जमिनीत पाणी येत असल्याच्या अनेक तक्रारी शेतकरी करत आहेत. जमीन संपादित न करता उंची वाढवली तर स्वाभाविकपणानं शेतकऱ्याच्या शेतात पाणी साठणार आहे. यापूर्वीच या धरणासाठी भातागळी, माकणी,कानेगाव, मसलगा, नागूर , कमालपूर, उजनी, मातोळा, वांगजी, लोहटा या परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या आहेत.



या भागातील शेतकऱ्याकडे आता अतिशय अल्प अशा जमिनी शिल्लक राहिलेल्या आहेत उंची वाढवायची ठरली तर त्याही जमिनी जातील अनेक शेतकऱ्यांना भूमिहीन व्हावे लागेल त्यामुळे उंची वाढविण्याला विरोध करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे जाहीर केली आहे.

या धरणातूनच औसा, निलंगा उमरगा या शहराला पाणीपुरवठा होतो तर लवकरच लोहारा शहराला पाणीपुरवठा केला जाणार आहे.

तसेच या परिसरातील जवळपास ६८ खेड्यांना विविध पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जातो मात्र एका सत्ताधारी आमदाराने बेलकुंड येथून उपसा सिंचन योजना राबवून धरणातील पाणी नेण्याचे नियोजन केले आहे. त्यासाठी उंची वाढवण्याचा घाट घातला जात आहे.उंची वाढवण्यासाठी जर भूसंपादन करण्यात येणार असेल तर त्याला या भागातील शेतकऱ्यांचा कडकडीत विरोध राहणार आहे. यापूर्वीही सन २०११ मध्ये निम्न तेरणा प्रकल्प माकणी धरणातून पाणी आरक्षण करून शिंदाळा टेंभी तालुका औसा येथील नियोजित भेल महाजनको या प्रकल्पासाठी पाणी आरक्षित करून वीस दशलक्ष घनमीटर पाणी नेण्याचा प्रयत्न केला होता मात्र सर्व पक्षांना सोबत घेऊन आंदोलन करून तो प्रयत्नही आपण हाणून पाडला आहे.

> लवकरच धरण उंची विरोधी कृती समितीची स्थापना करण्यात येणार असून. पुढील आठवड्यात शेतकऱ्यांना सोबत घेऊन एक शिष्टमंडळ नेऊन जलसंपदा मंत्र्यांची मंत्रालयामध्ये भेट घेऊन सर्व वस्तुस्थिती त्यांना अवगत करणार आहोत प्रक्रिया नाही थांबल्यास खूप मोठे आंदोलन उभे केले जाईल.
> **-अनिल जगताप, सामाजिक कार्यकर्ते**

## तेरणा पब्लिक स्कूलमध्ये महाशिवरात्रीनिमित्त कार्यक्रम



**तेरणा पब्लिक स्कूलमध्ये (सीबीएसई) वर्षभर राबविले जातात विविध उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**
शहरातील तेरणा पब्लिक स्कूलमध्ये (सीबीएसई) महाशिवरात्रीनिमित्त बुधवारी दि. २६ फेब्रुवारी रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे सचिव रत्नदीप वाकुरे व सुनिता वाकुरे या दांपत्याच्या हस्ते महादेवाच्या पिंडीचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी शंकर-पार्वतीची वेशभूषा करून पालखीची मिरवणूक काढली.



धाराशिव शहरातील तेरणा पब्लिक स्कूलमध्ये (सीबीएसई) वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. बुधवारी दि. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त शाळेत मातीपासून महादेवाची पिंड बणविण्यात आली होती. या महादेवाच्या पिंडीचे विधीवत पूजन संस्थेचे सचिव रत्नदीप वाकुरे व सुनिता वाकुरे या दांपत्याच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्राचार्य विलास मोरे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. प्रारंभी शाळेतील विद्यार्थ्यांनी पालखी मिरवणूक काढली. पालखीमध्ये शंकर-पार्वती यांची वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली. विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

तेरणा पब्लिक स्कूलच्या कॅम्पसमध्ये महादेवाचे भव्य मंदिर असून महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात भजनाचा कार्यक्रम झाला. महादेवाच्या दर्शनासाठी दिवसभर शाळेतील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.

## वागदरी शिवारात शॉर्टसर्किटमुळे आग; ६ शेतकऱ्यांचे शेतीचे मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२६ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतातील विद्यूत वाहक तारेवर झालेल्या शॉर्टसर्कीटमुळे ठिणगी पडून लाग लागली . या आगीचे रुपांतर वनव्यात झाले आणि बघता बघता आगीचा वनवा भडकून शेजारील सहा शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कसलीही जिवीतहानी झाली नाही. पण मोठया प्रमाणात वित्तहानी झाली आहे.

याबाबत वृत्त असे की दि.२४ फेब्रुवारी २२५ रोजी दुपारी १.३ वा. सुमारास वागदरी शिवारातील गट नंबर ६४ व ६५ मधील शेतकरी नागनाथ चव्हाण यांच्या शेतात विद्यूत वाहक तारेवर झालेल्या शॉटसर्किट होऊन ठिणगी पडली. शेतातील गवताला आग लागली. उन्हाच्या तीव्रतेमुळे व अधुन मधून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळकेमुळे त्या आगीचे वनव्यात रूपांतर झाले .आगीचा भडका उडाला व आग सर्वत्र पसरून जवळपास दहा एकर शेत जमिनीवरील जनावराचा चारा (गवत)जळून गेले तर गट नंबर ७५ मधिल गुरूनाथ सोमा वाघमारे यांच्या शेतात जनावरासाठी चारा म्हणून बनीम रचून ठेवलेला २५०० पेंढ्या ज्वारीचा कडबा, गोटयावरील ३० पत्रे, शेती उपयोगी अवजारे, ताडपत्री, वगेरे जळुन अंदाजे एक लाख पन्नास हजार रुपयाचे नुकसान झाले. याच गटातील राजकुमार सोमनाथ वाघमारे यांचा सोयाबीनचा दोन ट्रॉली चारा व एक सायकल असे अदाजे पंधरा हजार रुपये च नुकसान झाले. गट नंबर ७४ मधील कुंडलिक जगन्नाथ वाघमारे यांच्या शेतातील सोयाबीनचा चारा व शेती उपयोगी साहित्य तर याच गटातील बाबासाहेब कुंडलिक वाघमारे यांचे दहा पत्रे,१५०० ज्यारीच्या कडब्याच्या पेंढया, सोयाबिनचा दोन ट्रॉली चारा, शेती उपयोगी अवजारे जळून मोठे नुकसान झाले . गट नंबर ६७ मधील श्रीधर भाऊराव बिराजदार यांच्या शेतातील काढणीस आलेले तुरीचे पिक व शेती अवजारे जळून अंदाजे १५ रुपयाचे नुकसान झाले. गट नंबर ७३ मधील मोहन सोमवंशी, प्रमोद सामवंशी व नितीन सोमवंशी यांचा सोयाबिनचा चारा व शेती उपयोगी अवजारे जळून मोठे नुकसान झाले आहे. या घटनेचा ग्राम महसुल अधिकारी धनंजय मैंदर्गी यांनी पंचनामा केला.

## कळंबमध्ये अनैतिक देहव्यापारावर पोलिसांचा छापा

**महिलांची सुटका, तिघांवर गुन्हा दाखल... कळंब पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**
शहरातील हिमालय बार आणि लॉज येथे अनैतिक देह व्यापार सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर कळंब पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली असून, तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता करण्यात आली. आरोपींमध्ये विजय परशुराम कदम (वय ४७, रा. शिक्षक कॉलनी, कळंब), प्रशांत विठ्ठल काळे (वय ४४, रा. मंगरूळ, ता. कळंब), आणि सलाउद्दीन दगडू शेख (वय ३८, रा. चोंदे गल्ली, कळंब) यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या तिघांनी संगणमत करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चार महिलांना वाणिज्यिक हेतूने लॉजमध्ये ठेवले होते आणि त्यांना देहव्यापार करण्यास भाग पाडत होते.पोलिसांनी केलेल्या छाप्यात संबंधित महिलांची सुटका करण्यात आली. याप्रकरणी आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४४ सह अनैतिक मानवी वाहतूक आणि व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ च्या कलम ३, ४, ५ व ६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कळंब पोलीस करत आहेत.

या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून, अनैतिक देह व्यापार चालवणाऱ्या लॉज आणि बार चालकांविरोधात पोलिसांनी कठोर पावले उचलण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## विद्यार्थिनीचा राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्या हस्ते राज्यभावनात होणार सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ फेब्रुवारी -**
उमरगा तालुक्यातील श्री सिद्धेश्वर विद्यालयाचे एकूण बारा विद्यार्थिनी महाराष्ट्र राज्य स्काऊट आणि गाईड मुंबई यांच्यामार्फत राज्य पुरस्कार परीक्षा दि. १४ डिसेंबर ते १७ डिसेंबर विभागीय कार्यालय लातूर येथे आयोजित करण्यात आले होते. या परीक्षेत एकूण बारा विद्यार्थी सहभागी झाले असून, सर्व विद्यार्थी उच्चतम गुणसंपदात करुन उत्तीर्ण झाले आहेत. ग्रामीण भागातील मुलींच्या आर्थिक परिस्थितीमुळे सदर परीक्षेत बसणे शक्य नव्हते.

स्काऊट गाईड युनिफॉर्म विना परीक्षेला बसता येत नव्हते. स्काऊट गाईड विभाग प्रमुख मनोजकुमार गुरव यांच्या पुढाकारातून सौभाग्यवती पद्मजादेवी विठ्ठलराव बदोले त्यांच्या वाढदिवसानिमित्त आणि संस्थेचे माजी अध्यक्ष कै.गोपाळराव पाटील यांच्या स्मरणात त्यांच्या



चिरंजीव राजाराम गोपाळराव पाटील यांच्याकडून लोकवर्गणी मिळवून सदर विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्याचेच फलनिष्पत्ती म्हणून आज सर्व विद्यार्थी सदर परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत प्रणिती तोनशाळे, शशिकला माशाळे, ऋतुजा मांडवे, आफरीन सय्यद, कायनाथ जमादार, शर्वरी रुपनवरे, आकांक्षा यमगर, रागिनी लवटे, श्रुती भोसले, प्राजक्ता जाळे संजना कांबळे, क्रांती बजरंग पाटील, या सर्व विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत. सदर राज्य पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना भविष्यात रेल्वे नोकरीमध्ये पाच टक्के आरक्षण असून, एसएससी बोर्ड परीक्षेत एक टक्का अतिरिक्त गुण मिळणार आहेत. सदर सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव पटणे, सेक्रेटरी विठ्ठलराव बदोले, मुख्याध्यापक माशाळे, जिल्हा संघटक आयुक्त विक्रांत देशपांडे, स्काऊट गाईड विभाग प्रमुख मनोजकुमार गुरव, सोमनाथ चनपटणे, ज्योती आमले यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## विद्यार्थ्यांनीचा सन्मान

**जळकोट, दि.२६ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील शिव-बसव-राणा-काशिबा महाराज जन्मोत्सव समितीच्यावतीने शिवजयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शिवसप्ताहात सामान्य ज्ञान चाचणी स्पर्धेत शहापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. या सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांमध्ये नाविण्यपूर्ण उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान चाचणी स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती. गुणानूक्रमे पारितोषिक मिळवणा-या विद्यार्थिनीचें व मार्गदर्शक कोळी, शाळेतील सर्व शिक्षकांचे मुख्याध्यापकानी कौतुक करुन अभिनंदन केले आहे.

## मुंबई पोलीस निवड झाल्याबद्दल परंडा येथे सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२६ फेब्रुवारी -**
परंडा तालुक्यातील भोत्रा गावाचे शेतकरी पुत्र प्रविण बाबुराव पवार भोत्रा यांनी प्रतिकुल परस्थिती मध्ये जिद्द चिकाटी मेहनतीच्या जोरावर मुंबई पोलीस निवड फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्रात १५ वा क्रमांक पटकावत यश संपादन करून

आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले प्रविण पवार हा माढा तालुक्यातील केवड येथील आश्रम शाळेत ५ वी १२ वी शिक्षण पूर्ण करून नंतर बार्शी येथील शिवाजी महाविद्यालय मध्ये शिक्षण पूर्ण केले नंतर परंडा येथील क्रांती करीयर ॲकॅडमीचे संचालक प्रा. विकास काळे व फिजिकल



विभागाचे शिक्षक धनंजय आडगळे यांच्या माध्यमातून सराव अभ्यास तयारी करत पोलीस भरतीची तयारी केली विशेष म्हणजे मुंबई सारख्या शहरात वयाच्या २३ व्या वर्षी व पहिल्या च पोलीस भरती मध्ये शानदार कामगिरी करत यश संपादन केले. प्रविणचे विशेष कौतुक करीत

मुंबई पोलीस निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र ग्रामीण बॅंक शाखा परंडा व धाराशिव (उस्मानाबाद) जनता सहकारी बँक शाखा परंडाच्या वतीने प्रविण बाबुराव पवार भोत्रा यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी जनता बॅंक शाखा अधिकारी मुंडे व बॅंक कर्मचारी देशमाने, वाघमोडे, ॲडव्होकेट हरीचंद्र सुर्यवंशी व तसेच महाराष्ट्र ग्रामीण बॅंक शाखा अधिकारी शेळके व बॅंक अधिकारी मस्तुद व मजुर सहकारी संस्थेचे चेअरमन सुनिल भाऊ पवार भोत्रेकर) व शंकर पवार, बाबुराव पवार, सोपान पवार व दोन्ही बॅंकमधील कर्मचारी उपस्थित होते.

## तुळजाभवानीच्या गाभाऱ्यासंदर्भात काशी धर्मपीठचे प्रमुख पद्मश्री गणेश्वर शास्त्री द्रवीड यांची भेट

**तुळजापूर, दि.२६ फेब्रुवारी -**
श्री तुळजाभवानी मातेच्या गर्भगृह व मंदिर पाडण्यासंदर्भात काशी धर्मपीठाचे प्रमुख पद्मश्री गणेश्वर शास्त्री द्रवीड व छत्रपती संभाजीराजे यांची भोपे पुजारी मंडळांनी भेट घेऊन धार्मिक विधी व धर्मशास्त्रानुसार उपाययोजनेबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी भेटलेल्या भोपे पुजारी मंडळाच्या शिष्टमंडळात अध्यक्ष अमरराजे कदम, धिरज पाटील, विकास मलबा व विनोद सोंजी उपस्थित होते.

राज्यातील पुरातन संवर्धन विभागाला हाताशी धरून हवा तसा प्रायव्हेट कंपनीकडून अहवाल तयार करण्याचा हेतू काय असा प्रश्न भोपे पुजा-यांनी उपस्थित केला.लाखो देविभक्तांची श्रद्धा व भावनेशी मंदिर संस्थान खेळत आहे का? असा प्रश्न ही उपस्थित होत आहे. हे जुने मंदिर पाडून नवे मंदिर नेमके कुणाच्या सल्लूयाने होत आहे. प्रत्येक



जण एकमेकांवरती चालढकल करत असल्याचे दिसून येत आहे. भोपे पुजारी मंडळाची मंदिर विस्तारास विरोध नाही पण पुर्ण मंदिर नव्याने करण्यास विरोध असल्याचे दिसून येत आहे. देशभरातील धर्मशास्त्री तसेच पुरातन अभ्यासकांशी अजून चर्चा करूनच भोपे पुजारी मंडळ आपले लेखी म्हणणे देणार आहे, अशी माहिती भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमरराजे कदम यांनी दिली.

## महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ फेब्रुवारी -**
नळदुर्ग येथे दि. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील विविध महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पहाटेपासुनच गर्दी केली होती. सर्वच महादेव मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्याबरोबरच मंदिराना फुलांनी सजविण्यात आले होते. महाशिवरात्रीचा मुख्य कार्यक्रम श्रीक्षेत्र रामतीर्थ तेथे हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. याठिकाणी ५०१ भक्तांच्या हस्ते महादेवाला संगीतमय महारुद्राभिषेक करण्यात आला.

सालाबादाप्रमाणे याहीवर्षी नळदुर्ग शहरात महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील प्राचिन व वर्षातुन एकदाच महाशिवरात्रीरोजी उघडणाऱ्या पुराणिक यांच्या वाड्यातील व भुगर्भात असणाऱ्या श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याठिकाणी भविकांची दर्शनासाठी लांबच लांब रांग लागली होती. याठिकाणी भाविकांना नागनाथ कदम यांच्याकडुन दुध वाटप करण्यात आले.



व्यासनगर येथील उत्तरेश्वर महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याठिकाणी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. त्याचबरोबर मंदिराला फुलांनी सजविण्यात आले होते.फुलांची सजावट सुरेश गायकवाड यांच्याकडुन करण्यात आली होती तर भाळे कुटुंबियांकडुन विद्युत रोषणाई करण्यात आली होती त्याचबरोबर याठिकाणी राहुल बताले यांच्याकडुन भाविकांना दुधाचे वाटप करण्यात आले होते. तर हर्षल डुकरे व विशाल डुकरे यांच्याकडुन केळी व दीपक रगबले यांच्याकडुन पेरूचे वाटप करण्यात आले. शहरातील अष्टलिंगेश्वर महादेव मंदिरातही श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

महाशिवरात्रीचा मुख्य कार्यक्रम नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे महंत श्री विष्णु शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात व हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.

याठिकाणी मंदिर परीसरात श्री महादेवाची भव्य उत्सव मुर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली होती. या मुर्तीसमोर ५०१ भक्तांच्या हस्ते श्री महादेवावर संगीतमय रुद्राभिषेक करण्यात आला.श्रीक्षेत्र रामतीर्थ येथील महादेव मंदिरात श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. याठिकाणी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हा कायक्रम यशस्वी होण्यासाठी महंत श्री विष्णु शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली रामभक्तांनी परीश्रम घेतले.

# काळेश्वर देवस्थान विष्णुपूरी येथे महाशिवरात्री निमित्त भाविक भक्तांची दर्शनासाठी अलोट गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २६ फेब्रुवारी**

श्री काळेश्वर मंदिर देवस्थान विष्णुपुरी येथे महाशिवरात्री निमित्त पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी हर हर महादेव या जयघोषात दर्शनासाठी अलोट गर्दी झालेली पहावयास मिळाली. महाशिवरात्री निमित्त दि. २६ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टी आसल्याने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी ही दर्शनासाठी गर्दी केली होती.



श्री काळेश्वर मंदिर देवस्थान विष्णुपुरी येथे महाशिवरात्री निमित्त मध्ये रात्रीला श्री क्षेत्र काळेश्वर मंदिर देवस्थानचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर व ट्रस्टच्या वतीने महाभिषेक करण्यात आला.त्या नंतर सर्व भाविक भक्तांन दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. दि. २६ फेब्रुवारी रोजी पहाटे पासुनच काळेश्वर दर्शनासाठी मोठ्या रांगा लावून भावीकानी दर्शन घेतले तर यावेळी लवकर दर्शनासाठी मंदीर ट्रस्टीने विशेष पासची सोय करण्यात आली होती. तेव्हा पैसे भरून वृध्द व जेष्ठ नागरिक यांना या पासचा लाभ घेता आल्याने लवकर देवदर्शन झाले. विशेष पासच्या माध्यमातून देवस्थान ट्रस्टीला हजारो रूपयाचे उत्पन्न झाल्याचे दिसून येते. कोरोना काळापासुन श्री क्षेत्र काळेश्वर येथे दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यादरम्यान काळेश्वर दर्शनासाठी नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, जिल्हा परिषदेचे राजकुमार मुक्कावार, नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह राजकीय, सामाजिक नेते मंडळीनी महाशिवरात्री निमित्त दर्शन घेतले. महाशिवरात्री निमित्त धार्मिक सोळ्यात आलेल्या शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अकाश पाळणे, घसरगुंडी, पाण्यात बोटीतुन फिरण्याचा आनंद घेतला. तर भाविकांनी परीसरात होत आसलेल्या भजन व किर्तनाचा बोध घेतला. यावेळी विष्णुपुरी नगरीचे सरपंच संध्याताई हंबर्डे, उपसरपंच अर्चना हंबर्डे, शहाजी हंबर्डे, नर्सिंग हंबर्डे यांची उपस्थिती होती. यादरम्यान दर्शनासाठी भावीक भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून ट्रस्टचे सचिव शंकर हंबर्डे, कोषाध्यक्ष उत्तम हंबर्डे, मोहनराव हंबर्डे, रावसाहेब हंबर्डे, धारोजी हंबर्डे, गणेश धनमणे, बालाजी हंबर्डे यासह माजी सरपंच राजु हंबर्डे यांनी परीश्रम घेतले. दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते १० यावेळात शैलेश महाराज कामठेकर यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाचे आयोजन केले आहे. यावेळी धार्मिक सोळ्यात आडीअडचण येऊ नये यासाठी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी १५, कर्मचारी ७१ ट्राफीक शाखेचे अधिकारी ३ कर्मचारी ७ यासह एसआरपीएफचे जेवन व महीला पोलीस कर्मचारी यांचा ही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# पोलीस व महसुलची अवैध रेती उपसा विरोधात कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ फेब्रुवारी**

पोलीस व महुसल यांनी संयुक्त कारवाई करत रेती उपसासाठी वापरण्यात येणारे इंजीन व अन्य साहित्य असा एकूण २४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. हि कारवाई आज दि. २६ फेब्रुवारी रोजी करण्यात आली.

जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या फ्लश आउट ऑपरेशन अंतर्गत जिल्ह्यामध्ये वाळु माफिया विरूध्द कारवाई सुरू असून आज दि. २६ फेब्रुवारी रोजी नांदेड ग्रामीण व लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विष्णुपूरी, थुगाव, कल्लाळ या भागातील नदीपात्रातुन अवैध रेती उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारे ६ इंजीन व अन्य साहित्य असा एकुण २४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, स.पो.नि. पंढरी बोधनकर, पो.कॉ. घुरनर, सोनकांबळे, नायब तहसिलदार स्वप्नील दिघलवाड, काशीनाथ डांगे, मंडळ निरीक्षक कुणाल जगताप, राजेंद्र शिंदे, तलाठी संजय खेडकर, विजय रणवीरकर, माधव भिसे, उमाकांत भांगे, संताजी देवापुरकर, गिरी, मनोज सप्रे, विद्राळे, मनोज जाधव यांच्या पथकाने केली.

## संक्षिप्त वृत्त

### राम तरटे यांना संविधान जागर पुरस्कार

**नांदेड**-येथील पत्रकार तथा ग्रामीण कथाकार राम तरटे यांना संविधान जागर पुरस्कार जाहिर झाला आहे. येत्या ४ मार्च रोजी मान्यवरांच्या हस्ते नांदेड येथे त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. बुद्धीस्ट रिसर्च फाऊंडेशन नांदेडच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त नांदेड जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना संविधान जागर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गत दिड दशकापासून वृत्तपत्र क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल पत्रकार राम तरटे यांना संविधान जागर- २०२५ हा पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. कुसूम सभागृहात दि. ४ मार्च रोजी पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार असून मान्यवरांच्या हस्ते सत्कारमूर्तींना गौरविण्यात येणार आहे.



### रमेश गंगासागरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पूरस्कार

**भोकर**-संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची जयंती तेलंगानातील आदिलाबाद येथे २३ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.



जयंती मंडळाच्या वतीने तेलंगणा व महाराष्ट्र राज्यात सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या तेलंगानातील मान्यवरासह नांदेड जिल्ह्यातील पत्रकारांचा तेलंगणाचे माजी मंत्री जोगू रामन्नाजी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यात महाराष्ट्र मधून नांदेड येथील गुरु रविदास समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष चंद्रप्रकाश देगलूरकर, भोकर येथिल पत्रकार रमेश जी. गंगासागरे, सोनटक्के यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष मधु बावलकर तर प्रमुख अतिथी म्हणून तेलंगणाचे माजी मंत्री जोगू रामन्नाजी यांची उपस्थिती होती. गंगासागरे यांना पूरस्कार मिळाल्याबद्यल सर्व मित्रपरिवारांनी त्यांचे अभिनंदन केले.

### कौशल्याबाई अखबारवाले यांचे निधन

**नांदेड**-शहरातील अबचलनगर येथील ज्येष्ठ नागरिक कौशल्याबाई चरणसिंग अखबारवाले (वय ७५) यांचे हृदयविकारामुळे दि.२५ रोजी सायंकाळी ६ वा. निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दि.२६ रोजी नगिनाघाट स्मशनभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातू, पणतू असा परिवार आहे. स.राजासिंग अखबारवाले यांच्या त्या वहिनी होत.



### मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश

**नांदेड**-महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी दिले आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. मराठी भाषेचा गौरव दिन साजरा करताना मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व जतन व संवर्धन व्हावे हा उद्देश आहे. याची अंमलबजावणी संपूर्ण जिल्ह्यात विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून केली जाणार आहे. २७ फेब्रुवारी रोजी सर्व कार्यालयात मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात यावे. आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास व जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा, असेही निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

# व्यापाऱ्याला लुटणाऱ्यांना अटक ; १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ फेब्रुवारी**

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धनेगाव वळण रस्त्यावर मुंबई येथील व्यापाऱ्याला लुटल्याची घटना घडली होती. या घटनेतील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि.२५ फेब्रुवारी रोजी अर्धापूर वळण रस्त्यावर पकडले. त्यांच्याकडून एक चारचाकी वाहन व अन्य साहित्य असा एकूण १४ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ७ फेब्रुवारी रोजी धनेगाव वळण रस्त्यावर मुंबई येथील हार्दीककुमार मोदी यांची गाडी अडवूण गाडी व रक्कम लुटण्यात आली होती. या गुन्ह्यातील आरोपी नागपूर मार्गे नांदेडकडे रिनॉल्ट ट्रिबर कारने येत असल्याची माहिती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार व पथकाने या कारला दि.२५ फेब्रुवारी रोजी दुपारी दोनच्या सुमारास अर्धापूर वळण रस्त्यावर थांबविले. यावेळी कारमध्ये असलेल्या महंमद असगर हानिफ खान रा.कुर्ला मुंबई, मुस्तफा युनूस खान रा.शिवाजीनगर मुंबई, प्रज्वल लालजी भोसले रा.लोंढे ता.चाळीसगाव यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडे गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केल्यानंतर गुन्हा केल्याची कबुली त्यांनी दिली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांच्याकडून नगदी ९ लाख २० हजार रुपये व रेनॉल्ट कंपनीची पाच लाख किंमतीची कार असा एकूण १४ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या गुन्ह्याविषयी पोलिसांनी अधिक चौकशी केली असता या गुन्ह्यात राजकरण यादव उत्तरप्रदेश, बैलअण्णा रा.केरळ, प्रदीप पुरुषन इजवा रा.केरळ, फेरोजभाई रा.मुंबई, राजू उर्फ बचखंडा हे देखील सोबत असल्याचे त्यांनी सांगितले.

हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, पोलीस हवालदार मलदौडे, जिंकलवाड, पवार, डोंगरे, बडगू, कदम, धुमाळ, कदम, सोनसळे, देवकत्ते यांच्या पथकाने केली.

# महाशिवरात्रीचे औचित्य साधून शिव महारुद्राभिषेक

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. २६ फेब्रुवारी**

येथील नगरेश्वर मंदिरात शिवजयंती निमित्त महाशिवरात्रीचे औचित्य साधून सर्वच जातीच्या शिवभक्तांच्या हस्ते ८५ जोडप्यांच्या हस्ते सामूहिक शिव महारूद्राभिषेक करण्यात आले. सामाजिक समरसतेचे यंदाचे हे १८ वे वर्षे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या अठरा पगड मूठभर मावळ्यांच्या साक्षीने स्वराज्य स्थापन करण्यासाठी रायरेश्वराच्या शिव पिंडीवर आपली करंगळी कापून रक्ताभिषेक केला होता. तोच आदर्श समोर ठेऊन अठरा वर्षी पूर्वी सूनिल पा.जाधव यांनी सामाजिक समरसतेचा उपक्रम सुरू केले होते. नगरेश्वर महादेव मंदिरात शिवजयंती निमित्त महाशिवरात्री चे औचित्य साधून समाजातील अठरा पगड जातिच्या शिवभक्ताच्या हस्ते लॉटरी पध्दतीने पाच जोडपी हे मुख्य शिवपिंडीचे तर बाकीचे सभामंडपात बसून घरून आनलेल्या शिव पिंडीचे सामूहिक विधिवत मंत्रोपचारात महारूद्राभिषेक करण्यात आला. ऐका भक्तांच्या हस्ते छ.शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यात सर्वच जातीचे भक्त ऐकत्र मंदिरात बसले होते .बहुधा हा राज्यातील ऐकमेव सामाजिक समरसतेचा उपक्रम असेल.

प्रसिद्ध ह.भ.प. अनिरुद्ध महाराज जोशी यांनी संपूर्ण अभिषेकाचे पौरोहित्य केले याप्रसंगी तब्बल ८५ जोडप्यांनी उपस्थिती लावली. सामाजिक समरसतेचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिव अमरनाथ महाभिषेक समिती व छ.शिवाजी महाराज जयंती समीतीच्या सदस्यांनी परीश्रम घेतले.

# जनसामान्यांची कामे करण्यासाठी भाजपा कटिबद्ध : भाजपा संघटनमंत्री संजय कौडगे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ फेब्रुवारी**

भाजपा हा जनसामान्यांची कामे करणारा पक्ष आहे. भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता सर्वसामान्यांची कामे करत आलेला आहे व इथून पुढेही करणार, तरूणांना संधी देऊन हा देश भविष्यकाळामध्ये तरूणांच्या हाती देण्याचे भाजपाचे स्वप्न आहे, असे प्रतिपादन भाजपा संघटनमंत्री संजय कौडगे यांनी केले.

आजपर्यंत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेड जिल्ह्याचा विकास केला आहे व इथून पुढेदेखील पालकंत्र्यांमार्फत आम्ही विकास करत राहू. पालकमंत्री अतुल सावे यांच्या वाढदिवसानिमित्त शशीकांत क्षीरसागर यांनी सामाजिक जाणिवेतून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम भाजपा युवा मोर्चा महानगरचे शशीकांत क्षीरसागर यांनी आयोजित केला होता. त्यावेळी कौडगे व राजूरकर बोलत होते. यावेळी शिवसेनेचे डॉ. अंकुश देवसरकर, भाजपा प्रवक्ते संतोष पांडागळे, मा. नगरसेवक किशन कल्याणकर, मा. नगरसेवक दीपक पाटील, सूर्यकांत कदम, शिवाजी धर्माधिकारी, अरूण पोफळे, दिलीप सावंत, मुनवर शेख, शहाजी क्षीरसागर, शंतनु हाके, वैभव मठपती यांच्यासह जयभवानीनगर येथील नागरिक, तरूण मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.




**नांदेड- चोरी झालेले २४ लाख ८१ हजार ५०० रुपायांचे १५७ अॅन्ड्राईन मोबाईल पोलीसांनी हस्तगत केले असून जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते मुळ मालकांना वाटप करण्यात आले.**

# मनुस्मृती दहनामूळे लोकशाही स्वातंत्र्य आबाधित : जगदिश ओहोळ

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २६ फेब्रुवारी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चातुरवर्ण व्यवस्थेवर आधारित मनुस्मृती ग्रंथाचे दहन केल्यामुळे सर्वांना लोकशाही,स्वातंत्र्य मिळाले अन्यथा येथील बहुजन,दलित पिडीत अस्पृश्य समाज गुलामीतच अडकून राहिला असता असे प्रतिपादन जग बदलणारा बाप माणूस या पुस्तकाचे लेखक प्रसिद्ध व्याख्याते जगदिश ओहोळ यांनी केले.

दि.२३ फेब्रुवारी रोजी मोजे नागापूर ता.भोकर येथे तेरावी बौद्ध धम्म परिषद संपन्न झाली. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी भोकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बालाजी शानमवाड हे होते. प्रथम भगवान बुद्ध, संत गाडगेबाबा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. धम्म परिषदेचे स्वागताध्यक्ष एल. ए. हिरे यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पहाराने स्वागत केले.

यावेळी बोलताना जगदिश ओहोळ म्हणाले, पिढ्यान पिढ्यापासून अस्पृश्य समाजाला माणसा प्रमाणे जगता येत नव्हते मनुस्मृतीने घालून दिलेल्या व्यवस्थेमुळे नीच वागणूक मिळत असे याचे चटके जागतिक कीर्तीचे विद्वान असलेल्या डॉ. बाबासाहेबांनाही विद्यार्थी दसेपासून बसले! डॉ. आंबेडकरांनी विषमतावादी कायदा असलेली मनुसमृतीच शस्त्रबुद्धे नावाच्या ब्राह्मणाच्या हातून महाड येथे जाळली तेंव्हापासून लोकशाहीचा उदय झाला त्याकाळी कसल्याही सोयी सुविधा नसताना २२वर्षाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षणासाठी बाहेर देशात लंडनला जातात कोलंबिया विद्यापीठात जाऊन आठ वर्षाचा शिक्षणाचा कोर्स तीन वर्षात पूर्ण केल्यानंतर पुन्हा मायदेशी येऊन आपल्या देशातील जातीय विषमता नष्ट करण्यासाठी अनेक वर्षे संघर्ष करतात. अखेर विषमतेवर आधारलेला धर्म झुगारून मानवतेचा संदेश देणारा बौद्ध धम्म त्यांनी स्वीकारला बाबासाहेबांनी लिहिलेले भारताचे संविधान समता, स्वातंत्र्य बंधुत्व लोकशाहीवर आधारित आहे.असे सांगून ओहोळ म्हणाले छत्रपती संभाजी राजाची हत्या मनुस्मृती प्रमाणे करण्यात आली संभाजी राजे बुद्ध विचाराचे होते म्हणून त्यांनी बुद्धभूषण ग्रंथ लिहिला महाराजांच्या हत्येनंतर शिवशाही संपून पेशवाई अस्तित्वात आली समाजा समाजात वीष पेरणारे विचार तमाम ओबीसी बहुजनांसाठीच नव्हे तर सर्व लोकांसाठी घातक आहेत हे घातक विचार गाडून टाकण्याचे काम डॉ.आंबेडकरांनी केले अन्यथा तुम्हा आम्हा सर्वांना गुलामीचे जीवन जगावे लागले असते असे सांगून ओहोळ म्हणाले. गुलाम वंचित घटकांना नरकातून बाहेर काढण्यासाठी बाबासाहेबांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला बुद्ध हा कुणाचा अवतार नाही विचार आहे. संत गाडगेबाबा रूढी परंपरा, अंधश्रद्धा, विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधात होते. जग बदलणाऱ्या बाप माणसाचे वर्णन अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून केले. बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराचे विचारच समाजाला दिशा देणारे आहेत. त्या विचाराचा जागर धम्म परिषदेतून झाला पाहिजे असेही ओहोळ म्हणाले.

आयोजक दत्ता व्यवाहरे यांनी धम्म परिषद घेण्यामागची भुमिका आपल्या प्रास्ताविकातून विषद केली. यावेळी माजी सभापती गोविंद बाबा गौड, प्रा. आम्रपाली व्यवहारे, स्वागताध्यक्ष एल.ए.हिरे यांनीही विचार मांडले अध्यक्षीय समारोप बालाजी शानमवाड यांनी केला. व्यासपीठावर मा.पो.पा.गंगाधर शानमवाड, पत्रकार बि.एस.सरोदे, बौद्ध महासभेचे अध्यक्ष सुरेश जोंधळे, सचिव उत्तम एडके, दत्ता डोंगरे, डी.जे.सोनकांबळे, शाहिर बाबुराव गाडेकर, गोविंद कसबे, संजय सोनकांबळे, सुजाता पाटील आदीसह उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.मनोज गीमेकर यांनी केले तर आभार अविनाश कसबे यांनी मानले. सभेनंतर सुप्रसिद्ध गायिका निशा धोंगडे चंद्रपूर आणि प्रसिद्ध गायक रविराज भद्रे यांच्या बुद्ध भीम गीताचा बहारदार कार्यक्रम झाला.

# शेतकऱ्यांनी तातडीने ग्रीस्टॅक योजनेत फार्मर आयडी तयार करून घ्यावी : तहसीलदार यादव

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २६ फेब्रुवारी**

भारतीय शेतीक्षेत्रात एक महत्त्वपूर्ण क्रांती घडत आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी ग्रीस्टॅक योजने अंतर्गत 'फार्मर आयडी' अर्थात 'शेतकरी ओळखपत्र' या डिजिटल ओळखपत्राची योजना आणली आहे. जी आधारकार्डप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याला एक विशिष्ट ओळख देणार आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत देशभरातील शेतकऱ्यांना ३ टप्प्यांमध्ये डिजिटल ओळखपत्र वितरित करण्याचे नियोजन आहे. केंद्र व राज्याच्या कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी 'फार्मर आयडी' आता बंधनकारक करण्यात आला आहे. माहर तालक्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असला तरी अनेक शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही. त्यामुळे स्वतः चा ओळख क्रमांक तयार होण्याकरिता नोंदणी करण्यासाठी २८ फेब्रुवारी पर्यंत सर्व शेतकऱ्यांनी आधार क्रमांकाप्रमाणेच स्वतःचा 'शेतकरी ओळख क्रमांक' काढून घ्यावा, तसेच ई-पिक पाहणी अंतर्गत प्रलंबित शेतकऱ्यांनी आपली ई-पिक पाहणी नोंदणी पूर्ण करून घ्यावी! असे आवाहन महसूल विभागाच्यावतीने तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.



फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळखपत्र शेतकऱ्यांच्या अडचणींवर ठरणार 'रामबाण' उपाय ठरणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांना हे मोठे फायदे मिळणार आहेत. फार्मर आयडी निर्माण झाल्यानंतर शेतकऱ्यांना आधुनिक कृषी क्रांतीचे शिलेदार करण्याचे शासनाचे ध्येय आहे. त्यामुळे सध्या 'ग्रीस्टॅक' संकल्पना वेगाने पुढे नेली जात आहे. या प्रकल्पात मुख्यत्वे ३ पायाभूत माहिती संच निर्माण केले जात आहेत. यात शेतकऱ्याचा माहिती संच व हंगामी पिकांचा माहिती संचाचा समावेश आहे. ऍग्रीस्टॅक योजनेसाठी दि.२८ रोजी सिंदखेड, ०३ मार्च रोजी माहूर, ०४ रोजी वाई बाजार तसेच ०५ मार्च रोजी वानोळा येथे कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रीस्टॅक योजने अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक नोंदणी, नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे सुरू आहे. प्रत्येक शेतकऱ्यास ग्रीस्टॅक फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक काढणे अनिवार्य आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांना पी. एम. किसान योजना, पीक विमा, नैसर्गीक आपत्ती अनुदान, पिक कर्ज व इतर शासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना कुठल्याही शासकीस योजनांचा लाभ मिळणार नाही. शेतकरी ओळख क्रमांक काढण्यासाठी आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक तसेच शेतीचा गट क्रमांक माहीत असणे आवश्यक आहे. आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र, महा ई-सेवा केंद्र येथे संपर्क करून आपली नोंदणी शेतकऱ्यांना स्वतः हजर राहून करावी लागणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सर्व कामे बाजूला ठेवून ऑनलाईन नोंदणीच्या ठिकाणी वरील कागदपत्रे घेऊन स्वतः ई-पीक पाहणी तसेच ऍग्री स्टॅक आयडी योजनेची नोंदणी करून घ्यावी! असे आवाहन माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत खेळाडूंनी घेतली प्रियंका इंगळेची भेट

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २६ फेब्रुवारी**

नांदेड येथील राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा गुरु गोविंदसिंगजी स्टेडीयमवर स्पर्धा संपन्न झाल्या. या कालावधीमध्ये पारडी येथील चुमुकल्या खेळाडुनी खो - खो विश्व विजेता इंडिया टीमची कर्णधार प्रियंका इंगळे यांची भेट घेतली.



१४ वर्षाखालील खेळाडू खो-खो मुलींच्या संघा मार्फत भारतीय कर्णधार प्रियंका इंगळे यांचे भव्य स्वागत करण्यात आले. हि भेट घडून आणण्यासाठी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, नायगाव तहसीलदार गायकवाडबाई, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर यांचे सहकार्य लाभले. खो-खो मूलीच्या संघात कर्णधार आरती पवार, शुभश्री पवार, वेदिका मोरवले, संगीता मटके, प्राची डिकळे, राधिका मोरवले, भगवती कदम, रागिणी डिकळे, अक्षरा पांचाळ, दिव्या गायकवाड, आरती पवार, तन्वी क्षीरसागर, लक्ष्मी डिकळे व क्रिडा संघाचे मार्गदर्शक मुख्याध्यापक माधव किसवे यावेळी उपस्थित होते.या खेळाडु विद्यार्थ्यांचे नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे बाई, गटशिक्षणाधिकारी सतिश व्यवहारे. शिक्षण विस्तार अधिकारी बी.जी.फसमले, केंद्रप्रमुख अविनाश कावलगावकर, डि.आर. शिंदे, बापूराव राठोड, जे.ए कदम, इंगोले एस .एस. मरखेलकर रमेश, देशमुख जी. एल . कदम, आर. जी .फारुख शेख, बालाघाटे डी.पी., शा. व्य. समितीचे अध्यक्ष विठ्ठल डिकळे, गोविंद डिकळे, सचिन गायकवाड, शरद पवार, व्यंकट डिकळे, बळीराम पवार, संभाजी पवार, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष शिवराज पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतक केले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दयानंद विज्ञानमध्ये होणार गुरुजनांचा कृतज्ञता सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** येथील दयानंद शिक्षण संस्थेची स्थापना १९६१ साली झाली.सुरुवातीच्या काळात दयानंद कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे एकत्रितरित्या कार्यरत होते.१९६७ सालापासून दयानंद विज्ञान महाविद्यालय स्वतंत्र महाविद्यालय म्हणून कार्यरत झाले.

अगदी त्या काळापासूनच गुणवत्तेचा बालेकिल्ला व यशाची उज्वल परंपरा असलेल्या या दयानंद विज्ञान महाविद्यालयात सेवा दिलेल्या सेवानिवृत्त गुरुजनांचा हृदयस्पर्शी कृतज्ञता सोहळा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे,दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांच्या उपस्थितीत दि.०२ मार्च २०२५,वार रविवार रोजी दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये संपन्न होणार आहे.

दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या हृदयस्पर्शी कृतज्ञता सोहळ्याचे नियोजन करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.यामध्ये प्रामुख्याने सतीश नरहरे,सुपर्ण जगताप, जलिल सर, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, डॉ.युवराज सारणीकर, प्रा. बळवंत सूर्यवंशी, अब्दुल पठाण, श्रीमंत कावळे, अनंत कासारखेडकर, सुधाकर जोशी यासह अनेकजण स्थानिक पातळीवर नियोजन करत आहेत. महाराष्ट्रात वेगवेगळ्या शहरात मोठ्या पदावर काम करणारे दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी या कृतज्ञता सोहळ्यात सहभागी होणार आहेत व वेगवेगळ्या समित्याचीही जबाबदारी ते समर्थपणे सांभाळत आहेत. सर्व माजी विद्यार्थ्यांनी या कृतज्ञता सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## श्री भगवान गौरीशंकर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त महाअभिषेक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** शहरातील मार्केट यार्ड परिसरामध्ये श्री भगवान गौरीशंकर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त लातूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांच्या शुभहस्ते सकाळी ८.०० वा महाअभिषेक व महाआरती करण्यात आली.

यावेळी जेएसपीएमचे समन्वयक संचालक व श्री भगवान गौरीशंकर मंदिराचे सदस्य निळकंठराव पवार, नंदकिशोर सोनी, कोषाध्यक्ष सुभाषअप्पा सुलगुडले, सदस्य नागनाथ मामडगे, रामभाऊ माळगे, डॉ.आत्माराम झिरमिरे, धोंडीराम सोमवंशी, सुनिल शर्मा, राजकुमार शेटे, पुजारी गोटू महाराज, सोमनाथ स्वामी, गणेश शेटे, शिवम शेटे, साई ईटकर, प्रेम कुरसुळे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच श्री भगवान गौरीशंकर ट्रस्टचे पदाधिकारी, संचालक, व्यवस्थापकीय समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी, सभासद, भगवान गौरीशंकराचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भांडणाची कुरापत काढून मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** भांडणाची कुरापत काढून मारहाण झाल्याची घटना अंबाजोगाई रोड लातूर येथे घडली. लाथाबुक्क्याने तसेच जमिनीवर पडलेल्या दगडाने डोक्यात मारून जखमी केले. फिर्यादी व त्यांच्या चुलत्याला जिवे मारण्याची धमकी दिली, असे सलमान शेख यांनी विवेकानंद चौक पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार अस्लम शेख (रा. पठाण नगर, अंबाजोगाई रोड, लातूर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद आहे.

## रहदारीला अडथळा; चालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** सारोळा चौक येथे सार्वजनिक रस्त्यावर रहदारीला अडथळा होईल, अशा स्थितीत वाहन उभे केल्याची घटना घडली. रस्त्याच्या मधोमध स्वतःच्या जीविताला व इतरांना धोका होईल, अशा स्थितीत वाहन उभे केले. याबाबत पोना. रविंद्र कांबळे यांनी विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात एमएच २४ एटी १६४८ या क्रमांकाच्या ऑटो चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पो.हे.कॉ साळुंके करीत आहेत.

## रमजानच्या उपवास वेळापत्रकाचे अनावरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम समाज बांधत रोजे (उपवास) करतात. यासाठी लातूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सचिव इब्राहिम सय्यद यांच्या पुढाकारातून तयार करण्यात आलेल्या उपवासाच्या वेळापत्रकाचे अनावरण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते तसेच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार विक्रम काळे यांच्या उपस्थितीत मुंबई येथे करण्यात आले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रदेश सचिव इब्राहिम सय्यद यांच्या रमजाननिमित्त उपक्रमाचे, सामाजिक कार्याबद्दल कौतुक केले. यावेळी आ. इद्रीस नायकवाडी, शिवाजीराव गर्जे, ताज शेख, अय्याजभाई शेख, उमर फारुख सय्यद, जावेद बागवान, मणियार हुसेन, शेख साबेर उपस्थित होते.

## ‘दयानंद’मध्ये रक्तदान,जनजागृती आणि आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून ‘रक्तदान,नेत्रदान जनजागृती आणि आरोग्य तपासणी शिबिरा ’ चे आयोजन करण्यात आलेले होते.

सदरील शिबिरात आरोग्य तपासणी करताना हिमोग्लोबिन,कोलेस्टेरॉल, शुगर, व्हिटामिन, रक्तदाब इत्यादी तपासण्या करण्यात आल्या.तसेच एकूण १९ जणांनी रक्तदान केले आणि एकूण ४५ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

# ‘हर हर महादेव’ च्या गजरात ग्रामदैवत श्री. सिद्धेश्वर यात्रेस प्रारंभ

## दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रेस अभुतपूर्व उत्साहात प्रारंभ झाला. मध्यरात्री गवळी समाजाचा दुग्धाभिषेक झाल्यानंतर हजारोंच्या संख्येने रांगा लावलेल्या भक्तांनी हर हर महादेव चा गजर करत श्री सिद्धेश्वरांचे दर्शन घेतले. सकाळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांची यात्रा संपूर्ण मराठवाड्यासह सीमावर्ती भागात प्रसिद्ध आहे. २१ दिवस चालणाऱ्या या महोत्सवास मंगळवार व बुधवारच्या मध्यरात्री गवळी समाजाच्या दुर्गाभिषेकाने प्रारंभ झाला. परंपरेप्रमाणे गवळी समाजाने वाजत -गाजत मिरवणुकीने येत श्री सिद्धेश्वरांना दुधाचा अभिषेक केला. यावेळी माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वरांची महापूजा आणि आरती करण्यात आली. यावेळी देवस्थानच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्यासह मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर देवस्थानच्या समोरील भागात ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे -विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे,ज्येष्ठ विश्वस्त विक्रमतात्या गोजमगुंडे,अशोक भोसले, श्रीनिवास लाहोटी, नरेश पंड्या, बाबासाहेब कोरे,व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे यांच्यासह विश्वस्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मध्यरात्रीपासूनच शहरासह ग्रामीण भागातून आलेल्या हजारो भाविकांनी देवस्थान परिसरात दर्शनासाठी गर्दी केली होती. हर हर महादेवचा जयघोष करत भक्त रांगेत थांबले होते. गवळी समाजाच्या दुधाभिषेकानंतर दर्शनास सुरुवात झाली.

महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र रांगांची व्यवस्था देवस्थानच्या वतीने करण्यात आली आहे.भक्तांना दर्शन सुलभ व्हावे याकरिता प्रशासक व विश्वस्त मंडळाने आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत.

### रक्तदान शिबिरास प्रतिसाद...

यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने श्री सिद्धेश्वर देवस्थान आणि भालचंद्र रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.विशेष म्हणजे रक्तदात्याला श्री सिद्धेश्वरांचे थेट दर्शन देण्याची घोषणा देवस्थानच्या वतीने करण्यात आली होती.या शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

### चोख बंदोबस्त..

महाशिवरात्री यात्रेनिमित्त दर्शनासाठी व यात्रेचा आनंद घेण्यासाठी होणारी गर्दी लक्षात घेता पोलीस प्रशासनाच्या वतीने देवास्थान परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. खबरदारीच्या उपाययोजना प्रशासनाकडून राबवल्या जात आहेत. पोलीस प्रशासनाला देवस्थानच्या स्वयंसेवकांचेही सहकार्य लाभत असल्यामुळे दिवसभर हजारो भाविकांना सुलभपणे दर्शन घेता आले.



## दारातील लाकूड सरकावले; पती-पत्नीला केली मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** तुम्ही आमच्या घरासमोर दारात ठेवलेले लाकूड का सरकावले म्हणून भांडणाची कुरापत काढून पती-पत्नीला मारहाण केल्याची घटना लक्ष्मी नगर पाखरसांगवी शिवरस्ता येथे घडली. याबाबत तिघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी बसवराज पुरुषोत्तम चिंचोलकर यांना व त्यांच्या पत्नीला, तुम्ही आमच्या घरासमोर ठेवलेले लाकूड का सरकावले म्हणून आरोपींनी भांडणाची कुरापत काढली. शिविगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

हातातील काठीने व दगडाने फिर्यादीच्या डाव्या पायाच्या मांडीवर मारून जखमी केले. तसेच फिर्यादीचा मुलगा हा भांडण सोडविण्यासाठी आला असता त्यालापण काठीने व दगडाने मारून जखमी केले. मुलाच्या गळ्याला नखाने वरखडून जखमी केले. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली, असे बसवराज चिंचोलकर यांनी एमआयडीसी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार धोंडिराम पांढरे व अन्य दोघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार जगताप करीत आहेत.

## रोजगार द्या अन्यथा मनसे स्टाइलने होणार आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** लातूर जिल्ह्यातील सर्व सूक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल औद्योगिक उपक्रमांमध्ये किमान ८० % स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्याने घेण्याबाबत मनसे सरचिटणीस तथा मनसे शेतकरी सेना अध्यक्ष संतोष नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी लातूर यांना निवेदन देण्यात आले.



औद्योगिक विकासाच्या लाभांमध्ये स्थानिक जनतेला योग्य वाटा मिळावा या उद्देशाने राज्यातील सर्व औद्योगिक घटकांमध्ये पर्यवेक्षकीय श्रेणीत किमान ५०% व पर्यवेक्षकीयसहित इतरश्रेणीत किमान ८०% स्थानिक उमेदवारांना नोकरीमध्ये प्राधान्याने घेण्यात यावे तसेच नोकर भरती करणारा अधिकारी मराठी जाणणारा असावा असा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा व कामगार विभागाकडून १७ नोव्हेंबर २००८ रोजी घेण्यात आला आहे परंतु लातूर जिल्ह्यातील उद्योजक हे संबंधित अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करून या शासन निर्णयाला केराची टोपली दाखवत आहेत त्यामुळे येथील उद्योगांमध्ये स्थानिक उमेदवारांना नोकरीमध्ये २० टक्के सुद्धा जागा मिळायला तयार नाही हे वास्तव आहे.

शासनाच्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी व सदर धोरणाचा नियमित आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे या समितीचे अध्यक्ष हे जिल्हाधिकारी असतात तर सदस्य सचिव महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र हे असतात तर सदस्य म्हणून सहाय्यक कामगार आयुक्त,जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,सहाय्यक संचालक जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,विभागीय अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांचे दोन प्रतिनिधी हे असतात.

निवेदन देताना यावेळी मनसे शेतकरी सेना राज्य उपाध्यक्ष भागवत शिंदे,मनसे शेतकरी सेना राज्य सचिव भागवत कांदे,विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष किरण चव्हाण,मनसे शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष पांडुरंग कदम,मनसे कामगार सेना जिल्हाध्यक्ष अंकुश शिंदे,रेणापूर तालुका सचिव इम्रान मणियार,नारायण पुरी यांच्यासह मनसेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात जीवनरेखा कॉल सेंटर

## गरोदर मातांना मिळणार वैद्यकीय सेवा अन् समुपदेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** मुख्यमंत्र्यांच्या शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद सीईओंच्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाद्वारे सुकर जीवनमान या संकल्पनेतून जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात जीवनरेखा (लाईफलाईन) कॉल सेंटरची स्थापना करण्यात आली. या कॉल सेंटरद्वारे जिल्ह्यातील गरोदर मातांना वैद्यकीय सेवा व समुपदेशन केले जात आहे.

गरोदर मातांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचलित कामकाजाच्या पद्धतीचे पुनर्विलोकन करून प्रशासकीय कार्यपद्धतीत सेवा सुलभ प्रकारे देणे. गरोदर मातांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे, याकरिता सातत्याने प्रयत्न केला जाणार आहे. अहमदपूर व चाकूर तालुक्यांतील अतिजोखमीच्या गरोदर मातांना संपर्क करून त्यांना योग्य वैद्यकीय समुपदेशन व वैद्यकीय सेवा मिळवून देण्याकरिता सक्षम यंत्रणा सज्ज ठेवली आहे. जीवनरेखा कॉल सेंटरमधून गरोदर मातांना संपर्क करून त्यांना आरोग्यविषयक समुपदेशन, वैद्यकीय सेवा, तसेच वैद्यकीय अधिकारी, ए. एन. एम. व आशा कार्यकर्ती यांच्यात समन्वय अधिक बळकट करून आरोग्यविषयक व प्रसूती व्यवस्थापनासंदर्भातील नियोजन सल्ला व आरसीएच पोर्टलमध्ये माहिती अद्ययावत करण्याकरिता कॉल सेंटरमधून लाभार्थ्यांना व आरोग्य कर्मचाऱ्यांना संपर्क साधला जातो. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, चाकूर तालुक्यांतील किमान २५ गरोदर मातांना संपर्क करून त्यांना काय हवे, काय नाही, हे पाहण्यासाठी १२ डॉक्टर व कर्मचाऱ्यांची नियुक्त केली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयातील कॉल सेंटरमुळे गरोदर मातांना मोठा आधार मिळाला आहे.

### कॉल सेंटर काय करणार !

जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयातील जीवनरेखा कॉल सेंटरमध्ये सकाळी साडेदहा ते दुपारी दोन या वेळेत उपस्थित डॉक्टर, कर्मचाऱ्यांनी अतिजोखमीच्या गरोदर मातांना त्यांच्या दूरध्वनीवर संपर्क साधून त्यांच्या गरोदरपणांचा व मातांचा आरोग्य विषयक पूर्व इतिहास, त्यांची तपासणी, प्रयोगशाळा तपासण्या, सोनोग्राफी, आवश्यकतेप्रमाणे नियमित औषधोपचार, गरोदरपणाची सद्यःस्थितीबाबत माहिती, गरजेनुसार जवळच्या आरोग्य संस्थांना संपर्क साधण्यास सांगणे. एका दिवसात किमान २५ मातांचे समुपदेशन केले जाते. प्रत्येक अतिजोखमीच्या मातांना प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक व आशा कार्यकर्तीमध्ये समन्वय साधून सेवा उपलब्ध करून दिली जाते. अतिजोखमीच्या मातांची सुरक्षित प्रसूती होऊन माता व बाळ सुरक्षित राहतील, याची सर्व संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांनी काळजी घ्यावी, अशा सूचना केल्या जातात.

## मनपातील एलबीटी विभाग बंद : मागणीला यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** राज्यातील सर्व महानगरपालिकांना ३० एप्रिलपर्यंत एलबीटी विभाग बंद करण्याचे आदेश शासनाने काढले आहेत. सरकारने २०१७ पासून एलबीटी कायदा रद्द केला. एलबीटी कराच्या नावाखाली स्थानिक प्रशासनाकडून व्यापाऱ्यांना त्रास दिला जात होता.

या संदर्भात मराठवाडा व्यापारी संघाने एलबीटी रद्द करावी, अशी मागणी केली होती. राज्य सरकारने तब्बल ८ वर्षानंतर हा विभाग बंद करण्याचा आदेश दिल्याने मुख्यमंत्री व सर्व मंत्रिमंडळाचे व्यापारी महासंघाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

व्यापारी संघटनांनी एलबीटीच्या विरोधात आवाज उठवल्याने सरकारने हा निर्णय घेतला. मराठवाडा व्यापारी महासंघ कायम एलबीटीच्या विरोधात होता. यापूर्वी एलबीटीच्या नावाखाली स्थानिक प्रशासनाकडून व्यापाऱ्यांना त्रास दिला जात असल्याचे निवेदन मराठवाडा व्यापारी महासंघाने वेळोवेळी सरकारकडे दिले होते. या निर्णयाचे मराठवाडा व्यापारी महासंघाने स्वागत केले आहे.लातूर महानगरपालिकेतही एलबीटीचा कायदा अंमलात आणण्यात आला होता. त्या वेळीही व्यापारी महासंघाने या कायद्याचा तीव्र विरोध केला. परंतु प्रशासनाकडून एलबीटी कायद्याबाबत कायम संदिग्धता ठेवण्यात आली होती. एलबीटी विभाग अनावश्यकपणे काम करीत राहिला आणि अयोग्य मूल्यांकन होत होते. याबाबत व्यापारी महासंघाचा सुरूवातीपासून विरोध होता. या निर्णयामुळे मराठवाड्यातील व्यापाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे व्यापारी संघटनांच्या प्रदीर्घ लढ्याला यश मिळाले.

## वीजबिलाच्या शंभर टक्के वसूलीसाठी महावितरण विभाग झाला आक्रमक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** ग्राहकांना अखंडित, उत्कृष्ट व दर्जेदार सेवा देण्यासाठी विकलेल्या वीजबिलांची शंभर टक्के वसुली करण्यासाठी महावितरण आक्रमक झाली असून बील भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा तात्काळ खंडीत करण्याची मोहीम मवितरणने हाती घेतली आहे. गेल्या २४ दिवसात २ हजार ३५६ वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

मार्च महिण्याची चाहूल लागताच महावितरणने वीजबील वसुलीसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे..थकबाकीसह चालू महिण्याचे वीजबील वसूल करणे महावितरणसमोर एक आव्हानच असते. आद रोजी लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील लातूर परिमंडळाच्या वीजग्राहकांकडे जानेवारी अखेर २९९ कोटी रूपयांची थकबाकी असून फेब्रुवारी महिण्याची ८४ कोटी ५४ लाख रूपयांची मागणी आहे.

थकबाकी व मागणी असे एकत्रीत ३८३ कोटी ६१ लाख रूपयांची वसूली फेब्रुवारी अखेर पर्यंत करावयाची आहे. यामध्ये लातूर जिल्हयातील ९६ कोटी ७७ लाख, बीड जिल्हयातील १५९ कोटी ९८ लाख तर धाराशिव जिल्हयातील १२६ कोटी ८५ लाख रूपये रकमेचा समावेश आहे. गेल्या २४ दिवसात बीड जिल्हयातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांकडून १९ कोटी ९२ लाख रूपये वसुल झाले आहेत. तसेच धाराशिव जिल्हयातील वीजग्राहकांकडून १६ कोटी २२ लाख रूपये वसुल झाले आहेत. तर लातूर जिल्हयातील वीजग्राहकांनी ३३ कोटी ५२ लाख रूपयांचा भरणा केला आहे.

थकबाकी वसुलीसाठी जनमित्रांसह अधिकारीही वीजबील वसुलीसाठी फिरत असून गेल्या २४ दिवसात बील न भरणाऱ्या २१५७ वीजग्राहकांचा तात्पुरत्या स्वरूपात वीजपुरवठा तोडण्यात आला आहे. तर १९९ वीजग्राहकांचा कायमस्वरूपी वीजपुरवठा तोडण्यात आला आहे. वसुली मोहीम मार्च अखेर पर्यंत प्रभावीपणे राबवण्यात येणार असून वीजग्राहकांनी चालू बीलांसह थकबाकीचाही भरणा करावा अन्यथा कटू कारवाईस सामोरे जावे लागेल असा ईशारा महावितरणने दिला आहे. कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेल्या वीजग्राहकांना अभय योजने अंतर्गत थकबाकी वरील व्याज व दंड माफ करण्यात येणार असून योजनेचा लाभ ग्रहकांनी घ्यावा असेही महावितरणने कळवले आहे.

## अहिल्यादेवींचा समरसतेचा विचार पुढे नेण्याचे संघाचे काम

### नवनिर्माण प्रतिष्ठानच्या व्याख्यानमालेचा समारोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२६ फेब्रुवारी -** लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांनी राज्यकारभार करताना सामाजिक समरसतेचे धोरण अवलंबले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून मागील १०० वर्षात हाच विचार पुढे नेण्याचे काम केले जात असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्रीय सहसंपर्कप्रमुख विजयजी देवांगण यांनी व्यक्त केले.

नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित नवनिर्माण व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना विजयजी देवांगण बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.ज्योतीताई सुळ यांच्यासह प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, कोषाध्यक्ष उमेश कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थिताना संबोधित करताना विजयी देवांगण यांनी भारत देश आजवरच्या सर्वात सुखद कालखंडातून जात असल्याचे सांगितले. आजचा भारत हा वैश्विक व सर्वत्र सन्माननीय आहे. भारताच्या ज्ञान व विज्ञान परंपरांचा जगाने स्वीकार केला असल्याचे त्यांनी सांगितले.हिंदू संस्कृतीच्या ज्ञानाची जगात चर्चा असून हजारो वर्षानंतर हिंदू समाज एकात्मता सिद्ध करण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे ते म्हणाले.



हे सर्व क्रिएटिव्ह माईंडमुळे शक्य होत आहे.शेकडो वर्षांपूर्वी लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांनी शेकडो मंदिरे व घाटांचे पुनरुज्जीवन केले. समाज सुधारणा केल्या. महिलांसाठी स्वयंसहाय्यता गट सुरू केले. त्यांच्याकडे जातीपातीला थारा नव्हता. सामाजिक समरसता स्थापन करण्याचे कार्य त्यांनी केले.

१९२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली.देशात राष्ट्रीय भावनेची कमतरता निर्माण झाली होती.ती दूर करण्यासाठी डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी संघ स्थापन केला.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून पाच टप्प्यात रचनात्मक कार्य केले जात आहे. अहिल्यादेवी होळकर यांचा समरसतेचा विचार संघाकडून पुढे नेला जात आहे. संघ स्वयंसेवक विविध क्षेत्रात कार्यरत आहेत.हिंदू समाज जागरणाचे कार्य संघ करतो. राष्ट्र जागरणाचे कार्य संघाकडून केले जाते.हजारो संघ प्रचारक व स्वयंसेवकांनी हे कार्य अखंड सुरू ठेवले आहे.यामुळेच देश आज अमृत कालखंडात पोहोचला असल्याचे देवांगण म्हणाले.

प्रमुख अतिथी डॉ.ज्योतीताई सुळ यांनी आपण श्रोता म्हणून व्याख्यानासाठी आलो सांगितले. उमेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात आजवर झालेल्या व्याख्यानांचा ग्रंथ प्रकाशित करणार असल्याचे सांगितले. नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने सभासदत्व खुले केले जाणार असून इच्छुकांनी सभासदत्व स्वीकारण्यासाठी संपर्क करण्याचे आवाहन केले.

प्रारंभी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. सौ. प्राजक्ता सरदेशमुख व संजय गुरव यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कांचन तोडकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले. धनंजय कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.डॉ. शुभांगी कुलकर्णी यांच्या वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली. या व्याख्यानास लातूर व परिसरातील संघ स्वयंसेवक, पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.